म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय कथा
दा.क्र. ९७३९५

IRBK 0117395
IRBK-0117395

1981

8 DEC 1981 12 7 JUN 1979
6 JUL 1979

# गंमत

( कथासंग्रह )

—अरविंद जयवंत

मूल्य ८ रुपये

IRBK-0117395
IRBK-0117395

अरविंद प्रकाशन, बोरिवली

- प्रकाशिका :
  सौ. सुलभा अरविंद जयवंत
  जगतापवाडी, दत्तपाडा,
  बोरिवली (पूर्व), मुंबई–६६.

- प्रथमावृत्ती एप्रिल १९७८



- (C) अरविंद जयवंत



- मुद्रक :
  श्री. अजित निखार्गे
  सुमनीषा प्रिंटर्स,
  राम मंदिर रोड, बाभई,
  बोरिवली (प.), मुंबई-९२.

- मूल्य : आठ रुपये

ती. कै. बाळासाहेब

या माझ्या वडिल बंधूस

कृतज्ञापूर्वक—

## दोन शब्द :

माझ्या निवडक कथांचा हा पहिला संग्रह वाचकांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. १९६१ ते १९६३ या काळात प्रसिद्ध झालेल्या कथांपैकी काही कथा या कथासंग्रहात आहेत. ' गंमत ' आणि ' कारकून दात पाडतो ' या कथा १९६२-६३ साली ' सुदर्शन ' मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. आजही 'सुदर्शन'चे संपादक श्री. द. का. हसमनीस यांनी मला लिहिलेल्या उत्तेजनार्थ पत्रांची आठवण येते. त्यांचे मनःपूर्वक आभार.

शेवटच्या पांच कथा या 'जास्वंद' मधून १९७३ ते १९७६ मध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. मजवर सदोदित लोभ ठेवणाऱ्या श्री. भालचंद्र निखार्गे आणि संपादक श्री. अजित निखार्गे यांचे या कथासंग्रहाचे निमित्ताने आभार मानण्याची मी संधी घेतो.

या कथांना बरं-वाईट ठरवणं हे आपल्याच हातात आहे.

बोरिवली ८-४-१९७८ —अरविंद जयवंत

---

### कथानुक्रम

१ आली दिवाळी आली / २ मला जगायचंय / ३ गंमत ४ कारकून दात पाडतो / ५ कुकडे आणि लुकडे कंपनीच्या ऑफिसात / ६ शोध / ७ रंगला खेळ असा ८ एका हिऱ्याची कहाणी / ९ कलंकिनी / १० दंवबिंदू ११ शून्य.

म ग्रं सं ला ना  न शाखा.
वा. क्र. १७३९५ न. २२।६।७८
वि. कथा

शिवाजी कांडी कसले

१.

# आली दिवाळी आली !

— — आलीऽऽ दिवाळी आली !

जिची उत्कंठतेने लहान मुलं वाट पहात होती ती दिवाळी आली. गल्लीच्या अन् भरनाक्यावरच्या दुकानांवर 'सेल'च्या पाट्या झळकल्या. सेल ! खास दिवाळी मल ! ! सांचलेला, सडलेला, कधीही न संपणारा माल संपण्याचा एकमेव उपाय ! सेल ! दिवाळी सेल !

दिवाळी जवळ आल्याची जाहिरात !

गरिबांचं दिवाळं वाजवायला दिवाळी आली !

नफेबाजांच्या खिशात नोटांची भेंडाळी फेकणारी दिवाळी !

दादर बी. बी. ॲन्ड सी. आय.च्या रेल्वेस्टेशन समोरच्या दुकानांतील इलेक्ट्रिकच्या बत्त्यांचा झगमगाट लोकांचे डोळे दिपवू लागला.

लोकहो, डोळे दिपवणाऱ्या दिव्यांचा झगमगाट पहात दिवाळी साजरी करा.

बगाराम गवाळे त्या दिव्यांकडे पहात विचार करीत चालला होता.

खरंच का दिवाळी आली ? तो मनाला प्रश्न विचारीत होता.

जात होते. गांगेतले लोक काहीतरी विनोद करुन हसत, शिव्या देत पुढे सरकत होते.

एक पंधरा वर्षाचं पोरटं बगारामपुढे उभं होतं. बगारामचा गंभीर चेहरा त्याला बघवत नव्हता. सर्वजण बडबडत होते. पण बगाराम काळ्या धागेवालीतून शांतपणे धूर काढीत लाईनीबरोबर पुढे चालला होता. ते पोरटं त्याला हसवण्याकरिता प्रयत्न करीत होतं.

' काय राव गटारावानी तोंड करुन बसलायसा! वाईच बोला की ? कोण गांव हो ?'

' तुझं डोंबल ! ' बगाराम रागात उत्तरला.

एका पंधरा वर्षाच्या पोरट्यानं आपली मजा उडवावी ? छे, छे, अलीकडची पोरटी महा डामरट होत चालल्याचं त्याला जाणवलं.

पण ते पोर कसलं खमंग ! त्यानं भला मोठा आवाज काढला आणि गायला सुरुवात केली— 'साखर मिळेल का हो बाजारी ?'

चार पांच ओळी जेमतेम रचल्यावर ते पोरगं थकलं. सारी मंडळी खो खो करून हसली.

बगाराम मनातल्या मनात त्याच्यावर चडफडू लागला.

ते पोरगं पुन्हा दुसरं गाणं गाऊ लागलं—

" साखर नाही घरात !
बायको आहे रागात
नवरा उभा रांगेत "

बगारामला आता ते ऐकवेनासं झालं. तो रागात ओरडला-

' बस कर पोरट्या ! तुझ्या गाण्याने डोकं उठलं माझं ! '

ते पोरगंही आता भडकलं. आजुबाजूचे रंगेल गडी त्याच्या मदतीला धावले. बगारामला तो शिव्या देऊ लागला. आता चांगलीच जुंपणार तोच कसली तरी गडबड झाली. सर्व मंडळीचं लक्ष तिकडे गेले.

दुकानदाराने साखर द्यायचं बंद केलं होतं.

तो म्हणत होता माल खलास !

फक्त दोनच पोती होती आपल्याकडे !

पुढले लोक तावातावाने त्याला आणि काँग्रेस सरकारला शिव्या देत होते.

बगारामने त्या पोऱ्याला दूर लोटले आणि तो दुकानापुढे आला, एक फळी उघडी ठेऊन दुकानदार लोकांना समजावत होता.

बगाराम पुढे घुसला. त्याने त्या दुकानदाराला खाली खेचले. गदगदा हलवत त्याला त्याने विचारले,

' लुच्च्या, साखर देतोस की ठार मारू ?'

' अरे, साल्याच्या दुकानात जाऊन बघा !'

' अरे, लपवलेल्या असतील त्या गोणी शोधून काढा ?'

लोकांत आवाज उठले.

' मारा ऽऽ ! हाणा ऽऽ चोराला ! काळ्या बाजारात साखर पाठवायची असेल त्याला ! ' एकजण ओरडला. जणू त्याला आत्मविश्वासच होता, की काळाबाजार नावाचा चोरबाजारासारखा एखादा बाजार असावा म्हणून ! लोकांनी दुकानदाराला पिटायला सुरूवात केली. दोनचारजण दुकानात शिरले. त्यांनी दुकानातील नोकरांना जरब देऊन हाकून लावले. ते साखरेच्या गोणी शोधू लागले.

' अरे सापडली ! साखर सापडली !' एकजण ओरडत बाहेर आला.

' लबाड ! साखर असून नाही म्हणतो ! चोर लेकाचा !' चल वाटू लाग साखर !' दुसरा म्हणाला.

' शांत रहा, लोक हो शांत रहा !' बगाराम ओरडला. तेवढ्यांत कुणीतरी ओरडलं ' पोलिस ऽऽ अरे पोलीस ऽऽआले !

बगाराम शुद्धीवर येण्यापूर्वीच त्याच्या पाठीत एक दंडुका बसला बगारामाला कुणीतरी मानगूट धरून दूर फेकून दिले. भराभर लाठ्यांचे फटक पाठीत बसून दिवाळीतल्या फट् फट्ची रंगीत तालीम

सुरू झाली. एकच गडबड होऊन लोक पळू लागले. कुणी पिशव्या टाकल्या, कुणी टोप्या टाकल्या. जो तो पळत सुटला. कुणी संधी साधून पडलेल्या पिशव्या, टोप्या गोळा करीत पळ काढला. बगारामही लोक पळतात म्हणून टोपीवर हात ठेवून पळत सुटला. दंडुका बसल्याने त्याची पाठ दुखत होती. आज चार दिवस होऊन गेले तरी त्याची पाट दुखत होती.

त्याची बायको साखर नाही, गूळ नाही, तेल नाही म्हणून तणतणत होती.

मुले, फटाके नाहीत, गोड गोड खायला नाही म्हणून बापावर जळफळत होती.

बाप म्हणून 'बाबा वाईट !'

नवरा होता म्हणून 'नवरा वाईट !'

वारे दुनिया ! वारे सरकार !

' सत्यमेव जयते 'चा गुरुमंत्र देणारं सरकार ' साखरेचा त्याग। करायला शिका ! ते देखील भर दिवाळीत ! ' सांगत होतं, बगाराम गोंधळला होता. लोक सरकारला, काळाबाजारवाल्याना, दुकानदाराना शिव्या देत होते.

बगारामाला कुणाकुणाला शिव्या द्याव्या तेच कळत नव्हतं, तरी तो धडपडत आला. कोपऱ्यातल्या मोडक्या खुर्चीवर तो जेमतेम बसला. जोरात बसलं तर मुळातच खुर्ची मोडायची भीती होती. शेजारच्या आजीबाई त्याच्यासमोर केव्हा येऊन उभ्या राहिल्या तेच त्याला कळलं नाही. त्या विचारीत होत्या, बाबा येवढं पचांग बघतोस का ? भाऊबीज कधीची ? ते विचारायला आलेय !

बगारामने पंचांग उघडले. नेमकं शेवटावरच ते उघडलं गेलं. कसला तरी बारका फोटो दिसत होता. त्याने आरसी लावून नीट पाहिले. संक्रांत कसल्यातरी वहानावर बसून असुराशी लढत आहे असं चित्र होतं.

बगारामाने पंचांग खाली टाकलं आणि त्याने टाळी वाजवली. आता मला समजलं तो ओरडला.

' अगं ऐकलंस का, यंदाची दिवाळी साखरेच्या पोत्यावर बसून अन् डोक्यावर गोडे तेलाचं पींप घेऊन आलेली दिसते.'

' साखर न मिळण्याचं खरं कारण मला सापडलं ' तो ओरडला.

हातात लाटण घेऊन त्याची बायको धावत आली. रडणारं पोर रडायचं थांबलं.

आजीबाईंनी तोंडाच बोळकं पसरलं.

बगारामाचं म्हणणं त्यांच्या डोक्यात शिरलं नाही.

' छे, ते कुणालाच समजायचं नाही. मी म्हणतो ते तुमच्या डोक्यांत कधीच शिरायचं नांही. बंड्या, अरे ए बंड्या, साखर का मिळत नाही ते तुला मी सांगतो. ' ए बैला आहेस का घरात ?' ओरडत ओरडतच बगाराम बाजूच्या खोलीत शिरला. बायको, आजीबाई व पोरगं त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिली.

२.

# मला जगायचंय !

केशवरावांनी ऑफिसच्या पायऱ्या उतरायला सुरुवात केली. दारावरच्या भय्यानं केलेली सलामसुद्धा न पहाता ते इमारतीच्या बाहेर पडले. आता अंधार चांगला पडला होता. नगरपालिकेच्या कंदिला-शिवाय कुणीहि आता त्यांना रस्त्यानं सोबत करणारं नव्हतं. टाणे शहरापासुन चांगलं मैलभर अंतरावर त्यांचं गुदाम होतं. गुदामांत नव्वद रुपयावर खर्डेघाशी करीत ते जीवन व्यतीत करीत होते. इमानीपणे काम करणं एवढंच त्यांनी आजपर्यंत धोरण ठेवलं होतं.

आज त्यांचा ऑफिसात फार मोठा अपमान झाला होता. हेडस्टोअर-किपरने त्यांना नालायक, बेअकली अन् वाटेल ते म्हणून नोकरीवरून काढून टाकलं ! केशवरावांच्या इमानीपणामुळे हेडस्टोअर-किपरची तीनचारशे रुपयांची कमाई बुडून गेली. केशवरावांनी नुसतं हो म्हटलं असतं तर–! तर त्यांची नोकरी गेली नसती. मालकाला फसवून वरती पन्नास साठाची वेगळी कमाईसुद्धा त्यांच्या पदरात पडली असती.

पण केशवरावांनी बेईमानी केली नाही !

रस्त्यांतून जाताना त्यांच्या डोक्यांत विचार येत होते. 'खरच,

आपण चुकलो तर नाही ना ? जगात काय नेहमीच सत्यानं वागतात ? आपल्याला किती अडचणी होत्या-राजाची दोन महिन्याची शाळेची फी थकलेली-लाडक्या मुलीला—सुमतीला पातळ घ्यायला हवं होतं. घरातलं धान्य संपलं होतं. मिळणाऱ्या मार्गीत या साऱ्या वस्तू आणता आल्या असत्या. मग राजा नाचला असता. सुमा हंसून म्हणाली असती 'अण्णा, तुम्ही किती चांगले आहात !' आपण नक्कीच मूर्खपणा केला आणि नोकरीला मुकलो.

गेले दोन महिने विचारांच्या अतीव ताणामुळे त्यांच्या हातून हिशेबात वारंवार चुका होत होत्या. स्वतः मालक त्यांना दम देऊन गेले होते. त्याचा फायदा घेऊन हेडस्टोअरकिपरने संधी मिळताच त्यांना कामावरून दूर केलं होतं. आता रडून हातापाया पडून परत नोकरी मिळणार नव्हती. आता त्यांच्यापुढे उद्याचा प्रश्न होता. बेकारीची कुऱ्हाड त्यांच्यावर घाव घालून मोकळी झाली होती.

वर्तमानपत्रात दररोज येणाऱ्या आत्महत्तेच्या बातम्या वाचून पूर्वी ते हंसत होते. आज त्यांचं मन त्यांना ओरडून सांगत होतं कशाला जगायचं ! बेकारीत हालअपेष्टात जगण्यापेक्षा मरून जा ! जीव देऽऽ! दुसऱ्या मनानं उसळी मारून सांगायला सुरुवात केली-'वेडा तर नाहीस तू ! तुझी लाडकी पत्नी, मुलगा, मुलगी यांना असे वाऱ्यावर सोडून तू भ्याडपणे मरणार ? त्यांच्या बाबतींतली तुझी कर्तव्यं तू विसरून मरणार ?'

पहिलं मन त्यावर ताण करून म्हणत होतं, 'वेड्या मायापाशात गुंतून तू पुन्हा पिचत पिचत जगणार ? बेट्या, आयुष्याची चाळीस वर्षं तू परिस्थितीशी झगडलास-काय फायदा झाला तुझा ! गेली का तुझी गरीबी ! फिटलं का तुझं कर्ज ?'

दुसऱ्या मनाला उत्तर देता आलं नाही. दिवसेंदिवस ते अधिक कर्जात बुडत होते. त्यांना कोडकौतुकं पुरविता येत नव्हती. मुलांची फी

कधी वेळेवर देता येत नव्हती. मुलीचं शिक्षण बंद करावं लागलं होतं. तिचं लग्न जमवायला पैशाअभावी धीर होत नव्हता. तिला पातळंसुद्धा घेता येत नव्हती. आणि आणि चोवीस वर्षे साथ करणाऱ्या पत्नीला औषधपाणी करता येत नव्हतं! तिचा दमा—खोकला दिवसेंदिवस वाढतच होता. दूधवाला—कोळसेवाला—वाणी यांची बिलं तुंबत जात होती. मारवाड्याचं कर्ज फिटत नव्हतं. या साऱ्या लोकांच्या वारंवार शिव्या खाव्या लागत होत्या. यातून मुक्ती मिळवण्यासाठी एकच दरवाजा खुला होता. तो फक्त मरणाचा होता.

चालता चालता केशवराव ठेचाळले. फुटलेल्या अंगठ्याकडे लक्ष न देता त्यांचं मन त्यांना ओरडून सांगू लागलं 'तू कुटुंबाला पोसू शकत नाहीस. काय अधिकार आहे तुला जगण्याचा? तुला मेलं पाहिजे! मेलं पाहिजे! सगळ्या ठाणे गांवाला धक्का बसेल. खळबळ माजेल. अशी आत्महत्या तू केली पाहिजेस. तुझ्या प्रेताकडे पाहून लोक म्हणतील केशवराव नाइलाजाने मेला. मग कुणी कर्ज काढणार नाही. दुःखात पिचत ऱ्हाणार नाही. दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग आत्महत्या हे तू जगाला दाखवून दिलं पाहिजेस!'

विचार करता करता ते चर्चजवळ आले. मोठा थोरला तलाव समोर पसरला होता. आजुबाजूला कुणीसुद्धा नव्हतं. सेंट्रल मैदानात चार सहा मंडळी बसलेली असावीत. या मंडळींचं लक्ष जाणार नाही अशा बेताने आपण पाण्यात उतरले पाहिजे; असा विचार करून ते तळ्याकडे निघाले.

पायातल्या वहाणा, कोट टोपी उतरून ते पाण्यात शिरणार तोच जवळच्या मारुती मंदिरातून घंटेचा आवाज कानी पडला. त्या ठण्ऽऽ आवाजाबरोबर ते दचकले अन् देवळाकडे धावत गेले.

'अरे, आपण देवाचं दर्शन घेतल्याशिवाय असं करणं ठीक नाही. दररोज आपण देवाला सांगतो की, देवा, मला जगता येईल

माझ्या मुलाबाळांना जगता येईल एवढी ताकद मला दे ! मला खूप पैसा नको. बंगला नको. गाडी नको—फक्त जगायला पुरेल एवढा पगार दे. माझी कर्जे संपू दे, मला कर्जमुक्त होऊ दे !'

मारुतीला नमस्कार करून त्यांनी घंटेचा टोला जोराने आपटला. मग का कोण जाणे त्यांनी घंटा ठणाणा करून वाजवली. तेवढ्यात त्यांचे डोळे पाणावले.

'छे, असा दुबळेपणा काय कामाचा ? आत्महत्या करणाऱ्या माणसानं मन कठोर केलं. पाहिजे ! हृदय दगडासारखं घट्ट करायला हवय !' त्याचं एक मन ओरडून म्हणालं.

मारुतीला पुन्हा नमस्कार करून त्यांनी विनवलं, 'देवा: दररोज तुला जगण्यासाठी ताकद दे म्हणून सांगितलं. आज मला मरायचं आहे. मला शांततेनं मृत्यु दे ! देवा, मला मृत्यु देऽऽमृत्यु दे !

स्वतःला सांवरीत केशवराव तळ्याकडे निघाले. कुणी पहात नाही याचा अंदाज घेण्यासाठी त्यांची नजर चारी बाजूला फिरली आणि मग ते शांततेने पाण्यात उतरले.

भराभर पावले टाकीत ते पुढे जात होते. पाऊलभर, गुडघाभर आणि मग कमरेभर पाण्यात ते आले. आणखी एक पाऊल त्यांनी उचलून चिखलात टाकलं. त्याबरोबर त्यांचा झोक गेला. ते पाण्यावर आडवे पडले. एकदम नाकातोंडात पाणी शिरलं ! एकाएकी भयकर भीतीचा शिरकाव त्यांच्या शरिरात झाला. त्या भीतीसरशी ते ताठ उभे राहिले. आणि पुन्हा वसरून आडवे पडले. एका हिसक्यात चिखलातला पाय त्यांनी बाहेर ओढला. दोन्ही पाय स्थिर करून त्यांनी पुन्हा झोक सावरला आणि मग झपाट्याने ते मागे वळले. पिसाटा-सारखे धावत ते तळयाबाहेर आले. बाहेर पडल्यावर समोरच दिसलेला कोट त्यांनी उचलला आणि एकदम धूम ठोकली. रस्त्यातून धक्के देत ते उघडे बोडके अनवाणी घराकडे धावत होते. दारातच मोठ्या

उत्कंठेने त्यांची पत्नी वाट बघत उभी होती. तिला जोराचा धक्का देवून ते खोलीत शिरले आणि एकदम खाली कोसळले.

शुद्धीवर आल्यावर त्यांनी किलकिले डोळे करून पाहिले. त्यांची लाडकी सुमा, राजा केविलवाणी तोंडं करून त्यांच्याकडे पहात होती. मग ते विचार करू लागले, 'अरे आपण इथं कसे ? आपण झोपलो का ? ही मंडळी आपल्याकडे असे पहातात का ?' अन् मग त्यांना आठवलं–अरे, आपण जीव दिला होता आणि घाबरून पळत घरी आलो तर !! स्वतःशीच पुटपुटत ते म्हणत होते 'छे, काय भलतंच मी करणार होतो.' कपाळावर ठेवलेला पत्नीचा हात मग त्यांनी एकदम आवेगाने दाबून धरला. अश्रुपूर्ण नजरेने बघणाऱ्या पत्नीकडे पाहून क्षीण हास्य केलं. त्याबरोबर त्यांची पत्नी पण हंसली. राजा, सुमाच्या चेहऱ्यावर आनंदाच्या उर्मी उठल्या आणि एकदम त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. जगण्यातला आनंद त्यांना कळला !!

मनात ते म्हणाले, 'छे ! असला मूर्खपणा मी कधी करता कामा नये. मला जगलं पाहिजे ! जगलं पाहिजे ऽऽ !!'

# ३.

## गंमत !

दारावरची बेल किंचाळली. मी घाईघाईने उठलो. दार उघडलं. दारात पोस्टमन उभा होता. 'कुलकर्णी इथंच रहातात ना?' मी मान हालवली. हातात एक पाकीट टाकून स्वारी बघता बघताच निघून गेली.

हातातल्या पाकिटात काय असणार? मला ते कळलं होतं. कशाला फोडा? नेहमीचंच—साभार परत! आरामखुर्चीवर मी हताशपणे अंग टाकले, मूठ घट्ट आवळली, ओठहि बेताने चावला.

मग काय वाटलं कुणास ठाऊक, हळूच ते पाकीट उघडलं. आतलं 'साभार परत' चं साहित्य बाहेर काढलं. आभाराच्या पत्राचे तुकडे केले. पाकिटाची तीच वाट लावली अन् खिडकीतून सारे तुकडे बाहेर भिरकावले. कुठून तरी वाऱ्याची जोरात झुळूक आली. अर्धे तुकडे परत खोलीत येऊन पडले. रागारागात पुन्हा ते गोळा केले नि खिडकीतून हवेत भिरकावले. जरासे वर चढले आणि संथपणे खाली येऊ लागले. खिडकीच्या खाली उभी असलेली दोन-तीन लहान पोरं 'विमान, विमान....' ओरडू लागली. त्यांचं टाळ्या पिटणं, ओरडणं

बघितलं. क्षणात राग गेला. पण खट्ट् मन परत जाग्यावर येईना! खिडकीत उभं राहून कंटाळा आला. परत आरामखुर्चीवर आडवा झालो.

माझ्या कथेची अशी अवस्था व्हावी! खूप खूप मेहनत घेऊन मी तयार केलेली ती कथा होती. दहा कथांतली परत आली. आता बाकीच्यांचं काय होणार? केराची टोपलं की साभार परत?

कथा बाजूला गेली अन् मग डोळ्यांपुढे अस्पष्ट व्यक्ति दिसू लागली--हळुहळू ती प्रकाशात आली – रेखा कर्णिक! कालच मी तिच्या घरी निरोप कळविला होता. महिन्यापूर्वी दादांनी आग्रह केला. मी आणि वहिनी तिला पहायला गेलो. सावळ्या रेखाने भीत भीत मला चहा दिला होता. वय, शिक्षण, नांव, आवडीनिवडी–माझ्या प्रश्नांची उत्तरं दिली होती. मी आणि वहिनी परत निघालो. जिना उतरताना सहज मागे नजर टाकली. तिचे दोन्ही डोळे माझ्याकडेच लागले होते. ते म्हणत होते, 'नाही म्हणायचं नाही हं!'

'मुलगी बरी आहे नाही?' वहिनींचा तो अर्धवट पसंतीचा स्वर खिडकीतून पहाणाऱ्या रेखाने खात्रीने ऐकला असणार!

अन् काल त्या रेखाच्या घरी मी महिन्याभराने कळवलं, 'मुलगी पसंत नाही, विलंबाबद्दल क्षमा असावी!'

मी आज जसा संपादकाला मनात शिव्या देत होतो, तसंच मनातल्या मनात तिने मला शिव्या दिल्या असणार!

अन् मग उगाचच हळहळ वाटू लागली. उदासीनतेत आणखीच भर पडली. आरामखुर्चीवर पडल्या पडल्या मी रेखाचा विचार करू लागलो. मनात मूर्ति ठसेना! असाच वेळ गेला. घड्याळाचे काटे फिरत होते, टोले पडत होते. नवीन काही लिहावंसं वाटत नव्हतं. मी बेचैन अवस्थेत पडलो होतो. आजची दांडी फुकट गेली होती. रागारागाने

मग मी हवेत हात फिरवले. त्या संपादकाला आणि रेखाला मुठीत पकडलं नि भिंतीवर आदळलं !

दारावरची बेल पुन्हा खणाणली. मी उठलोच नाही. दरवाजा लोटून वहिनी आत आल्या. 'झोपा काढल्यात ना ! ह्यांना कळलं तर रागावतील. उगाच दांड्या मारुन 'कॅज्युअल' फुकट घालवता झालं !' वहिनी बोलत असतात. मी लक्ष देत नाही. त्या बटन दाबून दिवा लावतात अन् माझ्याकडे एकदा नजर टाकून स्वयंपाकघरात जातात.

दोन महिन्यात लिहिण्याचं नांव काढलं नाही. दादा, वहिनी टिंगल करताहेत ! राहिलेल्या नवातली आणखी एक गोष्ट पहिलीच्या सोबतीला येऊन खणात पडली आहे. मी लेखक आहे ही गोष्ट ऑफिसातल्या साऱ्यांना आता माहीत झाली आहे. माझ्या गोष्टी कुठे प्रसिद्धीला का पाठवत नाही, याचं साऱ्याना आश्चर्य वाटतं आहे ! नवीन काही लिहिलं काय, म्हणून मित्र मंडळी मधून मधून चौकशी करताहेत ! मी फक्त आश्वासन देतो आहे, पण लिखाण मात्र जमत नाही. माझ्यातला लेखक मेलेला नाही, पण कोमेजला मात्र खात्रीने आहे.

निशा टिपणीस उगीच माझ्या टेबलापाशी येऊन लाडे लाडे बोलते, माझ्यासाठी आग्रहाने कॉफी मागवते अन् तिला दुखवू नये म्हणून मी ती घेतो आहे. तिच्या लिपस्टिकने रंगलेल्या ओठांवर एक गुद्दा मारुन खरोखरच्या रक्ताने त्याला लाली आणावी, इतका मला तिचा कधी कधी राग येतो. पण मी गुद्दा कधीच मारायचा प्रयत्न करीत नाही. पगार हाती पडल्यावर ती मला साऱ्या फोर्टमध्ये फिरवते. ती असं का करते, ते मला माहीत झालं आहे. तिचं लग्नाचं वय उलटलं आहे. मी मात्र अजून चोविसीतला तरणाबांड गडी आहे. नको असला तरी कधी कधी तिचा चोरटा स्पर्श मला सुखावतो. मी आणखी काय तरी करावं असं तिला वाटतं. पण तिने

आणलेल्या एकाही संधीचा मी लाभ घेत नाही. ती अंगाला चिकटली की मनात भीतीचं वारं शिरतं. मी झटकन् दूर सरतो. कदाचित् तिने माझ्यासारखे किती तरी खेळवले असतील ! पण मी अजून नवा आहे ! तिचे डोळे माझ्यावर रोखले गेले, की मला कसंसंच होतं. —पुन्हा पुन्हा ती रेखा कर्णिक डोळ्यासमोर येते. तिचे डोळे बोलू लागतात,– नाही म्हणायचं नाही हं !'

मी दररोज ठरवतो, उद्यापासून ह्या मेनेला टेबलाजवळ उभं करायचं नाही, तिची कॉफी घ्यायची नाही, माझ्या बाजूची जादा खुर्ची प्यूनला उचलायला लावायची ! माझ्या दोस्ताचं—शामचं तसंच सांगणं आहे. माझ्यासारखा पोरगा फुकट जाऊ नये असं त्याला फार फार वाटतं. खरंच, माझ्याऐवजी ही टिपणीस शामच्या मागे लागली तर किती बरं होईल ! पण हे सारं मनातच राहिलय. कारण मी आता खरोखरच प्रकाशात आलो होतो. गेल्या महिन्यात माझ्या एकदम चार कथा प्रसिद्ध झाल्या आहेत अन् टिपणीसला माझं कौतुक करायला नवी संधी मिळाली आहे.

माझ्या समोरच्या खुर्चीवर बसणाऱ्या शानभागना अर्धांगाचा दुसरा झटका आला न् त्यांना राजिनामा द्यावा लागला. ऑफिसमध्ये त्वरित हालचाल झाली आणि शानभागच्या जागेवर एका नवीन माणसाची नेमणूक करायचं ठरलं. दोन दिवस 'इन्टरव्ह्यू' झाले आणि एक दिवस समोरच्या खुर्चीवर रेखा कर्णिक येऊन बसली. मी चकित झालो. तिने टपोऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे बघितलं नि त्याबरोबर पुन्हा मनात काहूर माजलं. तिचं काम समजावून देताना माझा गोंधळ होत होता. तेवढ्यात शाम जवळ आला नि हळूच कानात बोलला, ' हातचं राखून सांग लेका ! पोरगी मारू आहे !'

त्याच्या उद्गाराचा मला राग आला, 'नॉन्सेन्स !' मी माझ्या खुर्चीवर येऊन बसलो. कागदात डोकं खुपसलं. भराभर बेरजा घेऊ

लागलो. पण वारंवार चुका होऊ लागल्या. चोरून रेखाकडे बघावसं वाटू लागलं. शाम्या म्हणाला ते कानात घुमू लागलं, 'पोरगी मारू आहे-पोरगी मारू आहे !' खरंच का ती इतकी नजरेत भरण्यासारखी आहे ?

हळूच डोकं वर केलं. डोळे तिच्या चेहऱ्यावर स्थिरावले. त्याच वेळी तिनेही समोर माझ्याकडे बघितलं. नजरानजर झाली. माझ्याकडे बघून ती गोडसं हसली. विलगलेल्या ओठातून किंचित् दात डोकावले. खरंच ! किती शुभ्र आहेत हिचे दात ! ती कामात गुंतून गेली. मी मात्र काम न करता तिच्याकडे पहात राहिलो. ती सुंदर नाही पण 'रेखीव' आहे ! तिचा पोशाख टिपणीसबाईसारखा भडक-उत्तान नाही, तरी तिला शोभण्यासारखा आहे. टिपणीसचं नाक बसकं तर हिचं लांबसडक ! टिपणीसपेक्षा ही शंभरपटीनी चांगली आहे, असं माझं मन मला ग्वाही देऊ लागलं. माझं एकटक पहाणं चाललं असता तिने मान वर केली नि पुन्हा तिच्यामाझ्या दृष्टीचं मिलन झालं. माझ्या शोधक नजरेचा भाव तिला कळला असावा. तिने लाजून मान खाली घातली नि बस्स ! त्या वेळच तिच्या चेहऱ्यावरचे भाव बघून मला काहीतरी सापडल्यासारखं वाटलं.

एकचा टोला पडला. सेंटच्या मादक वासामुळे मी मान वर केली. टिपणीस जवळ येऊन उभी होती.

'कॉफी खाली घेऊया ना ?' रेखाकडे तिरपा कटाक्ष टाकीत तिने मला प्रश्न केला.

'नो, सॉरी ! आजपासून तुमच्याबरोबर कॉफी घेणं बंद !'

'म्हणजे ? आम्ही काय घोडं मारलंय बाई तुमचं !' लाडीक हेल काढीत टिपणीसने सवाल केला.

'बंद म्हणजे बंद ! माझी मर्जी ! आजपासून मी ह्या रेखाबरोबर 'लंच' घेणार !'

'अग्गोबाईऽ ऽ ऐकावं ते नवलच !'

'अहो टिपणीसबाई, नवल आहे ते पुढेच आहे. ही वाग्दत्त वधू आहे माझी ! चल रेखा !' रेखाला मी म्हणालो.

निशा टिपणीस मटकन् खुर्चीवर बसली. तिच्याकडे लक्ष न देता मी रेखाच्या कमरेला हात घातला.

'इश्श ! ऑफिस आहे हे !' माझा हात झटकीत रेखा म्हणाली.

फॅमिलीरूममध्ये बसल्यावर रेखाने माझा हात पकडला.

'खरंच, त्या टिपणीसपेक्षा मी तुम्हाला आवडते ?'

'खूप ! अगदी मनापासून ! ! तुझ्यावर माझे प्रेम आहे रेखा !'

'इतकं असून मला तेव्हा नकार का दिलात मग ?'

'अगं, ते अजून मलाच समजलं नाही !'

'मग नाही म्हणणार नाही न आता ?'

'अंहं !' मी तिला म्हणालो अन् तिला जवळ घेऊ लागलो.

'इश्श ! हॉटेल आहे हे ! पोऱ्या बघत असेल दाराच्या फटीतून !' तिने दूर सरत म्हटलं.

'परवा रविवार आहे. घरी येशील आमच्या ?'

'कशाला ?

'कशाला काय ? खूप बोलायचंय तुझ्याशी.'

'आज माझ्याबरोबर आमच्या घरी याल, ह्या अटीवर येईन.'

'येईन.'

'ठरलं ?'

'नक्की ? बघा हं !'

ह्या वेळच्या तिच्या चेहऱ्यावरचे भाव खरोखरच कॅमेऱ्याने टिपण्यासारखे आहेत. पण—

शनिवारचा दिवस पार पडला.

रात्री झोप येत नव्हती. माझी चुळबुळ चालू होती. किती

वेळा तरी उठलो, दिवा लावला, पुन्हा झोपलो. वहिनी झोपेतून जाग्या झाल्या.

‘ का हो ? बरं वाटत नाही का ? ’

‘ अहं ! उद्याच्या रविवारची वाट पहातो आहे. त्यामुळे झोप येत नाही. ’

‘ काय आहे एवढं उद्याच्या रविवारी ? ’ झोपेतच वहिनी विचारतात.

‘ आमची आपली एक गंमत आहे ! उद्याच कळेल तुम्हाला– ’ मी म्हणालो.

‘ वेडगळ आहात झालं ! ’

वहिनी पुन्हा झोपी जातात. मी मात्र तळमळतो आणि केव्हातरी झोप लागते.

रविवार उजाडतो. स्नान करुन पेपराचं पान मी चाळतो आहे, इतक्यात दारावरची बेल किंचाळते. मी उठत नाही, वहिनी कुरकुर करीत दरवाजा उघडतात. दारापुढे उभ्या असलेल्या व्यक्तिला पाहून थंब पडतात.

‘ कुलकर्णी इथंच रहातात ना ? ’

पेपरमध्ये डोकं खुपसून बसलेले दादाही त्या आवाजाबरोबर चमकून दाराकडे बघतात दारात रेखा कर्णिक उभी राहिलेली दिसते.

‘ कुलकर्णी इथंच रहातात ! ’

‘ येस, कम इन ! ’ मी ओरडतो.

‘ वहिनी दारातून दूर सरतात, स्वयंपाकघराकडे जाताना माझ्याकडे मान वेळावून वेडावतात. त्यांना म्हणायचं असतं,

‘ अँहँ, हीच का गंमत तुमची ! ’

★ ★ ★

It is realy a good story

# ४.

# कारकून दात पाडतो !

बंडा सबनीस असं काही बोलेल याची कुणाला कल्पना नव्हती. तो जे बोलला ते भयंकर होतं. त्याचे ते उद्गार ऐकून साहेबांनी क्षणभर त्याच्याकडे बघितलं. हाताची मूठ टेबलावर आपटली अन् म्हटलं, 'ठीक आहे, आय ॲक्सेप्ट !'

त्याचं असं झालं. कुकडे-कुकडे आणि सन्समध्ये बंडा सबनीस कारकुनाचं काम करतो. कुकडे-कुकडे ही एक भारतातील मोठी उलाढाली करणारी कंपनी असल्यामुळे तिच्या शाखा बहुतेक प्रांतांतून मुख्य शहरी पसरल्या होत्या. मुंबईला फोर्टमध्ये एका अलीशान पांच मजली इमारतीमध्ये कंपनीचं हेड ऑफिस होतं. कंपनीच्या ठाणे येथे असलेल्या ब्रँचऑफिसमध्ये श्री. भडकमकर हे ब्रँचमॅनेजरचं काम पहात होते. ठाणे ब्रँच ऑफिसचा कारभार सुधारण्याकरिता त्यांना खास राजकोटच्या ऑफिसमधून आणण्यात आलं होतं. भडकमकरांचा शिस्तप्रिय आणि दिडकीही न खाणारा म्हणून लौकिक असल्याकारणाने कंपनीचा सारा नोकरवर्ग त्यांना वचकून असे. पण बंड्या सबनीस ही बल्ली मात्र त्यांच्या शिस्तीच्या चाकोरीत बसत नव्हती. 'बंडा साहेबांचं

वारसं जेवलाय !' असं सारे म्हणत.

भडकमकरांना बंडाचा तडफदारपणा, कामाचा उरक हे सारं दिसत होतं. मनात नसताना सुद्धा तो त्यांना आवडायचा. एक गोष्ट मात्र त्यांना वारंवार खटके. ती म्हणजे, त्याची रोखठोक वृत्ती ! ऑफिसमध्ये जरा कुणाला अन्याय झाला की तो पिसाटासारखा व्हायचा. बोंबाबोंब करून ऑफिस डोक्यावर घ्यायचा. पहिल्या मॅनेजरसाहेबांच्या वशिल्याने तो लागलेला असल्याने गेली दहा वर्षे त्याला कुणीही धक्का लावू शकत नव्हतं ! सारा स्टाफ त्याला 'मिस्टर अन्याय' म्हणून हाक मारायचा, कोपऱ्यावरच्या मामा हॉटेलवाल्यापासून तो ऑफिस बॉयपर्यंत तो सान्यांना आवडता होता.

बंडा नेहमीच काहीतरी विनोदी बोलायचा. यावेळेलाही त्याने विनोदानंच म्हटलं होतं, पण भडकलेल्या भडकमकरसाहेबांनी तो विनोद लक्षात न घेता ताडकन् म्हटलं, 'ठीक आहे, आय ॲक्सेप्ट इट !' वास्तविक गफलत बंडाची होती. पण सरळ चूक कबूल केली तर तो बंडा कसला ? चांगलं कम्पनीचं अडीच हजारांवर नुकसान व्हायची वेळ आणली होती. बंडाने लिहिलेलं बरोबर असेल असं वाटून घाई-घाईने हेडक्लार्क प्रधानांनी कोपऱ्यात इनिशल करून महत्त्वाची केस साहेबांकडे पाठवली. भडकमकरांनी कधी नव्हे ती डोळे मिटून सही केली आणि कागद कंपनीच्या डायरेक्टरांकडे गेले.

महिनाभरात सारा प्रकार स्पष्ट झाला. पानभर दम देऊन कागद डायरेक्टरनी भडकमकरांकडे परत पाठवले. भडकमकर एकदम भडकले त्यांना हेडक्लार्क आणि बंडा सबनीसला बोलावून घेतलं. साहेब बोलत होते आणि ते दोघे लेक्चर ऐकत होते. साहेबांचं बोलणं संपल्यावर का कोण जाणे, पण बंडा गालात हसला.

' हसता काय ! डायरेक्टर माझा जीव घेतील आणि तुम्ही दात काढता !'

'एका बारिकशा चुकीमुळे एवढं काय रागवता ? अहो, महात्माजीसुद्धा म्हणत की मी डोंगराएवढ्या चुका केल्या असतील. मग एका कारकूनाच्या बारिकशा चुकीचं काय ! आपल्या हेड-ऑफिसमध्ये गेल्या वर्षी आपल्या त्या वामनराव गद्रेनी—

'बस्स, बस्स मला ते सांगू नकोस. तुम्ही कारकून लोक चूका करून काय काय विनोद कराल याचा काही नेम नाही.' भडकमकरांनी बंडाला दटावलं.

'म्हणूनच तुम्ही भडकता कामा नये, असं माझं नेहमी सांगणं असतं. अहो, कारकून रागावला तर एखाद्याचे दात सुद्धा पाडेल.'

म्हणजे तू माझे दात पाडणार ? मला ही धमकी देतोस ?'

'हो. ऑफकोर्स ! छे, छे ! म्हणजे तसं नाही. दात पाडणार म्हणजे काय–आपलं लेखणीच्या फटकाऱ्याने दात पाडणार.' बंडा बोलून गेला.

'ठीक आहे. कोण कुणाचे दात घशात घालतो ते मी पण बघतो.'

'अहो, पण मी नुसतं दात पाडण्याबद्दल बोलतो आहे. मी तुमचे दात पाडून दाखवले तर तुम्ही मला १०० रुपये द्यावेत. आहे कबूल? तुमच्या तोंडाला हात न लावता मी तुमचे पुढले दोन दात पाडायचे. डू यू अॅक्सेप्ट माय चॅलेंज ?'

'अरे, जा. चॅलेंज देतोय. या भडकमकराने मोठमोठ्यांना नाक घासायला लावलय तिथे तुझ्यासारख्या तिशीतल्या कारकूनाची काय कथा !'

'तर मग चॅलेंज अॅक्सेप्ट करा.'

'अस्संऽऽठीक आहे. आय अॅक्सेप्ट !' टेबलावर हाताची मूठ आपटीत भडकमकरांनी सांगितलं.

केबिनमधून बंडा सवनीस बाहेर पडला तेव्हा त्याचा चेहरा आनंदाने फुलला होता. हेडक्लार्क प्रधान मात्र आता बंडाचं कसं काय

होणार याचा विचार करीत पडलेल्या चेहऱ्याने आपल्या खुर्चीकडे गेले. बंडा सबनीस साहेबांशी असलेल्या दोस्तीला आता कायमचा मुकला या बद्दल त्यांना खात्री होती. सबनीसला अक्कल नाही असे ते त्याला त्याला सांगत सुटले. बंडा सबनीस हवेत मूठ फिरवीत आपल्या भक्तमंडळीकडे बडबडत होता.—'भडकमकर साहेबांना कारकून काय आहे हे दाखवायलाच हवंय. लेखणीच्या फटकाऱ्याने त्यांचा दात पाडला नाही तर माझं नांव बंडा नव्हेच !'

सुमा फडणीसच्या हुंदक्यामुळे साऱ्यांचे लक्ष तिच्याकडे गेलं. सुमा फडणीस हे बंडाचं प्रेमपात्र. दहा वर्षांच्या नोकरीमध्ये बंडाला कुठलीहि पोरगी खिशात (पोळक्याच्या?) घालू शकली नव्हती; पण सुमाने काय जादू केली कोण जाणे, ती बंडाची हृदयस्वामिनी झाली. सुमाचा हुंदका ऐकून बंडा तिच्याकडे धावला. तिने डोळे पुसत पुसत त्याच्या हातात एक कागद दिला.

'दोस्तहो, आमची कलकत्याच्या ऑफिसात उचलबांगडी झालेली आहे.' हातातला कागद फडफडवीत बंडा ओरडला.

बंडाची अचानक बदली करण्यामागे भडकमकर साहेबांचा हात असला पाहिजे याची कुणालाही शंका नव्हती. अशी तडकाफडकी बदली झाल्यावर एरव्ही आरडा ओरड करणारा बंडा यावेळी गप्प कसा, याचं साऱ्यांना आश्चर्य वाटलं. अन्याय, अन्याय म्हणून बोंब मारणारा बंडा कसलीहि कुरकूर न करता कलकत्याला गेला. सुमा-फडणीसही खटपट-लटपट करून बदली मिळवून कलकत्याला गेली.

दहा वर्षांनी बंडा अचानक मुंबईत आला. मधल्या काळात तो कुठे आहे, हे काहीच कळलं नव्हतं. हेडऑफिसचे अन् त्याच्या ठाण्याच्या ऑफिसचे लोक त्याला विसरून गेले होते. अचानक सुमासह बंडा सबनीस ऑफिसमध्ये शिरला. त्याच्या पूर्वीच्या भक्तगणापैकी

दोन-चार लोकांनी त्याला घेरला आणि प्रश्नांचा भडिमार केला. सान्या भक्तगणांचा समाचार घेतल्यावर त्यानं हळूच भडकमकर साहेबांची चौकशी केली.

सुमा फडणीसला घेऊन स्वारी भडकमकरांच्या केबिनमध्ये शिरली.

'अरे सबनीस,—तू-तू इकडे कुठे ? बदली झाली की, रजेवर आलास ? आणि फेवढारे फुगन्यायस. ही ही ह्या म्हणजे—'

'येस. सर्व सांगतो. ही म्हणजे सुमा फडणीस माझी प्रियतम पत्नी ! सध्या आम्ही रजेवर आहोत.' बंडा भडकमकरांशी हस्तांदोलन करीत म्हणाला.

मग भडकमकर आणि सबनीस द्वयांच्या बराच वेळ गप्पा झाल्या. कॉफीपान चालू असताना भडकमकरांनी त्याला आपण येत्या आठवड्यात रिटायर्ड होणार अशी बातमी दिली.

'मला मघाशीच कुणीस सांगितलं त्याबद्दल ! फार दगदग करता या वयात ! उगाच एक्सटेन्शन घेतलंत दोन वर्षांचं ! आता मात्र खरोखरच विश्रांती घ्या. एक छानसं घर बांधा आणि पूर्ण विश्रांती घ्या. मी फार फार त्रास दिलाय तुम्हाला. आय नॉऊ वुइश यू हॅपी अँड ए पीसफूल लाईफ.' बंडा अगदी गदगदल्या आवाजात म्हणाला.

फार फार वर्षांनी गाठ पडल्यामुळे जुन्या दोस्त मंडळींबरोबर बंडा अगदी दिलखुलास गप्पा मारीत होता. गेल्या दहा वर्षांत आपण कंपनीच्या कलकत्ता, दिल्ली, मद्रास, राजकोट इत्यादि शाखा मध्ये काम केल्याचं त्यानं सांगितलं. आता मात्र मुंबईत रहायचा आपला विचार आहे आणि बहुतेक आपण फोर्ट मधल्या हेडऑफिसात येणार आहोत, मुंबईत एक सुंदर जागा पण मिळवणार आहोत इत्यादि ऐकवलं. बंडाच्या आगमनामुळे त्या दिवशी ऑफिसात १।२सं काम

झालं नाही. आणि भडकमकरसाहेबहि काही ओरडले नाहीत.

भडकमकरांच्या सेंडऑफला बंडा न विसरता हजर राहिला. समारोपाचं भाषण करुन भडकमकरांचं खूप गुणवर्णन केलं. भडकमकर खुशींत होते. आपल्या भाषणात त्यांनी बंडाची स्तुती केली. घरी परतताना स्वतःच्या गाडीतून त्यांनी बंडा—सुमाला घरी पोचवलं.

रजा संपल्यावर बंडा फोर्टच्या ऑफिसात 'बी' ब्रँचमध्ये म्हणजे एस्टॅब्लिशमेंटमध्ये रुजू झाला. सुमाला मात्र पुन्हा ब्रँचऑफिसात जावे लागले. बंडा बी ब्रँचमध्ये असल्यामुळे ठाणा ब्रँचच्या त्याच्या दोस्तमंडळींना एक मोठा आधार मिळाला. ब्रँच ऑफिसचा एस्टॅब्लिशमेंट क्लार्क दामले आता बंडाच्या कृपेमुळे कमी दम खाऊ लागला. त्याच्या पेशीटच्या-फड केसीसमधल्या चुका बंडा परस्पर दुरुस्त करू लागला.

कागदात डोकं खुपसून बसलेल्या बंडाला दामलेचा अर्जंट फोन आला. ज्या फोनची बंडा वाट पहात होता तोच तो फोनकॉल होता. फोनवर दामलेशी बोलणं झाल्यावर बंडा मोठ्या खुशीत परतला. समोरच्या गठ्ठयातले कागद त्याने भराभरा वर खाली केले. पाहिजे ते केसपेपर्स दिसल्यावर त्याने आनंदाने शीळ घालीत ते नजरेखाली घालायला सुरवात केली. केसपेपर्ससोबत जोडलेल्या त्या ओळखपत्रांच्या फोटोकडे पहात तो गालात हसला. दोन अडीच तासात त्याने ते हातावेगळे केले, त्याचा चेहरा आनंदाने कमालीचा फुलला होता. फुललेल्या चेहऱ्यावरचा आनंद जर त्याच्या सुमानं पाहिला असता तर तिने त्याच ठिकाणी त्याचं चुंबन घेतलं असतं !

घरी गेल्यावर दरवाज्यात सुमा त्याच्या बछड्याला घेऊन सामोरी आली. बछड्याला उचलून बंडानं त्याचे मटामट मुके घेतले.

'का हो, आज काही विशेष ? अगदी खूप खुषीत दिसता '! सुमाने त्याला विचारलं.

'सुम्या, अगं आज पाहिजे ते कागद हातात आले. तुमच्या दामल्यांनी माझ्या म्हणण्याप्रमाणे चोख काम करून ठेवलं. उद्या त्याला मुद्दाम थँन्म दे ! वस्सऽऽ ! अगदी असं समाधान मला कधीच लाभलं नाही, आणि त्या प्रीत्यर्थ, सुमे आता वन स्वीट कीस !'

'अहो, पण जरा आत चला' त्याला दूर ढकलीत सुमा घरात शिरली.

कॅश सेक्शनच्या काउंटरपुढे उभ्या राहिलेल्या त्या व्यक्तीने आपलं कार्ड कॅशरपुढे टाकलं. कॅशरने कार्डावर दिलेल्या नंबराचे कागद चटकन काढले. कार्डावरची अमाऊंट (रक्कम) कागदावर आहे की नाही हे बघितलं आणि मग समोरच्या व्यक्तीकडे बघितलं. पुन्हा पुन्हा रोखून बघितल्यावर त्याने एकदम आऽऽ वासला. 'नोऽ ऽ सॉरी. तुमच्या ओळखपत्रात वर्णन केल्याप्रमाणे आणि फोटोप्रमाणे तुमचं वर्णन जमत नाही. तुम्हाला पैसे देता येणार नाहीत.'

'म्हणजे ? व्हाट इज धिस नॉन्सेन्स ! ' ती व्यक्ति हात आपटून म्हणाली.

'अहो, ओरडू नका. माझ्या जवळच्या ओळखपत्रात भरल्या-प्रमाणे तुमचे पुढले दोन दात पडलेले नाहीत. यात चक्क म्हटलंय पुढले दोन दात पडले आहेत म्हणून ! '

'मग मी काय दात पाडून आणू ! '

काऊंटरवर जोरात मूठ मारीत ती व्यक्ति ओरडली.

'ते तुम्ही काय वाटेल ते करा ! या फोटोपासवरचा फोटोसुद्धा चांगल्या हसऱ्या चेहऱ्याचा आहे. आजुबाजूचे दात दिसत नाहीत. मी फक्त दोन दात पडलेल्या भडकमकरांना पेमेंट करू शकतो !' कॅशरने नम्रपणे सांगितलं.

कॅश सेक्शनच्या काउंटरपुढे उभे असलेले सद्गृहस्थ म्हणजे भडकमकरच होते. त्यांच्या डोक्यात आता चक्क उजेड पडला. दहा

वर्षापूर्वींचा तो नमुनेदार संवाद त्यांना आठवला. बंडा सबनीसनं आपला सपशेल पराभव केला हे मनातल्या मनात कबूल करीत ते हेड अकौंटन्टकडे गेले. अकौंटन्ट अय्यरसाहेबांनी त्यांचं म्हणणं शांतपणे ऐकलं आणि त्यांचे केसपेपर्स मागवले. कागदावर नजर फिरवून त्यांनी ते भडकमकरांनाच वाचायला दिले.

'पण, तुमच्या ब्रँच ऑफिसच्याच ओळखपत्रात तुमचे दात पडलेत असं चक्क म्हटलंय. कागदावर ब्रँच मॅनेजरची सही पण आहे. तेव्हा मी काही करू शकत नाही.'

'ठीक आहे. फंडाचे पैसे हवेत तेव्हा मला माझे पुढले दोन दात पाडूनच आलं पाहिजे असं दिसतंय!' टकलावरचा घाम पुशीत त्यांनी निरोप घेत म्हटलं. लॉबीमध्ये सिगारेट फुंकीत उभा राहिलेला बंडा सबनीस मुद्दाम त्यांच्या समोर आला, पण त्याच्याकडे नजर न टाकताच ते बाहेर पडले.

बंडा-सुमाकडे आइस्क्रीमच्या प्लेटस्वर प्लेटस् पोटात रचवीत त्याचे भक्तगण भडकमकर पुराणाचा अखेरचा अध्याय ऐकत होते.

'वत्सांनो' - आइस्क्रीमचा भलामोठा घास तोंडात ढकलीत बंडा सांगू लागला, 'भडकमकरांच्या मागोमाग सतत चार दिवस मी फिरुन त्यांच्यावर नजर ठेवीत होतो. रस्त्याने जाताना ते हातवारे काय करीत होते, तोंडातल्या तोंडात पुटपुटत काय होते, मधूनच कपाळावर हात काय मारीत होते! काही विचारू नका! आणि घरातल्या माणसावर ओरडून त्यांनी सारी आळी डोक्यावर घेतली. शेवटी ते मग दंतवैद्य आपट्यांच्या दवाखान्यात शिरलेले मी पाहिले. तोंडावर रुमाल धरुन बाहेर पडलेल्या भडकमकरांना पाहून मित्रांनो, हसून हसून मी बेजार झालो.

'मामाच्या हॉटेलातला सहा कप चहा प्यालो तेव्हा कुठे मला बरं वाटलं. मनाचा हिय्या करुन अत्यंत गंभीर होऊन मी त्यांच्या

घराकडे आलो. तोंडावर रुमाल धरुन ते खिडकीतच उभे होते. मला बघितल्यावर दरवाजा उघडून धावतच ते बाहेरच्या फाटकावर आले.

'थांब ! तिथंच उभा रहा, चांगली कामगिरी केलीस. हे - ते शंभर रुपये मोजून घे, आणि मला पुन्हा तोंड दाखवू नकोस !'

'पैजेचे शंभर रुपये खिशात टाकून मी अबाऊट टर्न केलं आणि चालू लागलो. सहजच मागे वळून बघितलं. भडकमकर साहेबांनी मला कोपरापासून हात जोडले होते. "कारकुना, तुला नमस्कार असो !" मित्रांनो, संपली भडकमकर-कहाणी ' बंडा म्हणाला, आणि हातात धरलेली आइस्क्रीमची प्लेट खाली ठेवीत खीःऽऽखीः करून हसू लागला. त्याच्या नजरेपुढे नक्कीच भडकमकरांची पुढले दोन दात पडलेली रम्य मूर्ति उभी राहिली असावी.

# ५.

# 'कुकडे आणि लुकडे कंपनीच्या ऑफिसात!'

कुकडे आणि लुकडे कंपनीच्या ऑफिसात मी वशिल्याने लागलो. माझ्या नोकरीला आता चांगली सात वर्षं पुरी झालेली आहेत. सिनीयर क्लार्कच्या मी हुद्द्यावर आहे. हेडक्लार्कच्या खालोखाल माझी दादागिरी चालते. आमच्या ऑफिसात मी धरुन सध्या सत्तावीस कारकून आहेत. सत्ताविसात डझनभर पोरी आहेत.

कुकडे माझ्या वडिलांचे म्हणजे अण्णांचे परमदोस्त आहेत. आमचे अण्णा नेहमी सांगतात, हा कुकड्या माझ्या हाताखाली शेअरबाजारात उलाढाली करत होता. कुणाला केव्हा तरी याने टोपी घातली आणि लुकड्यांचा जावई होऊन त्यांच्या मदतीने मोठी कंपनी काढली.

मला वाटतं कुकड्यांच्या टोपी घालण्याचं प्रकरण अण्णाना माहिती असावं या धास्तीनेच त्यांनी अण्णांशी अजून मैत्री ठेवली असावी आणि परिणामी मला नोकरीही मिळाली असावी. काही का असेना,— मला नोकरी तर मिळाली ना! खरदा माझ्या मनात विचार येतो की आमचे अण्णा जरा अप्रामाणिक असते तर बरं झालं असतं. कुकड्यां–

सारखी, त्यानी कुणाला टोपी घातली असती तर आज मी खात्रीने मोटारीतून फिरलो असतो. जाऊ द्या झालं. नशिबाची गोष्ट, दुसरं काय !

मी दोन वेळा बी. ए. नापास झालो असलो तरी माझ्यात नक्की ब्रेन आहे. माझ्या ब्रेनवर कुकडे अगदी खूष आहेत. आमच्या अण्णांच्याकडे तसं बोलताना मी ऐकलं सुद्धा आहे. मला दिडशे रुपये पगार मिळतो. या पगारावर मी फारसा खूष नसलो तरी पुढल्या बढतीकडे माझे डोळे लागले असल्याने मी समाधान मानून आहे. मी लागलो तेव्हा कंपनीत आम्ही अवघे तीन कारकून होतो. आता तीनाचे सत्तावीस झालेत. कुकडे साहेब जरा कंजूष आहेत. सत्ताविसातले सात जण सोडले तर बाकीच्या सर्वांना शंभर ते सव्वाशे पगार मिळतो. आम्हा सातापैकी तीन पोरी आहेत. डिपेना ही स्टेनो आहे. वाडिया आणि तिसरी महाराष्ट्रीयन मुलगी शालू दिघे या टायपीस्ट आहेत.

दरवाजातून प्रवेश केला की प्रथम दिसतात गुंड्याभाऊ काळूपकर. या प्राण्याला गुंड्याभाऊ नांव का ठेवावं याचं मला आश्चर्य वाटतं. साऱ्या ऑफिसात याच्यासारखा शामळू माणूस कुणी नसेल. माझ्यासारखेच ते सिनीयर क्लार्क आहेत. दागजवळचं तीन-चार क्लार्क म्हणजे त्यांचं संस्थान. या संस्थानाला रेकॉर्ड ॲन्ड डिसपॅच असं नामाभिधान आहे; आणि 'आला असेल तर गेला असेल' हे या संस्थानाचं ध्येयवाक्य आहे.

गुंड्याभाऊ केसरीशिवाय काही हातात धरत नाहीत. आंतरराष्ट्रीय राजकारणावर ते निर्भीडपणे बोलायला कचरत नाहीत. दारू जरी पीत नसले तरी दारूबंदी त्यांना बिलकूल मान्य नाही. स्त्रियांनी नोकरी करू नये असं त्यांचं ठाम मत असलं तरी आपल्या मुलीला त्यानी कुकडे आणि लुकडे कंपनीमध्ये नोकरीला लावलं आहे.

त्यांचं एक गोड स्वप्न आहे, त्यात मी म्हणे हिरो आहे आणि त्यांची मालू ही हिरॉईन आहे.

गुंड्याभाऊनंतर महत्त्वाची व्यक्ति म्हणजे आमचे हेडक्लार्क शंकरनाना बर्वे. एकाद्या कोपऱ्यात बसण्यापेक्षा त्यांनी मध्यवर्ती ठिकाण पसंत केलं आहे. त्यांच्या चारी बाजूला नऊ पोरींचा गराडा पडलेला आहे. मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली की भोवतालची संस्थाने बंड करतात असा त्यांचा दावा आहे. आम्ही तीन सिनीयर क्लार्क आणि आमच्या हाताखालचे कारकून यांना ते संस्थान म्हणतात मोक्याच्या जागी बसून माझ्या पोरींच्यावर त्यांनी कडी नजर ठेवली आहे. ते फार लवकर भडकतात, वरच्या पट्टीत बोलतात. शंकरनानांचा भावगीतांवर फार राग आहे. निरनिराळ्या क्लासऽऽ साहेबांच्या बैठकींना ते पडेल तितके पैसे मोजून जातात. त्या बैठकांची वर्णनं ऐकण्यात मीच एकट्यानं टिकाव धरला आहे. मी चलनी नाणं पोरगा आहे असं त्यांचं मत बनलं आहे.

माझं संस्थान पांचजणांचं आहे. त्यात एक टायपिस्ट पोरगी आहे. माझ्या सेक्शनचं नांव आहे जनरल सेक्शन. माझा भक्तगण तसा बराच मोठा आहे, पण हे पांचजण माझ्यासाठी जीव टाकणारे आहेत. ते मला संभाळून घेतात आणि मी त्यांना! शालू दिघे— आमची टायपिस्ट, माझ्या समोरच्या खुर्चीवर बसते. काम असलं तरी आणि नसलं तरी शालीकडे नजरेचा मारा करायला त्यामुळे मला फार सोपं जातं. अजून वर्ष सुद्धा झालं नाही तिच्या नोकरीला. ती आमच्या सेक्शनमध्ये आली आणि आमच्या सेक्शनमध्ये खरोखर जीव आला. मी तिच्याकडे टक लावून बघताना तिने मला चांगलं दोन-चारदा पकडलं. असं झालं की ती माझ्याकडे टपोऱ्या डोळ्यांनी बघते. मी तिच्याकडे केव्हा बघतो हे पकडण्याकरिता तिने माझ्याकडे तिरपे डोळे

करून पहिल्यांदा बघितलं तेव्हा बमऽऽ अशी फर्स्टक्लास लाजली आहे म्हणता की पार ठार झालो. मी माझा चहा नेहमी ट्रेमध्ये मागवतो.

'काय चहा घेणार का ?' असं मी तिला विचारतो आणि तीही घेईन थोडासा असं लाजत मुरकत म्हणते. घड्याळात तिनाचे टोले पडले की तिने गालात हसणे, 'हुऽऽश्य' असा आवाज काढणे आणि मी शिपायाला ट्रेची ऑर्डर फर्माविणे ही नित्याची गोष्ट झाली आहे. समोरासमोर बसत असलो तरी शंकरनानांच्या नजरेत येणार नाही एवढ्याच गप्पा आम्ही मारतो. माझ्या या चॉईसवर माझे चौघे सहकारी अगदी खूष आहेत. 'शऱ्या कितपत प्रगती ?' हा त्यांचा मला दररोजचा प्रश्न आणि माझे 'धीरे धीरे' हे ठराविक उत्तर ! आपणहून मी कधी पोरींच्या मागे धावत नाही. पण या शालू दिघेनी मात्र तिच्या मागे धावायला लावलंय. खरंच शंभरात एक मस्त पोरगी आहे ही ! वर्णाने ती गोरी आहे. डोळे मोठे आहेत अन् त्यात काजळ भरुन आली की ते फार छान वाटतात. नाक थोडंसं लांब आहे, अन् रागावते तेव्हा त्या नाकाचा शेंडा नुकताच शेंदरट रंग धरलेल्या काजूसारखा दिसतो. मशिनवर जलद फिरणारी तिच्या हाताची बोटं लांब आणि छान आहेत. नखांना ती नेहमी मेंदी लावते. बोलताना फार हळू-सावकाश बोलते की शेजारच्या केळकरला ती माझ्याशी काय बोलते ते समजत नाही.

मी शालू दिघेला लौकर गटवावी असं माझ्या चारी भक्तगणांचं म्हणणं आहे. मला संधी मिळावी म्हणून त्यांनी नॅशनल पार्कला ट्रीपही ॲरेंज केली. मला दुसरं काम निघाल्यामुळे मी साफ नकार दिला.

'वैद्यऽऽ अहो, वैद्यऽऽ शरदऽऽ !' नाजूक आवाजातली हाक खास शालूचीच असावी. मी मागे बघितलं. खरंच ती झपझप पावलं टाकीत माझ्याजवळ येत होती.

'तुम्ही ट्रीपला येणार नाही म्हणे ! तुम्ही येणार नसाल तर मी तरी कशाला जाऊ बाई ऽऽ !' शालनचे ते नाजूक शब्द ऐकून मी गार पडलो आणि येतो म्हणून कबूल करुन बसलो. ट्रीपला गेलो, पण भक्तगणांच्या इच्छेप्रमाणे संधीचा लाभ न घेतल्याने त्यांच्या गोड शिव्या खात आलो.

घाऱ्या डोळ्यांची माणसं मला मनापासून आवडत नाहीत. तशी मालू काळूसकर दिसायला हो म्हणजे आपलं रंगारुपानं छान आहे. पहिल्या दृष्टभेटीतच तिच्यावर कुणी आशिक व्हावं. पण मी मात्र तसा पहिल्या भेटीत गारद झालो नाही. शालूच्या अगोदर नोकरीला होती ती ! बरी मुलगी दिसली की तिची ओळख करून घ्यायलाच हवी अशी धडपड करणारा मी नव्हतो. कॉलेजमध्य चांगली पांच वर्षे काढली होती मी. नखरेल, छटेल, लोभस, लाजऱ्या, इतर नाना तऱ्हेच्या-स्वभावाच्या मुली माझ्या ओळखीच्या होत्या. पण कुणाला म्हणून मी माझं हृदय अर्पण केलेलं नव्हतं. मालू माझ्याच क्लासमधली मुलगी. त्या जुन्या ओळखीच्या जोरावर मला अरेतुरेची भाषा ती करी. मी तिला म्हारूताई म्हणत असे. माझ्या चिडवण्याचा तिला राग येत नसे-आला तरी ती मला वाटतं दाखवत नसे. हो, गुंड्याभाऊंचा माझ्यावर डोळा होता ना ! मला गटवण्याचा दोघा बाप-लेकींनी चंग बांधला होता.

खरं सांगायला काय हरकत आहे ! मालू मला आवडायची. तिच्याशी खूप खूप बोलावसं वाटायचं. पण त्या पलीकडे....लग्न ! मालूशी लग्न ही भयंकर गोष्ट होती. घारी होती ना ती ! शालू दिघेला मालूबद्दलचं माझं मत माहीत होतं. मालूला मला शालूबद्दल काय वाटत असावं याची कल्पना असावी. दोघीमधला अबोला त्याची साक्ष देत होता.

शालू दिघेला एकदा सारं स्पष्ट सांगावं, तिच्याशिवाय माझी

दुसरी कुणी माझ्या हृदयाची स्वामिनी नाही हे पटवून द्यावं हे मी मनात ठरवी. दादर स्टेशनवर उतरलं की धावत पळत तिला गाठावं–फॅमिली रूममध्ये नेऊन मन उघड करून हा लपंडाव बंद करावा असे सारखे वाटे; पण प्रत्यक्ष संभाषणात माझ्या तोंडून भलतच काही तरी निघे.

शालू-मालू माझ्या जीवनातला एक मोठा प्रश्न बनला होता. माझ्या मनाचा दुबळेपणा आड येत होता. मालूला दुखवावं कसं ! तिचे प्रेम लाथाडून शालूला गटवावं कसं ? मी विचार करून डोकं दुखवत होतो. शेवटी विरंगुळा म्हणून माथेरानला पळ काढला. चार दिवसांनी घरी परत आलो आणि अण्णा - आईनी माझ्यावर ॲटम बॉम्ब टाकला.

आणि मी खरोखरच सर्द झालो. गुंड्याभाऊंनी अण्णांचा किल्ला सर केलेला होता. अण्णा-आई यांना मालू पूर्ण पसंत पडली होती. माझ्या गैरहजेरीत म्हणे मीच गुंड्याभाऊना आणि मालूला अण्णांना भेटायला सांगितलं होतं. सुनबाईचं कौतुक करीत बसलेल्या अण्णा आईवर आता जर स्फूटनीक सोडला नाही तर गुंड्याभाऊंचा ॲटमबॉंब मला भुईसपाट करणार हे ओळखून मी शालूबद्दल त्यांना सारं सांगितलं. अण्णांना विचारात पडलेले पाहून मी झटकन् सटकलो.

ऑफिसात पोचलो तो तीन वाजले होते. शालूला गाठण्याकरिता तिच्याजवळ जातो तो तिने एकदम तोंड फिरवले. तिची समजूत घालणार तोच कुकड्यांचं आमंत्रण आलं. सारे दोस्त आणि कारकून माझ्याकडे पहाताना दिसले. मालूनं ऑफिसमध्ये पण माझी विकेट उडवली होती तर !

कुकड्यांचं अभिनंदन न स्वीकारताच मी बाहेर आलो. शालू दिघे जागेवर नव्हती. मी ऑफिसबाहेर पडलो. एका रुटच्या क्यूमध्ये शालू उभी होती. मी तिला हाक मारणार तोच बस आली. ती आत

शिरणार तेवढ्यात मी तिचा दंड धरून तिला मागे खेचली. आश्चर्याने माझ्याकडे अन् शालूकडे बघणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करून मी तिला घेऊन बाजूला गेलो.

तिनं माझ्याकडे मोठे डोळे करून बघितलं आणि ती आपल्या नखांशी चाळा करीत नुसती उभी राहिली.

'शालू तुझ्याशी खूप बोलायचंय मला ! कुठं येतेस ? तुझ्या घरीच जाऊया ! तुझ्या ताईची आज डे शिफ्ट असेल!' कुणीतरी सुरुवात करायलाच हवी म्हणून मी तिला विचारलं.

मानेनेच तिचा होकार मिळाला. मी टॅक्सीला हात केला.

'शूऽऽ टॅक्सी कशाला ? पैसे फार झालेत वाटतं ! अगदी वेडबंबू आहात झालं ! फोर्टपासून दादरपर्यंत जायचे दहा रुपये होतील तेव्हा कळेल.'

'असू दे ! तुझी समजूत घालण्याकरिता पंचवीस जरी खर्च आले तरी मला पर्वा नाही.'

'तुम्हाला नसली तरी मला आहेना !' मी तिच्याकडे रोखून बघितलं आणि ती पुन्हा छान लाजली. मी ओळखलं आपला अर्धा किल्ला इथेच सर झालाय म्हणून. तडजोड म्हणून दादरला उतरल्यावर टॅक्सी करायचं ठरलं.

गाडीत बसल्यावर मी तिला सारं समजावून सांगत होतो आणि ती नुसती ऐकत होती. तिने गाल फुगवले होते आणि रागावण्याचा अभिनय चालवला होता. दादर स्टेशन येईपर्यंत ती अक्षरसुद्धा बोलली नाही. मी मनात म्हटलं, 'तंत्र पुन्हा बिघडलेलं दिसतंय.'

मी बोलल्याप्रमाणे टॅक्सी ठरवलीच. शिवाजी पार्ककडे गाडी येई-पर्यंत ती अंग चोरून बसली होती आणि नखांशी चाळा करीत होती. मी तिच्या तोंडाकडे पहात बसलो होतो, तेवढ्यात बाहेर तिचं लक्ष गेलं. 'कृपा करून गाडी इथेच थांबवा,' मी ड्रायव्हरला तसा इशारा केला.

'का ग ऽऽ इथसं उतरवलंस' बील चुकते करीत मी विचारलं.

'मग काय वाडीत घालू होय टॅक्सी ? अगोदरच सारी टिका-कोट्या करताहेत त्यात नसती भर !' मंगल टेरेसचे तीन जिने चढल्या. वर एकदाचा तिचा ब्लॉक आला. दारावरचं कुलूप काढून आम्ही आत शिरलो.

'बस हं. मी कपडे बदलून आलेच आता.' ती स्वयंपाकघरात निघून गेली. पूर्वी मी दोन-चारदा आलो तेव्हा घरातल्या साऱ्या चिजा तिने मला आवडीने दाखवल्या होत्या. कोपऱ्यातला नवा रेडिओ पहाताच मी उठलो आणि रेडिओ लावला.

'काय कसा काय आहे नवा रेडिओ ?' शालनचे गोड शब्द कानी पडताच मी मागे बघितलं. स्वयंपाकघराच्या दारात ती उभी राहून विचारीत होती. तिने नेसलेली वायल मोठी छान होती आणि त्यात ती सुन्दर दिसत होती.

'त्या रेडियोचं काय घेऊन बसलीस. मला या रेडियोचे सूर आज ऐकायचेत ' मी तिला जवळ घेत म्हणालो. ती दूर सरायचा प्रयत्न करीत असतानाच मी तिच्या ओठाला ओठ भिडवले.

आमच्या स्वस्तिकलेनमध्ये मी टॅक्सी घेऊन शिरलो अन् गाडीतून उतरताच शालनचा हात पकडून बील चुकवले. तमाम गल्लीतील गॅलऱ्या हाऊसफुल्ल होत्या. अण्णा, आई आणि माझी सारी भावंडं गॅलरीतून डोळे विस्फारून पहात होती. विजयी मुद्रेनं मी घरात शिरलो. 'अण्णा - आई, ही तुमची सूनबाई ! शालन पाय धर दोघांचे !' मी म्हटलं.

'काय ग मी म्हटलं ना तुला की हे पोरटं आता नकटी फेफर्डी सून तुला आणील म्हणून !' अण्णा तपकीर कोंबत म्हणाले.

'असू देऽऽ येऽऽ पोरी ये आत. मला जशी हवी तशीच पोरगी दिसते ही.' आई तिला घरात नेत म्हणाली.

# ६.

# शोध

भल्या सकाळी गांव जागा झाला तो नानाकाकाच्या ओरड्या-मुळे. अर्धा गांव झोपला होता. उठला होता त्यात कुणाचं नीट तोंड धुणं पण झालेलं नव्हतं. पण नानाकाकाच्या घरचा ओरडा कानी आल्यामुळे जो तो असेल तसा त्यांच्या वाड्यावर धावला.

नानाकाका आणि मोठ्या काकींनी रडत रडत जमलेल्याना जे सांगितलं त्याचं सारं असं होतं की भल्या पहाटेला मोठी काकी उठली तेव्हा घराचा पुढला मोठा दरवाजा साफ उघडा होता. घाबरून तिने नानाकाकाला उठवलं. काय गोंधळ आहे हे न कळून मग दोघांनी डाराडूर झोपलेल्या पुत्ररत्नाला म्हणजे बापूला उठवलं होतं.

तिघांनी साऱ्या घरभर तपास केला. घरातलं काही गेलं नव्हतं. सर्व काही जागच्या जागी होतं. गडी पण सुखाने झोप घेत अंगणात पडला होता. घरात चोर काही शिरला नव्हता. फक्त घरातले एक माणूस नाहीसे झालेले होते. नानाकाकाची पुतणी विमल कुठे दिसत नव्हती. तिचे सारे कपडे जागेवर होते. तिच्या खोलीतल्या एकूण एक वस्तू जागेवरच होत्या. टेबलावरचा दिवा पेटलेलाच होता. टेबलावर

कानातल्या सोन्याच्या रिंगा होत्या, जवळच सोन्याच्या दोन बांगड्या आणि गळयातला हार या वस्तू काढून ठेवल्यासारख्या पडल्या होत्या. गजराच्या घड्याळाखाली एक चिटोरे पडले होते. बापूच्या छातीत धडधडायला लागले. मोठ्या काकीला वाटले, काल कार्टीने दम दिल्याप्रमाणे जीवाचे बरेवाईट केले नमावेना ! सकाळी आणि रात्री जेवताना तिचे त्या दोघांशी चांगलेच भांडण जुंपले होते. नुसत्या कुंडलीवरून जुळ पहाणारे लग्न जर मोडणार नसतील तर आपण जीव देवू; पण लग्न करणार नाही, असं तिने त्याना ठणठावून सांगितले होते.

हे सारे आठवल्यामुळेच बापू पण गांगरून गेला होता. बापूने भीतभीत ते चिटोरं उचललं. खालची सही विमलचीच होती. अधाशा-सारखं ते चिटोरं त्यानं मनातल्या मनात वाचलं.

त्याचा चेहरा बघून नानाकाकाच्या आणि काकीच्या काळजात कसंसंच झालं.

‘ मेल्या ऽ ऽ वाच तरी !’ काकी तणतणली.

गळ्याशी आलेला हुंदका आवरीत बापूने चिट्ठीवर नजर फिरवली आणि मग वाचायला सुरूवात केली —

‘ प्रिय बापूभैया,’

मला आयुष्याचा कंटाळा आलाय. कशाला जगायचं ? कुणा-साठी जगायचं ? शिकून सवरून सुद्धा आम्हा मुलींना स्वातंत्र्य नाही. आमचं जीवाभावाचं माणूस तुम्ही निवडायचं. आमच्या मनाचा कुणीच विचार करीत नाही. भैया, दिसत असून तू आंधळयासारखा वागतोस. माझं माणूस तुला कळायला हवं होतं. तू ते मिळवून द्यायच सोडून काका-काकीनाच साथ दिलीस. तुमच्यासाठी कुणाच्या तरी

गळ्यात माळ घालून पुढलं आयुष्य कंठण्यापेक्षा तुमचं हे जगच मी सोडून जात आहे. माझा शोध-सारं काही संपल्यावर शोध कसला ?

तुझी भगिनी,

विमल-'

बापूच्या तोंडून ' तुमचं हे जगच मी सोडून जात आहे ' हे ऐकल्यावर मोठी काकी आणि नानाकाकांनी हंबरडा फोडला. बापूही त्यात सामील झाला. झोपेतून जागा झालेल्या गज्यालाही आता रहावलं नाही. त्यानेही ' माझे बाय गऽऽ ' असा सूर धरला. या ओरड्यामुळे गांव जागा झाला आणि नानाकाकांच्या वाड्यासमोर धावत येऊन जमा झाला.

जमलेल्या मंडळींपैकी बऱ्याच जणांनी विमलचं ते पत्र वाचलं. टेबलावर काढून ठेवलेले सोन्याचे दागिने तिने जिवाचं बरं वाईट केलं याला साक्ष देत होते. घरून पळून जाणाऱ्या मुली पैसाअडका, दागिने, कपडे जे नेता येईल ते घेऊन नेहमी पळतात; पण विमल त्यातली पोरगी नव्हती. मनाविरूद्ध होणारं लग्न टाळण्यासाठी तिने जीवच दिला असावा ! पत्र पुन्हा पुन्हा वाचून सर्वांची खात्री पटली होती.

' चला, गांवातल्या साऱ्या विहिरी तपासू या. निदान बॉडी तरी लौकर हाती येईल—' कुणीतरी बोललं.

आणि पुन्हा नानाकाका आणि काकींनी दुःखाने हंबरडा फोडला एवढा कर्ता—सवरता बापू; पण त्यालाही रडे आवरेना.

गांवातली सगळी कर्ती डोकी नानाकाकांच्या ओटीवर जमली होती. गांवातल्या सोसायटीचे सेक्रेटरी रामराव देव, देवळांचे ट्रस्टी अण्णा गावंड, भजनीमंडळाचा सदा भुवड, गांवचा वाणी रामजी शहा, गांवचे गुरुजी बासू भटजी, हरिजन मंडळींपैकी महादबा, सायनाक आणि बापूची मित्रमंडळी वासू, रघू, दत्तू जगू इत्यादि. फक्त

नव्हते ते एक दादासाहेब राजे-सोसायटीचे अध्यक्ष आणि त्यांचा भाऊ अनंता उर्फ अंत्या-गांवातला एकुलता एक वकील.

'दादासाहेब आणि अनंता नाही दिसत ते ? त्यांना कळलं नाही वाटतं ?' कर्त्या मंडळीवरुन नजर फिरवीत रामरावानी विचारलं.

'दादासाहेब पुण्याला गेलेत वैनींनाआयला देऊन !' बापूच्या गड्याने माहिती पुरविली.

'आणि अनंता कुठायऽऽ? का वाड्यात राहिलाय घरात कुणी नाही म्हणून ?'

'अनंता गेलाय कसल्यातरी परिषदेला चिपळूणला. आठ दिवस येणार नाही म्हणाला.' रघु भोईरने बातमी दिली.

'तो तेवढा असता तर बरे झाले असते ऽ ऽ ते एक चलाख टाळके आहे गांवातले !' वासूभटजी नाकात तपकीर कोंबीत म्हणाले.

बरं ते जाऊ द्या. आहेत त्यानी तर विचार करा. पोरगी घरात नाही. जीव दिला यात शंकाच नाही !' रामराव उद्गारले.

'हो, ते तर ठरल्यासारखेच आहे. पत्र बोलके आहे. मला वाटते वाटणी करुन चार ठिकाणी माणसे पाठवायला हवीत'-अण्णा।

'रामराव, तुम्हीच पाठवा कुठे पाठवायचे ते ! दादासाहेबांच्या जागी आज तुम्ही आहात-' कुणीतरी सूचना केली.

रामरावानी लगेच सूत्रे आपल्या हातात घेतली. सदा भुवडच्या बरोबर चार माणसे देऊन त्याना रेल्वे स्टेशनमध्ये चौकशी करायला पाठवले. गांवातल्या मोठ्या विहिरीवर दोन दोन जण पाठवून दिले. इस्पितळात वॉर्डबॉय असलेल्या नवनीतभाईला चार माणसे घेऊन मुंबईतली इस्पितळे धुंडायला पाठवलं. रामरावाच्या आदेशाबरोबर सगळेजण भराभर बाहेर पडले.

'च्यायला ! आपण सगळे नुसते हे आहोत ऽ ऽ!'

'म्हणजे ?' सगळ्याना 'हे' म्हणणाऱ्या अण्णा गावंडला कुणी तरी विचारलं.

अरे, जीव देणारा काय फक्त पाण्यात नाही तर रेल्वेखालीच जीव देईल ?'

'आहे-आहेऽ अंत्यासारखा वकील हजर नसला तरी अण्णाला वकिली डावपेच समजतात म्हटले-' वासू भट म्हणाला.

'लेका भटा, तू काय कमी आहेस ? दोन वर्षांमागे तुझ्या मेव्हणीने जाळून घेतले तेव्हा पोलिसाना तू काय कमी बनवलेस ?'

'काय लोक आहात ! प्रसंग काय, कशासाठी जमलो आहोत काही विचार ? पण अण्णा म्हणतोय त्यात तथ्य आहे. पाड्याकडे जाताना एक वडाचं झाड लागतं बघा. चार-सहा वर्षांमागे चोरट्यानी बाबू माळयाला त्याच्यावरच फासावर लटकावला होता.' रामरावानी मंडळीना चवीनं माहिती दिली.

'हाऽऽ ! ते झाड फास घ्यायला योग्य आहे आणि वैतीच्या बांधावरचा वाकडा आंबा काय वाईट आहे ? '

'ठीक तर ! ही गेलेली मंडळी येईपर्यंत आपण पाड्यावर जाऊया. जाताना त्या झाडावर पण नजर टाकू.' रामराव उठत म्हणाले.

'बाप्या, दोनचार जण नानाकाकाजवळ आहेतच. आपण जाऊ पाड्यावर. दोनचार विहिरी एका बाजूला आहेत. न जाणो ! तिथेसुद्धा गेली असेल जीव द्यायला ! पाड्याची चांगली माहितगार आहे ती ! बरोबर आहे ना अण्णा ?' धोतराने नाक साफ करीत अण्णानी मान हलवीत दुजोरा दिला. रघू - वासूच्या खांद्यावर हात टेकून आधार घेत बापू अंगणात उतरला. दहाबारा जणांची ती मिरवणूक गांवाच्या बाहेर पाड्याकडे निघाली.

गांवापासून पाड्याकडचे अंतर चांगले मैलभर होते. पाड्यावर

मोजकीच घरे होती. दादासाहेबांचा जुना वाडा पाड्यावरच्या बागेजवळच होता. बागेकडे लक्ष देण्यासाठी पाड्यावरही त्यांना रहावे लागे.

आता चांगले उजाडले होते. पायाखालचा रस्ता स्पष्ट दिसत होता. गांवाबाहेर आल्यावर मात्र त्यांना पाऊल वाटेने हळूहळू जावे लागले. लांबवर असलेल्या मोटांचा कुईऽकुई असा आवाज ऐकू येत होता. बैलगाड्यामुळे आणखी दोन वाटा तयार झाल्या होत्या. मधूनच एखादे जीवाणू सरकन् समोरून जात होते.

' बाप्या, तू एवढा शहाणासुर्ता आणि इतक्या थराला गोष्टी येईपर्यंत गप्प कसा बसलास ? आजकालच्या पोरी या. नव्हते तिच्या मनात तर थांबवायचे लग्न !' रामरावांनी जाता जाता प्रश्न केला.

' नानांच्या आणि काकींच्या पुढे मी तरी काय करणार ? त्यात तिच्या वडिलांची भाऊसाहेबांची पत्रावर पत्रे, 'इंटर झालीय. आता शिक्षण पुरे. त्या स्थळाचं काय झालं ? नक्की करून टाका. मी आठ पंधरा दिवसात येतो–' बापूने बाजू मांडली.

' आता ये म्हणावे तिच्या तेराव्याला ! सगळं जग सुधारले पण तुम्ही कोकणी भटं काही सुधरायची नाहीत !' गावंडाने रागाने म्हटलं.

आणि कायरे बाप्या, तिच्या मनात कोण भरला हे सुद्धा तुला कळेना —' दत्तूनेहि आता जोरात विचारलं.

' कसे कळणार ? तुमच्यापैकी कुणी असावा तर ती तुमच्याकडे बघत पण नव्हती.'

' काऽअंत्या नव्हता तिला आठवण्यासारखा ? तुमच्या घरी जास्ती येणारा तोच होता. तुमच्यापासून दोन घरे पलिकडे तर तो रहातो ना !'

'शिवाय वैनीसाहेबांचे आणि तिचे तर चांगले मेतकूट जमलेले. सारखी वैनीसाहेबाबरोबर असायची लुडबुडत—'

' हे मात्र माझ्या टाळक्यात कधी आले नाही. अनंता तसा योग्यच होता—'

'तसा काय म्हणून ? अगदी एकदम सूट होता-मॅचींग होता तिला-' दत्तूबरोबर वासूही त्याला दुजोरा देऊ लागला.

'पण तो तर मला कधी एका शब्दानेहि बोलला नाही-' बापूने सांगितले

'अरे, बोलेल कसा ? तो हाडकंखाऊ आणि तुम्ही ताकाची कढीखाऊ ! त्याच्या काय नि तिच्या काय; मनात असलं तरी तुम्हाला सांगणार कोण ? आता त्यांचे तसं काही असेल तर तो आल्यावर तिचं हे असं काही झालेलं कळलं तर काय वाटेल त्याला ? अरे, आपल्या हातानीच मित्राचं सुख हिरावलंस ?' दत्तू तावातावाने बडबडला.

'पुरे, पुरे ! तसं असेल तर त्याचे पाय धरून क्षमा मागीन मी. मी अगदी थकून गेलोय. माझा मेंदू बधिर बनलाय.'

बापूला आता रडं आवरेना. तो जागच्या जागी खाली बसला.

'काय मित्र आहात की शत्रू ? झालं ते झालं ! बापू, पाड्यावर जायचं नसलं तर असेच मागे फिरूया. उगाच तुझं, ते दृश्य बघून आणखी फास नको नसती बला व्हायची-' रामरावानी पुन्हा सर्वांना चापले.

'नको. जाऊया हळूहळू. अनंताच्या ओटीवर मी बसेन. तुम्ही शोध घेऊन या. बघायचे ते अशाने चुकणार का ?'

'ठीक ठीक. एवढे जवळ आलोय तर जाऊया पाड्यापर्यंत-'

बापूला सांभाळीत मंडळी पाड्यावर आली. बाबा वैतीचा मळा टाकून ते पुढे निघाले. वैतीच्या मळ्यामध्ये जगू आणि वासू भटजी शिरले.

दादासाहेबांच्या बागेचा गडी जणु कुणाची वाट पहात असावं तसा बसला होता. अचानक या मंडळींना समोर पाहून तो चमकला. हातातली चंची उघडीत त्याने तोंडात पानाचा तोबरा भरला आणि मग सुपारीची खांड कातरीत एका मागोमाग तुकडे तोंडात टाकू लागला.

'कायरे, अगदी निवांत बसलायस ? मालक नसले की करा बैको आराम–' अण्णानी त्याला फटकारले.

'मालकलोक नसणार ना वाड्यावर ?' रामरावानी विचारले.

'नायबाऽऽ ! दादासाब आणि वैनीबाई गेलीत पुण्याला. धाकलं धनी मात्र काल रातीला आल्यात वाटतं !'

'आहेत ना ? बरं झालं ! त्यालाच काय ते सांगायचं राहिलं होतं. कायरे, सकाळी इथल्या बावडीत—'

'इथं कोण येतंय हो, मरायला बावडीत ?' गडी म्हणाला आणि गालात हसला. त्याच्याकडे दुर्लक्ष करीत रघू, दत्तू पायऱ्या चढून ओटीवर आले.

'अंतू , ओऽ अनंताऽ ! अहो वकीलसाहेब दार उघडा म्हटलं. च्यायला ! दिवस उजाडलाय तरी झोपलाय लेकाचा—' रघू दरवाजा ठोकीत ओरडत होता. मागून आलेल्या सर्वांनीच मग अनंताच्या नांवाचा गजर केला. अनंताने दरवाजा उघडला. दारात एवढी मंडळी पाहून तो चमकलाच.

'अरे, आहे काय आज ?'-मोर्चा कसला आणलाय आज ?'

'अंत्या, तू म्हणजे कमाल आहेस ! अरे, गांवात तिथे गोंधळ उडून राहिलाय. नानाकाकाच्या विमलने कुठेतरी जीव दिलाय !'

'काय म्हणतोस ? विमलने जीव दिला ? कुणी सांगितलं तुम्हाला ?'

'खोटं की काय ? हा बघ बापूच आलाय इथं ! बाप्या चिठ्ठी काढ ती विमलची.–'

बापू अगदी रडायच्या बेताला आला होता. अनंताच्या गळ्याला मिठी मारीत त्याने हुदके द्यायला सुरुवात केली. अनंता गोंधळून गेला होता. 'बापू, बापू, जरा गप्प हो पाहू. आण ती चिठ्ठी.–'

बापूच्या कडची चिठ्ठी अनंताच्या हाती देत रामराव म्हणाले.

अनंताने ती चिठ्ठी वाचल्यावर कपाळावर हात मारीत म्हटलं, ‘ कमाल आहे या पोरीची !’

‘ तुलासुद्धा वाईट वाटते ना ?’ बापूने त्याचे खांदे हलवीत विचारले.

अनंता अवाक् होऊन खुर्चीत मटकन् बसला. त्याने डोकं हातानी गच्च पकडलं होतं. सारेजण त्याच्याकडे पाहू लागले. त्याला चांगलाच धक्का बसला असावा.

त्याचवेळी आतल्या खोलीत काहीतरी धाडकन् पडल्याचा आवाज आला. सगळेच जण एकदम दचकले.

‘ च्यायला, मांजरबिंजर शिरलंय का घरात ?’ तपकिरीचा बार भरीत वासूभटजी म्हणाले आणि मग स्वयंपाकघराकडे धावले.

‘ चोर डाकू ! मंडळी, इकडे या. धावत या.’ वासूभटजी आतून ओरडत होते.

अनंताला सोडून बापूपासून सर्वजण स्वयंपाकघराकडे धावले. दारात पोचल्यावर सर्वजण ‘ आ ’ वासून बघत राहिले.

दुधाचं मोठं भांडं पार उपडं झालेलं होतं. दुधाची नदी वहात होती विमल खाली मान घालून थरथरत उभी होती. तिचं एक मनगट वासूभटजींनी घट्ट धरून ठेवलं होतं.

बापूने चकीत होऊन विमलकडे पाहिलं. तिच्या गळ्यातलं नवं कोरं सोन्याचं मंगळसूत्र सकाळच्या कोवळ्या उन्हात चमचम करीत होतं.

७.

# रंगला खेळ असा !

'अहो, उठना ना ?'

विलासरावांनी डोळे उघडून बघितलं, त्यांची लाडकी बायको त्यांच्या अंगावर रेलून त्यांना उठवीत होती. उठण्याऐवजी त्यांनी तिलाच अंगाशी लपेटून घेतले आणि तिच्या गालाजवळ ओठ आणले.

'शीऽ तोंड धुवा आधी !' त्यांना दूर लोटून तिने म्हटले.

'अहो, आज ऑफिसला जायचंय लक्षात आहे ना ?'

'अरेच्याऽ ! आज पासून ऑफिस चालू नाही का ?'

'म्हणून तर उठवतेय. लौकर उठा. आठ वाजायला आले.'

उठता उठता विलासरावांनी तिला परत मिठीत घ्यायचा प्रयत्न चालवला. त्यांना ढकलून यामिनी स्वयंपाकघरात पळाली. चाळीशी उलटलेल्या विलासराव मोहित्यांची यामिनी ही तिसरी बायको. ऐन पंचविशीतल्या यामिनीबरोबर नुकताच हनीमून उरकून ते परत मुंबईत आले होते. दोन महिने ते औरंगाबादच्या परिसरात भटकत होते. अजंठा वेरुळचं सौंदर्य तारुण्याने मुसमुसलेल्या यामिनीसह पहाताना त्यांना साऱ्या जगाचा विसर पडला होता.

दुसऱ्या पत्नीचा मृत्यु झाल्यानंतर त्यांना परत लग्नाची इच्छा राहिली नव्हती. पहिल्या दोन्ही बायकांना एकेक मुलगी झाली होती. दहा वर्षांच्या शोभाला आणि सात वर्षांच्या रेखाला त्यांनी पुण्याला आपल्या म्हाताऱ्या मावशीकडे पाठवून दिले होते. गेली तीन वर्षं ते नातेवाईक आणि मित्रांच्या आग्रहाला बळी न पडता एकलेपणाने रहात होते. गडी सकाळी झाडलोट करून जाई. स्वयंपाकी त्यांचं जेवण करून ठेवी. दोन बायकांच्या मृत्युमुळे त्यांना विरक्ती आली होती. आपल्या नशिबात स्त्री सुख नाही आणि म्हणूनच लग्नाच्या भानगडीत परत पडायचं नाही असं मनोमन त्यांनी ठरवलं. यामिनीची आणि त्यांची गाठ बाजीरावामुळे म्हणजे तिच्या चुलत भावामुळे पडली होती.

दरमहा ते आपल्या मुलींना भेटायला स्वतःच्या कारने जात. असेच ते पुण्याहून मुलींना भेटून रात्रीच्या वेळी येत होते. वाटेत त्यांना किंचित् डुलकी आली आणि स्टीअरींगवरचा ताबा सुटला. गाडी मैलाच्या दगडाला घसटत गेली आणि एका बाजूला झाडावर आपटली. थोडक्यातच ते वाचले. योगायोगाने ते दरवाजाबाहेर फेकले गेले. किंचित् खरचटणं आणि थोडासा मुका मार यावर निभावलं. निर्मनुष्य रस्त्यावर ते एखादे वाहन येते का, याची वाट पहात होते. बाजीराव पाटील आपल्या मित्राबरोबर मुंबईला परत चालला होता. रस्त्यावर उभ्या राहिलेल्या विलासरावांना पाहून त्याने चौकशी केली. त्यांची गाडी आपल्या मित्राच्या गॅरेजला रिपेअरिंगला टाकून, त्यांना घेऊन मुंबईला आपल्या बिऱ्हाडात आला.

नुकतंच स्नान केल्यामुळे यामिनी मोठी सुंदर दिसत होती. बडे पाहुणे आलेत, असं बाजीरावाने सांगितल्यामुळे तिने घाईगर्दीने का होईना चहाबरोबर कांदेपोहे बनविले. बाजीरावाच्या आग्रहामुळे तिलाच बशा घेऊन बाहेर यावं लागलं होतं. गोऱ्यागोमट्या आणि तारुण्याने भरलेल्या यामिनीला पाहून विलासराव खरोखर देहभान विसरले.

बाजीरावाच्या नजरेने ती गोष्ट चटकन् टिपली. विलासरावांची एकूण माहिती कळल्यावर आपल्या सुंदर बहिणीचा हात त्यांनी विलासरावांच्या हातात दिला. यामिनीसारखी तरुण अन् सुंदर स्त्री मिळणार असं दिसताच विलासरावांचा पूर्वीचा विचार बदलला. आणि यामिनी विलासरावांची अर्धांगी बनली. विलासरावांच्या तिसऱ्या लग्नाचा असा हा अितिहास होता.

हनीमून मूड मधल्या विलासरावांना ऑफिसला जायचं जिवावर आलं होतं. पण जबाबदारीची जाणीव ठेवून त्यांना उठावं लागलं. विलासरावांचं चहापान होतय तोच दरवाज्याची बेल वाजली आणि यामिनीच्या अपेक्षेप्रमाणे बाजीराव दारात उभा होता.

'काय यामिनीबाई, झाला का तुमचा हनीमून' दारातूनच बाजीराव विचारत होता.

'इश्श्य् बाहीतरी काय बोलतोस' यामिनी मुरकत म्हणाली.

'च्यायला, हवं ते विचारलं तर त्या गांवचीच नाही असं करतेस! बरं जाऊंदे. आम्ही आपलं साहेबानाच विचारतो. मग कसं काय रावसाहेब, तब्येतपाणी काय म्हणतेय? प्रवास झक्क झाला ना?'

खरं म्हटलं तर यावेळी बाजीरावाचं येणं विलासरावांना आवडलं नव्हतं. पण करतात काय? बायकोचा भाऊ पडला ना!

'हो तर. झक्क म्हणजे काय? फार उत्तम! तुमची खूप आठवण झाली यामिनीला. तुम्ही, राव बरोबर असायला हवं होतं. औरंगाबाद-मधलं प्रत्येक स्थळ बघताना तुमची आठवण काढत होतो बघा.'

'काय तोंड देखलं बोलता साहेब. हनीमून ट्रिपला बायकोच्या भावाची अडगळ-अडचण झाली असती. हो, तुम्ही खूप चला म्हटलं असतं पण आम्हाला काय पाचपोच आहे की नाही." बाजीरावाने लांबलचक हास्य करून उत्तर दिलं.

बाजीरावाच्या या बोलण्यावर मान वेळावून यामिनी आत गेली. चहा घेऊन बाजीराव निघून गेला. विलासरावहि ऑफिसची तयारी करु लागले. इतके दिवस थंड पडलेल्या टेलिफोनची डायल फिरली आणि आपण दहासाडेदहापर्यंत ऑफिसला येत असल्याचा निरोप त्यांनी दिला. आणि त्यानंतर भराभर कॉल येऊ लागले. पानावर बसेपर्यंत त्यांच्या मित्रमंडळीचे फोन येत राहिले. संध्याकाळी मित्रमंडळी आपल्याला भेटायला येणार या अंदाजाने त्यानी यामिनीला चहा फराळाची व्यवस्था करून ठेवायला सांगितलं. यामिनीला सोडून ऑफिसला जायला त्यांच्या जीवावर आलं. त्यांच्या मिठीतून सुटका करुन घ्यायला यामिनीला पण फार प्रयास पडले. अखेर विलासराव मोहिते कारमध्ये बसून ऑफिसकडे निघाले.

ऑफिसात पोहोचल्यावर आपल्या केबिनमध्ये पाहुण्याला पाहून ते चकित झाले. बेळगांवचा त्यांचा मित्र पंधरा वर्षांनी त्याना भेटत होता.

'गुड मॉर्नींग ग्रेट मॅन, लग्न मानवलेलं दिसतय ! कसा काय झाला आपला हनीमून ?'

'अरे जरा धीर तर धरशील ? मुंबईत आला नाहीस तो माझ्या हनीमूनची बातमीहि काढून घेतलीस. कमाल आहे ! पोलिस खात्यात तर शिरला नाहीस ना ?' विलासरावांनी विचारले.

'एक्झ्याक्टली करेक्ट. सध्या मी ए. एस. पी. म्हणून सोलापूर भागात आलोय. तुझ्याकडे खास काम आहे म्हणून मी आलोय. तुझा पत्ता माहिती असता तर घरीच उतरणार होतो. पण आलो नाही ते बरं झालं. आपली स्वारी हनीमूनमध्ये मश्गूल होती. उगाचच रंगचा भंग व्हायचा—'

'अरे हट भलतच काय बोलतोस, हा माझा तिसरा हनीमून आहे म्हटलं. बरं ते जाऊदे, तुझ्या कामाचं बोल. होण्यासारखं असलं

तर लगेच करून टाकू !' विलासरावांनी शिपायाला थंड पेयाची ऑर्डर देत म्हटलं.

'त्याचं काय आहे–कोका कोला तोंडाला लावत इनामदारांनी सुरूवात केली–गेली सात वर्षं निरनिराळे फसवणूकीचे गुन्हे करणारी टोळी मुंबईत आली असल्याचं आम्ही शोधून काढलंय. त्यांच्या गुन्ह्याची वर्तमानपत्रातली ही कात्रणं !– विलासरावांपुढे पाचसहा कात्रणं टाकून इनामदारसाहेब जरा थांबले. दोन कात्रणातला मजकूर वाचून विलासरावाला घाम फुटला.

'घाबरलास ? दोन मुलींचा बाप आणि नुकतच लग्न करून बसलेल्या तुझ्यासारखा माणूस यांत सापडावा आणि तोही माझा मित्र निघावा, मी खरोखरच हादरून गेलो होतो. इतक्या लौकर तुझ्यावर-काही प्रसंग येईल असं मला तरी वाटत नाही पण तू काळजी घ्यायला हवी. आता अधिक जबाबदारी तुझ्या अंगावर पडली आहे. म्हणून बी ऽऽ केअरफूल. इथल्या सी. आय. डी. खात्याला मी सूचना दिलीच आहे. तरी पण मी तुझी काही व्यवस्था करावी म्हणतोय. तुझ्या बायकोची काही हरकत नसल्यास पाहुणा म्हणून मी तुझ्या घरी मुक्काम करायला यावं असं म्हणतोय. संध्याकाळी मी घरी येईन. मला आग्रह करून रहायला गळ घाल. पुढचं मी बघून घेईन.'

सारा दिवस बेचैनीत गेल्यामुळे विलासराव थकून गेले. थोड्या–फार सूचना करुन त्यांनी घरी जायचं ठरवलं. पाच वाजताच बेल वाजल्यामुळे यामिनीने विलासरावच आले म्हणून दाराकडे धाव घेतली. विलासरावांचा उतरलेला चेहरा पहाताच ती घाबरुन गेली.

'बरं वाटत नाही का तुम्हाला ? डॉक्टरांना फोन करुन बोलावू का ? नाही तर भैय्यालाच फोन करुन बोलावते.' यामिनीची व्याकुळता पाहून विलासरावांच्या डोळयात पाणी आलं.

'कुणालाही बोलावू नकोस. तू नुसती माझ्याजवळ बसून रहा.'

९५३१९ २४२५८८
मराठी



'बरं बसते बापडी. पण थोडासा गरम गरम चहा घ्यावा म्हणते मी. आलं ठेचून चहात घालते. म्हणजे बरं वाटेल जरा! आणू का?' यामिनीने विचारले.

हातानीच नको म्हणून खूण करीत विलासरावांनी तिला जवळ बसवून ठेवलं. बराच वेळ ते डोळे मिटून पडले आणि मग त्यांना झोप लागली.

जागे झाले तेव्हा इनामदार त्यांच्या जवळ बसलेले त्यांनी बघितलं आणि मग त्यांना एकदम बरं वाटलं. जवळच सचिंत मुद्रा करुन बाजीराव उभा होता. आपण सर्व मंडळींना घाबरऊन सोडलेलं दिसतंय. आणि मग ते उठून बसू लागले. पण इनामदारांनी त्यांना पडून रहायला भाग पाडलं.

सात वाजल्यानंतर विलासरावांची इतर मित्रमंडळी, नातेवाईक भेटायला आले होते. गप्पागोष्टीत वेळ पसार झाला आणि मरगळलेले विलासराव खुषीत आले. यामिनीच्या आग्रहामुळे इनामदारसाहेबांना मुक्काम ठोकावा लागला.

दुसऱ्या दिवशी स्नान आटोपून बरीच कामं आटोपायची होती. दुपारचं जेवण बाहेरच घेऊ असं सांगून ते गेले होते. विलासराव दहा वाजता बाहेर पडले आणि यामिनी दोन पिशव्या घेऊन बाहेर निघाली. घरातलं बरचसं सामानसुमान तिला आणायचं होतं.

खार मार्केटमध्ये जाण्याऐवजी यामिनी स्टेशनमध्ये शिरलं होती. अंधेरी लोकलमध्ये तिच्या समोरच बसलेला कॉलेज तरुण तिच्याकडे अनिमिष नजरेने पहात होता. त्याची नजर आपल्या छातीवर रूळलेली पाहून यामिनीला गोंधळल्यागत झालं. त्याच्याही लक्षात आलं आणि तो उठून दरवाजाजवळ गेला. अंधेरी स्टेशनबाहेर आल्यावर यामिनी वळून वळून त्याला पहात होती पण गर्दीत तो दिसला नाही. बहुतेक पश्चिमेकडच्या दरवाजाने तो बाहेर पडला

असावा. कुर्ल्याकडे जाणाऱ्या बससाठी लागलेली लांबलचक रांग पाहून तिने चटकन् टॅक्सीला हात केला. समाधानाने ती टॅक्सीत बसली.

इतका वेळ लपून तिचा पाठलाग करणारा तो तरुण समोरच्या इमारतीकडे धावला. त्याला पाहून फुटपाथजवळची गाडी त्याच्याजवळ आली. गाडीतल्या व्यक्तीने त्याला झटकन् गाडीत घेतलं. ड्रायव्हरने गाडी सुरु केली. दोघांची हळू आवाजात बोलणी झाली आणि मध्येच एका ठिकाणी तो तरुण उतरुन गेला.

हिरव्या रंगाची ती अलिशान गाडी त्या तरुणाने सांगितलेल्या टॅक्सीचा संथपणे पाठलाग करत होती. B M R 1133 अंधेरी—कुर्ला रस्त्यावरच्या एका गॅरेजसमोर थांबली. यामिनीने मीटरचे बिल चुकवले आणि ती गॅरेजमध्ये शिरली. गॅरेजच्या एका बाजूला ऑफिसची खोली होती.

आतल्या बाजूला बसलेल्या माणसाने यामिनीला पहाताच अदबीने रामराम केला.

‘ नानबा, साहेब कुठे आहेत ? ’

‘ बाईसाहेब तुम्ही कशाला इथे आला ? साहेबांना आवडणार नाही. फोन करुन सांगायचं होतं !’

‘ अरे फोनवर सांगण्यासारखं नव्हतं, म्हणून तर यावं लागलं. मी चिठ्ठी लिहून ठेवते.

यामिनी चिट्ठी लिहीत होती. तेवढ्यात बाहेर मोटरचा हॉर्न वाजला. नानबा झटकन् बाहेर आला. हिरव्या रंगाची कार बाहेर उभी होती. गाडीतला रुबाबदार माणूस पेट्रोल भरायला सांगत होता. गॅरेजच्या एका बाजुला पेट्रोलपंप होता.

‘गाडी थोडा आवाज करते. जरा तपासून तर पहा.’ त्या व्यक्तीने सांगितले. नानबाने कौतुकाने गाडीच्या बॉडीवरुन हात फिरवला. पेट्रोल भरायला लावून तो सीटवर बसला. आवारात छानशी राऊंड घेतली.

'थोडा वेळ बसत असला तर डिफेक्ट आताच काढतो.' ती व्यक्ति ऑफिसात शिरली. परक्या माणसाला एकदम आत आलेला पाहून दामिनी दचकली. हातातला कागद तिने पर्समध्ये टाकला आणि ती पर्स उचलून बाहेर पडली. त्या माणसाने तिची दखल घेतली नव्हती. शांतपणे सिगारेट शिलगावीत तो खुर्चीत बसला होता. तेवढ्यात त्याचं लक्ष समोरच्या पेडकडे गेलं. ते त्याने कुतूहलाने उचललं. वरच्या कागदावर दाबून लिहिल्यामुळे बरीचशी अक्षरं स्पष्ट उमटली होती. ती अक्षरं वाचता आल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. त्याच्यासारख्या व्यक्तिला सारा मजकूर जुळवणं कठीण नव्हतं. पंधरावीस मिनिटाने नानबा आत आला.

'साहेब, तुमची गाडी तयार आहे.'

'थँक्यू !' दहाची नोट त्याच्या हातात सरकवून ती व्यक्ति बाहेर पडली. ती व्यक्ति म्हणजे संपूर्ण चेहरा आणि पेहराव बदललेले ए. एन्. पी. इनामदारसाहेब आपले पाहुणे आहेत हे यामिनीच्या लक्षात येतं तर ती अधिक सावधपणे वागली असती.

इनामदारसाहेबांच्या सूचनेप्रमाणे कॉन्स्टेबल जाधव विलास-रावांच्या बिऱ्हाडी पोहोचला. यामिनीबाई येईपर्यंत अर्ध्या-पाऊण तासांत त्याला बरंच काम उरकायचं होतं. विलासरावांच्या डुप्लीकेट चाव्या त्याच्या हातात होत्या. भराभर त्याने गोदरेजची तिन्ही कपाटे उघडून तपासली. एका कपाटातली तळाशी लपवलेली बरीचशी कागद-पत्रं त्याने आपल्या बॅगेत टाकली. कपाटाचा लॉकरमात्र संपूर्णपणे खाली होता. त्यातले मौल्यवान दागिने व वस्तू यामिनीने लपवले असावेत. पत्रं त्याला हवं ते यात मिळालं नाही. अचानक त्याच्या डोक्यात विचार चमकला. 'चटकन् हाताशी येणाऱ्या वस्तू' साहेबांनी दिलेली सूचना लक्षात आली आणि तो स्वयंपाकघरात धावला. स्वयंपाकघराच्या दोन्ही फळ्यावर स्टीलचे व पितळेचे डबे हारीने लाभले होते. त्याचे

लक्ष चपट्या गोल डब्याकडे गेले. तो तिखट-मीठाचा स्टीलचा गोल चपटा डबा त्याने खाली घेतला. डबा उघडल्यावर मधला बारका डबा किंचित् वर आलेला दिसला. तो डबा त्याने बाहेर काढला. त्याखाली एक पुरचुंडी ठेवली होती. ती पुडी त्याने उघडली. आत तपकिरी काळसर लहानलहान गोळया होत्या. फक्त दोनच गोळया त्याने उचलून कागदात बांधल्या. डबा व्यवस्थित ठेवला आणि मग सावधगिरीनं ब्लॉकबाहेर पडला.

डॉक्टर देशमुखांच्या छोट्या लॅबोरेटरीत इनामदार आणि कॉन्स्टेबल जाधव बसले होते.

डॉक्टर देशमुख थोड्याच वेळात बाहेर आले. देशमुखांनी जे सांगितले ते इनामदारांच्या तर्काप्रमाणेच होतं. त्या गोळया एका विषारी वनस्पतीपासून बनवल्या होत्या. गेले दोन महिने यामिनी पद्धतशीरपणे त्यांचा वापर करीत होती. त्या गोळया पोटात गेल्यामुळे विलासरावांना वारंवार थकल्यासारखे वाटू लागले होते. त्या गोळया जास्त प्रमाणात दुधातून अगर एखाद्या पेयातून दिल्यास माणूस दोन तीन तासातच मृत्युमुखी पडेल याबद्दल डॉक्टर देशमुखांची खात्री पटली होती

डॉक्टरांचा निरोप घेऊन ते दोघे बाहेर पडले. कॉ. जाधवला इनामदारानी सारं काही नीट समजावलं. पोलिस स्टेशनवरुन ताबडतोब मदत मिळावी अशी व्यवस्था करुन ते त्वरीत विलासरावांच्या घरी निघाले.

दार उघडल्यावर इनामदारांना पाहून यामिनी गोंधळून गेली. स्वतःला सावरीत तिने म्हटलं,

'या ना ! बरं वेळेवर आलात. हे पण तब्येत बरी नाही म्हणून घेऊन झोपले आहेत.'

इनामदारसाहेब आतल्या बेडरूममध्ये शिरले. विलासराव ग्लानी आल्यासारखा पडला होता.

'काय खाल्लं की नाही याने ?'

'काही नको म्हणाले. नुसतं ग्लासभर दूध घेतलं आत्ताच ! बळेबळे पाजावं लागलं.' यामिनी उत्तरली. इनामदार चमकले. यामिनीने खात्रीने मोठा डोस पाजला असावा. बाहेर येऊन त्यांनी फोन फिरवला. डॉ. देशमुखाना ठरलेल्या सांकेतिक भाषेत कल्पना दिली.

'मी याला डॉक्टरकडे नेतो.' आत आलेल्या यामिनीकडे पाहून ते म्हणाले. तिच्या उत्तराची वाट न पहाता त्यांनी विलासरावांना आपल्या खांद्यावर घेतले आणि ते बाहेर पडले.

पंधरा वीस मिनिटात इनामदार एकटेच मागे परतले. डॉक्टर देशमुखानी अर्ध्या रस्त्यातच त्यांना गाठले होते. आता त्यांना यामिनी आणि बाजीरावला सोडायचं नव्हतं. फोन करून त्यांनी पोलिस स्टेशनवर इन्स्पे. पवारांना सूचना दिल्या आणि ते कॉन्स्टेबल जाधवची वाट पाहू लागले. पांच मिनीटात जाधव टॅक्सी घेऊन आला. अवघ्या वीस मिनिटात सगळ्या सूचना देऊन ते विलासरावांच्या फ्लॅटपुढे आले. टॅक्सी थांबवून ठेवायला सांगून त्यांनी पहिल्या माळ्यावरच्या ब्लॉककडे धाव घेतली. यामिनी कुठेतरी बाहेर जायच्या बेताने सज्ज होती. बहुतेक बाजीरावने तिला सूचना दिली असेल. तिच्या हातातली पर्स बरीच मोठी होती. जमिनीवर एक छोटी कातडी बॅग ठेवलेली दिसत होती.

'तुम्ही ? सैतान !' यामिनी किंचाळली.

'येस !' इनामदारसाहेब कधी नव्हे ते जोरात हसले.

'यामिनी, सविता उर्फ चांद-कला तुझा खेळ संपला आहे. तुला पहिल्या भेटीतच मी ओळखलं. औरंगाबादपासून तुमच्यावर माझी करडी नजर होती. बाजीराव उर्फ शंकर शेलारला मी इथे पाहिलं आणि माझी खात्री पटली. सोलापूरहून सात वर्षापूर्वी तुम्ही आनंदराव

देसाईला लुटून, त्याचा खून करुन पळ काढलात. चेहरा, भाषा बदलीत कोल्हापूर-बेळगांव-सांगली आणि आता मुंबई. गेल्या सात वर्षांत पांच लग्न तुझी बाजीरावने लावली. प्रत्येक ठिकाणी नवऱ्याला विषप्रयोग करणं आणि मालमत्ता लुटणं या आरोपावरुन मी तुला अटक करीत आहे. तुझ्या प्रियकराला, बाजीरावाला अंधेरी पोलिसांनी एव्हाना ताब्यात घेतला असेल. बेइज्जत होऊन हातकड्या घालून घेण्यापेक्षा मुकाट्याने खालच्या टॅक्सीत तू बसावेस. चल!'

इनामदारानी पुढे सरसावून तिचा हात आपल्या मजबूत पकडीत धरला.

'साहेबा, तिचा हात सोड. माझ्या सुऱ्याचा नेम पक्का आहे. मुकाट्याने हात वर करुन त्या कोपऱ्यात जा! यामिनी खाली जाईपर्यंत तसाच उभा रहा. यामिनी, खाली उभ्या असलेल्या टॅक्सीत बस. मी येतोच खाली.' बाजीराव उर्फ शंकर दारात उभा राहून इनामदारांना बजावत होता.

इनामदारांनी नाइलाज झाल्यासारखे दाखवून हात वर केले. आणि त्याचवेळी जमिनीवर लोळण घेतली. बाजीराव चकित झाला. त्याचा सुरा भिंतीवर आपटला होता.

बाजीरावाची सुऱ्याची हालचाल समोरच्या तसबिरीत इनामदारानी टिपली होती. आणि म्हणूनच ते बचावले होते. गोंधळलेल्या बाजीरावावर त्यांनी उडी घेतली. त्याच्या नाकावर, तोंडावर, खांद्यावर जिथे मिळेल त्यावर प्रहार केले. त्यांना त्वेष जागा झाला होता. इतके दिवस धरलेली शांतता भंग पावली होती. बाजीराव निपचीत पडला. जवळच्या बेड्या काढून त्यांनी बाजीरावाच्या हातात चढवल्या. खिशातली मजबूत दोरी काढून त्याचे पाय जखडले. तोंडावरचा घाम पुसत त्यांनी पाहिलं, यामिनी गायब झाली होती. सुटकेस आणि पर्स घेऊन ती बाहेर पळाली होती. त्यांनी शांतपणे डायल फिरवली. रस्त्यात कुठेही

टॅक्सी थांबवून धरली जाणार याबद्दल त्यांना शंका नव्हती. जाधवच्या कर्तृत्वावर त्यांचा विश्वास होता.

यामिनीला पहाताच टॅक्सी पुढे येऊन उभी राहिली. ' चलो खार स्टेशन !' यामिनीने हुकूम सोडला.

टॅक्सी खार स्टेशनकडे पळू लागली. यामिनीने श्वास टाकला आणि ती डोळे मिटून सीटवर रेलून बसली. टॅक्सीचा वेग वाढला होता. आणि अचानक ब्रेक दाबले जाऊन टॅक्सी थांबली. यामिनीने दचकून उघडून बाहेर पाहिलं. टॅक्सीजवळ पोलिस इन्स्पेक्टर येऊन उभे होते.

टॅक्सीवाल्याने खाली उतरून पवारांना सलाम ठोकला. 'यामिनी–बाई उतरा खाली. या देहाला कॉन्स्टेबल जाधव–सोलापूरकर म्हणतात. डोक्यावरची टॅक्सी ड्रायव्हरची टोपी काढीत त्याने म्हटलं. ओठावरच्या नकली मिशा उडवल्या. अंगातला बुशशर्ट काढला.

यामिनीने त्याच्याकडे बघीतलं. गाडीत तिच्या जवानीवर खुष होऊन पहात असलेला तोच तो तरूण पहाताच ती सारं काही समजून चुकली. गळयाशी आलेला हुंदका तिने आवरला आणि खाली उतरून बेड्यासाठी हात पुढे केले.

रंगलेला खेळ संपला होता !

## ८.

# एका हिऱ्याची कहाणी

नाना भीवा दडकरकडे एक किंमती वस्तू आहे आणि तो गिऱ्हाइकाच्या शोधात आहे ही बातमी तीन चार अड्ड्यात पसरली होती. ही बातमी कशी फुटली याची कुजबूजही बदमाशांच्या अड्ड्यात चालू होती. आणि ही बातमी खुद्द नानाच्या जीवाभावाच्या दोस्ताने आबाने पिकवली होती असंही कुणी म्हणत होतं.

नानाकडे अशी चीज असावी यावरही कुणाचा विश्वास बसत नव्हता. सात वर्षांपूर्वी नाना आणि आबा जेलमधून बाहेर आले तेव्हांपासून दारू पिण्यापलिकडे कोणताही गुन्हा त्यानी केला नव्हता. दोघांची वयेसुध्दा पन्नाशी पलिकडे गेली होती. पोलिसही त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पहात नव्हते.

नाना आणि आबा ही जोडी मुंबईच्या साऱ्या बदमाशांना माहिती होती. त्यांच्या गुन्हेगारीच्या चाळीस वर्षांच्या रेकॉर्डमध्ये खुनाची एकही केस नव्हती. खुनाबिनाची सुपारी आपण कधी घेतली नाही हे ते अभिमानाने सांगत. दोघांची मैत्री इतकी अतूट की जेलमधूनही नेहमी ते बरोबरच बाहेर येत.

नाना आपल्या मुलाकडे लालबागला रहात होता आणि आबाला कुणीच नसल्यामुळे तो ग्रँटरोडला कुठेतरी पडलेला असायचा. दोघे गेली सात वर्षं नित्यनेमाने ग्रँटरोडला ठरलेल्या जागी भेटायचे. कुलाब्यापासून माहीम पर्यंत कुठेही वेड्यासारखे भटकायचे. मिळेल त्या अड्ड्यावर भरपूर दारू प्यायचे आणि बारा साडेबारा पर्यंत आपल्या मुक्कामी परतायचे. नानाची सून सासऱ्याचा हा वेळीअवेळी परतायचा भाग सोडला तर त्याच्याबद्दल कधी तक्रार करीत नसे. पोलिसांच्या लफड्यात बाप नाही म्हणून मुलगाही खूष असायचा. पूर्वी कमावलेलं आपण खातो असं नाना सांगायचा पण तो पैसा कुठून आणतो हे गेल्या सात वर्षांत कुणालाच कळलं नव्हतं. या बाबतीत दोघे मित्र मात्र गुपचुप असत. नाना कधी उधळपट्टी करताना आढळला नाही. घरफोडी करणारे प्रसिद्ध असे नाना आणि आबा अगदी शांततेने जीवन जगत होते. दारूचा भाग सोडला तर दोघांबद्दल संशयाला जागा राहिली नव्हती.

आणि असा हा नाना भीवा दडकर किंमती वस्तू बाळगून असावा यावर कुणाचाच विश्वास बसत नव्हता. ही किंमती वस्तू म्हणजे एक मोठा 'हिरा' आहे हे त्याचाच मित्र आबा छातीवर हात ठेवून सांगत होता. पोलिस कमिशनरकडे आलेलं निनावी पत्र आबानेच लिहिलं असावं याची नानाला खात्री होती. आणि दोघांचं त्या दिवसा-पासून बिनसलं. भर पावसात एकमेकाला भेटल्यावाचून ते कधी झोपले नव्हते. त्यांचं भांडण झालं ते ही नेमक्या संक्रांतीच्या दिवशी! दोघेही एकमेकाला टाळायला लागले. दोघांना गेली २५ वर्षं ओळखणारे असि. पोलिस कमिशनरही या बेबनावामुळे चकित झाले. नानाला आणि आबाला वेगवेगळया वेळी छेडलं होतं पण त्या किंमती वस्तुचा त्यांना पत्ता लागला नाही. नानाची वागणूक जराही संशयास्पद नव्हती. तरीही आबा एकच हट्ट धरून बसला होता. नाना भीवा दडकर पक्का

बदमाश आहे (होताच) आणि त्याच्याजवळ एक किंमती वस्तू असून त्याची भागिदारी तो आपल्याला देऊ इच्छीत नाही. इतक्या वर्षांची मैत्री तोडू पहातो. ती वस्तू म्हणजे 'हिरा' आहे. माझ्या डोळ्याने त्याने ती वस्तू लपवताना मी पाहिलेली आहे. पण केवळ भागीदारी द्यायची नाही म्हणून त्याने ती कुठेतरी दडवलेली आहे. तो आता गिऱ्हाईकाच्या शोधात आहे पण या हिऱ्याला गिऱ्हाईक मात्र मिळत नाही.

पाठीकडे झुकू लागलेल्या नानाचे हाल तरी किती करायचे. आठ दिवस त्याला अडकवून ठेवूनही पोलिसखाते त्या हिऱ्याचा तपास लावू शकले नाही. नानाकडे खरोखरच अशी किंमती वस्तू नसावी याची असि. कमिशनर सावंत साहेबांनाही खात्री पटली. आबाला म्हातारचळ लागलाय म्हणून माझ्या बापावर तो उठलाय याची मुलालाही खात्री पटली. आपला सासरा इतका खोटं बोलणार नाही असं नानाची सून पण जीव तोडून सांगू लागली. शेवटी बदमाशांच्या वर्तुळातली ती कुजबूज थंडावली. आबापेक्षा नानाकडे साऱ्यांची सहानुभूती वळली. 'नानाकडे अशी वस्तू खास नाही, याची साऱ्यांना खात्री पटली होती.

आणि एकेदिवशी नाना मुंबईतून गायब झाला. नाना मुंबईतून पळाला ही बातमी आबाला लागली. वाकडी वाटकरून तो नानाच्या घरावरुन गेला. सूनबाईला नक्कडपणा करुन चार दोन प्रश्नपण विचारून बसला. नाना मुलाबरोबर भांडला. सुनेने त्याला हाकलला ही बातमी परत अड्ड्या-अड्ड्यावर पसरली. नाना कुठे गेला हे कुणालाच कळलं नाही. असि. पोलिस कमिशनर साहेबांच्या कानावर ही बातमी मुद्दाम घालावी म्हणून आबा त्यांच्याकडे गेला.

' बघा साहेब, नाना पळाला की नाही ! एक ना एक दिवस तो त्या हिऱ्याची वाट लावायला पळणार हे मी ओळखूनच होतो. तुमचा विश्वास बसला नाही. आता घ्या !'

असं. कमिशनरसाहेब हसले. 'ठीक आहे. आपण दोन चार ठिकाणी चौकशी करू. तो नेमका कुठे जाअील हे तू सांग. मी माणसं पाठवतो. आबाला धीर आला. नानाला ती किंमती वस्तू पचू द्यायची नाही हे त्याने मनोमन ठरवलंच होतं. नानाला मुलंबाळं किती याची चौकशी करायची, त्याचे भाऊ—वहिणी—आत्या-मावशी कुठे आहेत याची बातमी आणायची हे ठरवून आबा कामाला लागला.

गेल्या पंचवीस वर्षाच्या दोस्तीत नाना कधी घरच्या बाबतीत बोलला नव्हता. नानाचा मुलगा चाळीशीत आला होता. त्याच्या तोंडूनही त्याला कुणी बहीण आहे, भाऊ आहे, आत्या आहे हे माहिती नव्हतं. एकुलत्या एक मुलाखेरीज नानाला जीवाभावाचं कुणी नात्यानं नव्हतं याची खात्री सावंत साहेबानी सुद्धा करून घेतली होती. साधे सब–इन्स्पेक्टर होते तेव्हापासून ते नानाला ओळखत होते. नानाची बायको शेवटच्या घटका मोजीत होती त्यावेळी त्यांनीच नानाला काही दिवस तुरूंगाबाहेर सोडायला मदत केली होती. आबापेक्षा नानाची आपल्याला जास्त माहिती आहे हे ते अभिमानाने सांगत. तुरूंगातून बाहेर आली की नानाची स्वारी दोनचार महिने मुम्बईतून गायब व्हायची आणि पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूर पर्यंत साऱ्या तीर्थक्षेत्राना भेट देऊन परत यायची हे पण त्यांना ठाऊक होतं. नानाची तुरूंगाची वारी दोन पासून सात वर्षापर्यंत असायची. आबा शेवटी थकला आणि नानाचा नाद सोडून बसला. अशीच दोन वर्षं निघून गेली. सावंत साहेबही निवृत्त झाले. त्या किंमती वस्तूचं रहस्य तसंच राहिलं.

का कोण जाणे आताशा सावंत साहेबाना मात्र नानाचं एकाएकी नाहीसं होण्याचं गूढ उकललं पाहिजे असं वाटू लागलं. निवृत्तीनंतरच्या काळात महाराष्ट्रातली सारी तीर्थक्षेत्रे पालथी घालायची. नाना जीवा दडकर भेटला तर तो एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी भेटणार याची त्यांना खात्री वाटत होती. सावंत साहेबांची मुलं आता कर्ती होती. ते

बाहेर भटकायला मोकळे होते. पत्नीला तयार रहायला सांगून ते ट्रॅव्हल एजन्सीच्या निरनिराळया सफरीबद्दल माहिती काढायला लागले.

अचानक त्यांना कोल्हापूरला जायचा योग आला. त्यांच्या मित्राचं, डी. एस. पी. सरफऱ्यांचं पत्र आलं. त्यांच्या, मुलीचं लग्न ठरलं होतं आणि सावंत साहेब निवृत्त झाल्यामुळे त्यांना निदान महिनाभर तरी आपल्याकडे या निमित्ताने येणं करावं, अशी आग्रहाची सूचना होती. सरफरे पण निवृत्त झाले होते. मुलीचं लग्न हे शेवटचं कार्य असल्यामुळे मोठ्या थाटात करायाचा त्यांचा बेत होता.

सावंतसाहेब कोल्हापूरला आले आणि साऱ्यांना मोठा हुरूप आला. लग्नाची सारी तयारी सावंतांच्या मदतीने त्यांनी सुरू केली. त्यांचे व्याही मोठे उद्योगपती होते. आधल्या वर्षीच्या मे महिन्यात पन्हाळयाला सहकुटुंब ते आले होते आणि त्यावेळी सरफरे साहेबही पन्हाळयाला विश्रांतीला आले होते. आनंदराव मोहित्यांची आणि त्यांची चांगली गट्टी जमली. सरफऱ्यांच्या कांचनचं आणि विलासचं प्रेम प्रकरण तिथे सुरु झालं. विलासच्या आईला सुद्धा कांचन पसंत पडली. आणि हा लग्नाचा योग जमून आला.

पुण्याहून मोहित्यांचं वऱ्हाड यायचं होतं. त्यांच्या व्यवस्थेची सारी जबाबदारी अर्थात् सावंत साहेबांनी घेतली. सकाळी लग्न पार पडलं. दुपारी जेवणाच्या पंक्ति उठल्या. संध्याकाळच्या स्वागत समारंभाची तयारी झाली.

पाहुणे मंडळी येऊ लागली. सावंत आणि सरफरे आपल्या कुटुंबासह जातीने दरवाज्यात स्वागत करायला उभे होते. उद्योगपतीच्या मुलाचं लग्न. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यापासून ते गांवातल्या सामान्य नातेवाईकापर्यंत साऱ्यानी हजेरी लावली होती.

वधू आणि वर खास सुशोभित केलेल्या स्थानी येऊन बसले. भेटी आहेराची देवघेव सुरू झाली. सरफरे आणि सावंत आत येऊन

वधू-वरांसमोर बसले. त्यांच्यासमवेत कुणीतरी मंत्री होते. वधूवरांच्या समोरची गर्दी कमी झाल्यावर सरफरेसाहेब मंत्र्यांना घेऊन नूतन परिणीत वधूवरांची ओळख करून द्यायला उठले. कांचनच्या गळयातल्या हाराचं विशेष कौतुक मंत्रीणबाईनी केलं. सावंतसाहेब त्या हाराकडे आता विशेष नजरेने पहात होते. मुनबाईंच्या गळयातला हार चांगला दोन लाखाचा आहे ही गोष्ट कांचनच्या सासू मुद्दामहून ज्याला त्याला आवर्जुन सांगत होती. सावंतसाहेबांनी कांचनच्याजवळ जाऊन त्या हाराचं निरीक्षण केलं. मधल्या पदकातल्या देदिप्यमान हिऱ्यामुळे तर त्यांना वाटू लागलं की हा हिरा तो तर नसावा ना! ते खुर्चीवर बसून त्याच्याबद्दल विचार करीत होते. त्यांची तंद्री भंग पावली ती एका पाहुण्यामुळे!

एखाद्या सरदाराप्रमाणे पोशाख केलेल्या एका पाहुण्याची ओळख करुन द्यायला सरफरे त्यांच्यापुढे उभे होते. केस संपूर्ण पिकले असावे, मिशा पांढऱ्याशुभ्र आणि वीतभर लांबीची दाढी अशा पोशाखातली ती व्यक्ति पाहून सावंतसाहेब दचकले. त्यांच्यातला पोलिस जागा झाला होता. त्या व्यक्तीच्या डोळयाजवळचा मोठा काळा तीळ त्यांना काहीतरी ओरडून सांगू लागला. त्या व्यक्तीचे डोळेसुद्धा ओळखीचे आहेत असं वाटू लागलं.

'हे इथले मोठे कारखानदार यादवराव—या त्यांच्या सौभाग्यवती आणि यांचे सासरे हिंदुराव—हिंदुराव म्हणजे इथल्या तालमी समजा! हिंदुराव नसते तर इथली बजरंग तालीम उभीच नसती. इथल्या बऱ्याच तालमी केवळ यांच्या कृपेमुळे चालू आहेत. कुस्तीचे मोठे शौकिन आहेत.' सरफरे साहेब पाहुण्यांची ओळख करुन देत होते.

हिंदुरावही मिस्किलपणे आपल्याकडे पहात आहेत असं सावंत साहेबांना वाटू लागलं. ते बेचैन झाले. पाहुण्यांना सावंत साहेबांजवळ

बसवून सरफरे निघून गेले.

' आपली हरकत नसेल तर जरा एका बाजूला बसून बोलूया !' सावंत चाचरतच हिंदुरावांना म्हणाले.

' हो, हो ! जाऊया. जावईबुवा आम्ही जरा दहा पाच मिनीटात आलोच बघा ! ' हिंदुराव आपल्या जावयास म्हणाले.

मंडपाबाहेर दोघे आले. आवार ऐसपैस होते. एका बाजूला मोठा थोरला बगीचा पसरला होता. आंब्याच्या झाडाखाली एक दगडी बाक तयार केला होता. जागा साफसुफ करुन दोघे बसले.

' नाना, तू इतका प्रतिष्ठीत इसम बनशील अशी कल्पना नव्हती !' सावंत साहेब त्या व्यक्तीच्या नजरेला नजर भिडवून म्हणाले.

आपल्या पांढऱ्या शुभ्र दाढीवर हात फिरवीत ती व्यक्ती हसली—

' सावंत साहेब, आपण तुम्हाला मानलं. जातीवंत पोलिस आहात. हा बदललेला हिंदुराव म्हणजेच नाना भिवा दडकर हे सांगायला हरकत नाही.'

' नाना, तुझा कबूली जबाब घ्यायला मी तुला बोलावलं नाही. तुझं मिळवलेलं समाजातलं स्थान - प्रतिमा नष्ट करणार नाही मी ! नाना, पोलिस असलो तरी माणूसच आहे मी. मी सुद्धा मुलाबाळांचा बाप आहे ! '

' सावंतसाहेब, तुम्हालाच काय पण माझ्या मुंबईतल्या मुलाला सुद्धा, आपल्याला एक बहीण आहे हे माहीत नाही. मी जिवापाड जपलेलं गेल्या तीसएक वर्षांचं हे एक रहस्य आहे.

' तीस वर्षांपूर्वी आबाशी गाठ पडायच्या आधीची गोष्ट आहे. गांवातल्या क्षुल्लक भांडणात हत्या घडल्यामुळे तो कैदी तुरुंगात आलेला होता. माझ्याच कोठडीत त्याला पाठवलं होतं. शंकरची आणि माझी दोस्ती बनायला वेळ लागला नाही. माझा जीवाभावाचा दोस्त बनला तो. शंकरला फाशी झाली. त्याच्या इच्छेप्रमाणे मी कोल्हापूरला त्याच्या

खेडेगांवी गेलो. लग्न लावलं, मी कोण - कसा आहे हे सारं काही त्या मुलीला सांगितलं होतं. माझ्या मुंबईच्या बायकोपेक्षा या बायकोने मला फार सुख दिलं. जेव्हा मी तुरुंगाबाहेर असे तेव्हा मी कोल्हापूरलाच असायचा. माझ्या बायकोकडे मी मिळालेलं सारं पाठवायचा, तिने त्यातून दानधर्म करुन माझं पाप कमी केलं. माझ्या बायकोनेच हा चांगला जावई शोधला. माझी मुलगी चांगल्या घरी पडली. मी निश्चिंत झालो. तेव्हा मी दारुला शिवत नव्हतो. पण दहा वर्षापूर्वी माझी सुशीला गेली आणि तेव्हापासून मी दारु पिऊ लागलो. धंदा सोडला. कुणी शिकाऊ पोरं मिळाली तर त्यांना हाताचं कसब शिकवून पैसे कमावत होतो आणि ते दारुत उडवत होतो. माझ्या, गेल्या दहा वर्षात मी दारुडा म्हणूनच पोलिसखातं मला ओळखू लागलं. गेल्या दहा वर्षाचं माझं रेकॉर्ड स्वच्छ होतं. तुम्ही म्हणाल मग यात हिरा कुठं आला ? सावंत साहेब, या स्वच्छ रेकॉर्डमुळेच मी हिरा पचवला. गेली तीन वर्षं मी कोल्हापूरात आहे. इथल्या तालमीत जातो. पोरांना मस्त तालीम करायला लावतो. पूर्वी कमावलेलं या तालीमखान्यांना वाटतो. माझा पोषाख, रुप सारं काही मी बदललंय. माझ्या मुलीला, जावयाला मी खरा कोण होतो, काय होतो हे अजून माहिती नाही. एक खानदानी घराणं म्हणून माझ्या जावयाचं घर प्रसिद्ध आहे. मी सुद्धा सुखवस्तु जमीनदार म्हणून ओळखला जातो सावंत साहेब मी म्हातारा झालोय. पार थकलोय....राहिलेलं आयुष्य नातवाबाळात काढावं म्हणून मी इथे येऊन राहिलोय.

पांच वर्षापूर्वी मी व आबा चाललो होतो. आबा रातांधळा. वाटेत कशाला तरी अडकून आम्ही खाली पडलो. पडल्यावर माझ्या छातीला काहीतरी एकदम टोचलं. जोराची कळ उठली. तसाच हात छातीकडे नेला. हाताला कठीण वस्तू लागली. कसला तरी मणी बीणी असावा म्हणून सगळ खिशात घातला. आबानं ते पाहिलेलं होतं. ते काय असावं

हे खरोखरच त्यावेळी आम्हाला माहिती नव्हतं. पण त्या वेश्यानं सान्या अड्डयातून उठवलं कि माझ्याकडे काहीतरी मौल्यवान चीज आहे आणि मी तिला गिऱ्हाईक बघतोय.

सावंतसाहेब इतक्या वर्षांच्या मैत्रीत आज्ञाने पहिल्यांदाच हरामखोरी केली. ती वस्तू हिरा आहे हे त्याला माहीत होतं. कारण हिऱ्याचे बारा भाऊबंद त्याच्याकडेच होते. त्या दिवशी मला मिळालेला हिरा म्हणजे तेरा हिऱ्यांच्या माळेतला सुटलेला एक हिरा होता. तुटलेली माळ त्याच्या हातात होती. तो पडला होता ते एका बाईचं प्रेत होतं. तिच्या गळयातला तो हार होता. ती बाई तिथे कशी आली, कुणी तिला मारली कुणाला ठाऊक ? आमची दारु उतरली आणि शुद्धीवर येवून आम्ही पळालो. त्याच रात्री एका ओळखीच्या मारवाड्याकडे मी माझी चीज गहाण ठेवली आणि संधी मिळाली तेव्हा सोडवून मुलीकडे पाठवून दिली. मुलीला आणि जावयाला त्या हिऱ्याचा लोभ नव्हता, मी येईपर्यंत त्यानी तो जपून ठेवला आणि मी इथं आल्यावर स्मगलिंगचा माल म्हणून एका प्रसिद्ध जवाहिऱ्याला पन्नास हजाराला विकला आणि माझ्या मध्यस्थीमुळेच मोहीते साहेबांनी त्यांच्याकडून सुनेसाठी विकत घेतला. सावंत साहेब, विश्वास ठेवा अगर नका ठेऊ पण त्यांतली एक दीडकी पण घरात आलेली नाही. अनाथ आश्रमाला मदत--शाळेच्या इमारतीला मदत—जीर्ण देवळाच्या जीर्णोद्धाराला मदत, गरीब विद्यार्थ्यांना मदत असे सारे पैसे मी खर्च करुन टाकले. माझ्या मुलीची तिच्या मुलाबाळांची शपथ घेऊन सांगतो-की सावंत साहेब, पूर्वीचा तो नाना भिवाजी दडकर मेला... केव्हाच.... आता तो एका मुलीचा बाप...नातवंडाचा आजोबा ! मी फक्त माणूस उरलो आहे—फक्त माणूस—'बोलता बोलता नाना गहिवरला. त्याच्या डोळयातून अश्रू ठिपकू लागले. सावंतानी स्वतःला सावरले. नानाला थोपटलं.

'नाना ऊठ-तुला नाना तरी कसं म्हणू—हिंदुराव उठा. फार वेळ बसून झाला. मंडळी उगाच चौकशी करतील. आल्यागेल्याच्या स्वागताला उभं राहिलं पाहिजे. जमलं तर येऊ तुमच्या वाड्यावर !'

'छे, छे जमेल तसं कसं—आलंच पाहिजे. आपला हक्कच आहे तो !' नानातला हिंदुराव जागा होऊन म्हणाला.

दोघेही मंडपात शिरले. समोर बसलेली कांचन-आणि विलासची जोडी एकमेकाकडे चोरून पहात....हसत होती. सहज कांचनचं लक्ष समोर गेलं. हिंदुराव आणि सावंतकाका आपल्याकडे पहाताहेत हे पाहून ती लाजली. तिच्या लाजण्यात त्या हिऱ्याच्या लखलखाटाने भर घातली. दोघा म्हाताऱ्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि चक्क एकमेकाला डोळा घातला.

## १.

# कलंकिनी

'डॉक्टर ऽ ऽ!'

सुधाताईंनी मान वर न करताच ऊं ऽऽ असा आवाज केला आणि समोरच्या केसपेपरमध्ये परत डोकं खुपसलं.

'डॉक्टर, प्लीज हिअर मी!' आता मात्र शुभा ताईंना डोकं वर करणं भाग पडलं.

'क्या हुआ!'

'डॉक्टर, ओ बारा नंबरका पेशंट दवा नही पीती इंजेक्शन दिया तो सिरीज फेक दिया. हमको गाळी देता है' समोरची उभी राहिलेली पोरगेलीशी नर्स सांगत होती.

'अच्छा, चलो मै देखती हूं!' शुभाताईंनी पेन बंद केलं. समोरचे पेपर सारखे केले. त्यावर एक वेट ठेऊन त्या उठल्या.

बारा नंबरच्या कॉटजवळ दोन आया ऊभ्या होत्या. एक केरळीय नर्स मोडक्या तोडक्या हिंदीत त्या पेशंटशी बोलत होती. डॉक्टर येताना पाहताच ती बाजूला झाली.

शुभाताईंने कॉटजवळ टांगलेले केस पेपर उचलले, नांव वाचलं

आणि हसल्या. आयाकडे वळून त्या म्हणाल्या ' तुम्ही का थांबलात ? पळा पाहू इथून–'

' स्टाफ यू आल्सो गो !'

स्टाफ नर्स आणि आया निघून गेल्या. बिछान्यात बसलेले पेशंटही डॉक्टर रागावतील म्हणून परत आडवे झाले.

'हं काय विजुताई, काय गडबड आहे ? थांबा, ओरडून बोलायचं नाही. मला चांगलं ऐकू येतंय–आणि रात्रीचे दहा वाजून गेलेत दुसऱ्यांची झोपमोड होते.'

बारा नंबरच्या कॉटवर बसत त्यांनी प्रश्न केला.

' तुम्ही कोण ? मोठ्या दम देताय ते !'

' कोण वाटते तुम्हाला ?'

' डॉक्टर ! म्हणजे कालचा तो डॉक्टर आज नाही–आला तर. बरं झालं मेला नाही आला ते !'

' अशा शिव्या देऊ नये डॉक्टरना.'

' त्यांनी द्याव्या वाटतं—'

' काय काय शिव्या दिल्या त्यांनी ?'

' मेला म्हणतो कसा—जीव द्यायला निघाली. नीट मरायचं सोडून—आणखी खूप खूप बोलला.'

' म्हणजे तुम्ही जीव देण्याचा प्रयत्न केला होता. काय घेतलंत ? आयोडीन - एखादं वीष की—'

' नाहीऽऽ ! ढेकणाचं औषध घेतलं चांगलं बाटलीभर. पण तेही मेलं बनावट निघालं.'

' रेल्वेगाडी नव्हती का ? चांगल्या फास्ट गाडीखाली उडी टाकायची. झटकन् सुटला असता—' डॉक्टर शुभाताई तिची गंमत उडवीत होत्या.

' तोही मेला तेच म्हणत होता.'

'तो कोण ?'

'कालचा डॉक्टर हो. डॉक्टरांनी कस गोड गोड बोलायचं— तर मेला सतरा प्रश्न विचारत होता.'

'मग चुकलं कुठे ?'

'चुकलंच मुळी. दिला जीव. करा काय करायचं ते ! त्या त्या— बदमाशांना नाही धरलं ते ? मला कोठडीत टाकणार म्हणे ! ताकद असेल तर पोलिसांना म्हणावं धरा त्या हरामखोरांना !'

'बरं, झोपा आता. उद्या मी येईन. मग आपण खूप बोलू हं. आणि मुकाटपणी औषध घ्यायचं. इंजेक्शन पण घ्यायचं ! समजलं ?'

'स्टाफ ऽ ऽ ती सीरिंज आण.'

'मी नाही घेणार टोचून. मेली उभी सुई खुपसते.'

'ठीक आहे. मी देते इंजेक्शन. मग तर झालं ? नुसती मुंगी चावेल. चालेल की नाही ?'

'चालेल पण एकच मुंगी हं !'

शुभाताई हसल्या. असे किती तरी पेशंट त्यांनी चुचकारले होते.

'वैजू नांव ना तुझं—मग आता एक दोन—शाब्बास !' नर्सने आणलेला डोस त्यांनी तिच्या तोंडात ओतला. इंजेक्शनची सुई हळूवार हाताने दंडात खुपसली. झटकन् काढलीही.

'काय झाला का त्रास ? शांतपणा धरला तर सुईदेखील लागत नाही. झोपायचं आता. आरडा ओरड केली तर झोपेचं औषध देईन- समजलं !'

शुभाताईनी पेशंटला थोपटले आणि त्या वळल्या. परत आपल्या टेबलाजवळ येऊन बसल्या. पुन्हा मघाचे पेपर उघडले आणि वाचू लागल्या.

'डॉक्टर !'

'फिर क्या हो गया ?'

'डॉक्टर ओ पेशंट मॅड है, तुम गया तो मुह अैसा वैसा करता है !'

शुभाताईनी डोकं वर उचललं आणि स्टाफकडे बघून त्या हंसल्या. ती केरळीय पोरगी मान खाली घालून चालू लागली. पाठोपाठ तिला शब्द ऐकू आले. 'सिलि गर्ल !'

डॉक्टर शुभा वॉर्डमध्ये फार प्रिय होती. सारे पेशंट त्याच्यावर खूप असायचे. वॉर्डमधल्या मेट्रन, स्टाफ-नर्सेस साऱ्यांना त्यांच्याबरोबर काम करायला आवडायचं. वार्डमधल्या प्रत्येक पेशंटची घरची माहिती त्यांनी करून घेतलेली असायची. त्यांचं दिवसाचं-रात्रीचं राऊंड म्हणजे काही काही जुन्या पेशंटना फार प्रिय असायचं. काम आटोपलं की त्या पेशंटची चौकशी करीत, त्यांच्याशी गप्पा मारीत तास दीडतास तरी काढीत.

वैजयंताला दिलेला शब्द पाळायचा असं त्यांनी ठरवलं होतं. नुकतंच एक महत्वाचं ऑपरेशन करुन खरोखरच त्या थकल्या होत्या. पण त्यांच्या डोक्यातली वैजयंता गेली नव्हती. या पंचवीसीच्या पर्यंत जेमतेम पोचलेल्या पोरीनं जीव द्यायचा का प्रयत्न करावा याचा त्यांना उलगडा करायचा होता.

असं काय घडलं या पोरीच्या हातून की तिला जीवनाचा उबग यावा ! जीव द्यायला सुद्धा धैर्य लागतं. कुठून आणलं हे धैर्य या पोरीनं ! तिला बोलतं करायला हवंय. तोंडाने फटकळ वाटणारी ही पोर मायेचा ओलावा मिळाला तर निश्चित सारं काही सांगेल.

शुभाताई वैजयंतीच्या कॉटजवळ गेल्या. डोळे मिटून पडलेली वैजयंता त्या चाहूलीनी जागी झाली. उठून बसली.

'आता वेळ मिळाला डॉक्टर !'

'हूं !'

'हूं काय ? आम्ही आपली तुमची वाट पहात बसलो होतो.'

'अस्सं ! अगं, आज कि नाही मोठं ऽऽ ऑपरेशन होतं. तें आटोपलं आणि तडक इकडे आले.'

'थँक यू डॉक्टर !'

'कसा काय वेळ गेला दिवसभर, आज उलट्या झाल्या नाहीत. असं स्टॉफ सांगत होती. उद्यापासून जेवण देऊ तुला. चार पांच दिवसात घरी जाशील तू !'

'घरीऽऽडॉक्टर काय वाटेल ते करा-मला खूप खूप आजारी पाडा-पण घरी पाठवू नका.'

'कोण कोण आहे घरी तुझ्या—शुभाताईनी विचारलं आणि त्या बरोबर वैजयंता रडायला लागली.'

'घरून कुणी आलं नाही का ?' त्यांनी परत विचारलं.'

वैजयंताने डोळे पुसले. उशीखाली हात घातला आणि एक मळका कागद शुभाताईच्या हातात दिला. शुभाताईनी घडी उघडली. आत दोनच ओळी होत्या.

'घराण्याचं नांव डुबवलंस-आलीस तर तंगडी तोडीन.'

'कुणी पत्र दिलं आणि ?'

'धाकट्या दिरानं...दहा वर्षाचं पोर आहे पण फार माया आहे माझ्यावर.'

'कुणाचा निरोप आहे नवऱ्याचा ? सासूचा ?'

'मोठ्या दिराचा ! धाकट्यानच तसं सांगितलं.'

'काय करतो दीर तुझा ?' शुभाताईनी विचारलं.

'मटक्याचा एजंट आहे. स्मगलिंग करतो !'

'म्हणतेस काय ?' शुभाताईनी आश्चर्यानी विचारलं,

'तुझा नवरा किती शिकलाय...काय तोही हाच धंदा करतो.?'

यावर तिने जे सांगितलं त्यांनी शुभाताई सुन्न झाल्या. एका

सालस पोरीच्या आयुष्याची धुळदाण पाहून त्याना चीडही आली.

कासाराच्या धंद्यात असलेल्या वैजयंताच्या बापाने तिची हुषारी पाहून तिला शिकवलं. ती एस. एस. सी. पास झाल्यावर कॉलेजातही घातलं. कॉलेज सुरू होऊन चार पाच महिने झाले. हळूहळू कॉलेजा-तल्या तिच्या ओळखी वाढल्या. अशाच एका दिवशी तिची जगन्नाथशी ओळख झाली. तो इंटरच्या वर्गात होता. आपल्याच जातीची मुलगी आहे असं पाहून त्याने तिच्याशी वसट वाढवली. दोघांचं प्रेम जमलं. आणाभाका झाल्या. प्रेमापायी तिचा अभ्यास होईना. इंटरच्या परीक्षेला ती नापास झाली. बापाला फार मोठा धक्का बसला. आपल्या जातीतली फार मोठी विदुषी बनवायच्या त्याच्या इच्छेला त्या नापास होण्याने तडा गेला. कुणीकडून तरी त्याला वैजयंता आणि जगन्नाथचं प्रेम-प्रकरण कळलं. जगन्नाथच्या घरी जाऊन त्याला जावई करून घ्यायचा असं ठरवून तो जगन्नाथकडे गेला. प्लास्टीकच्या बांगड्याचा कारखानदार असलेल्या जगन्नाथच्या बापाने त्याला पार उडवून लावलं. होतं. घरी आल्यावर रडत असलेल्या वैजयंताने सांगितलेल्या बातमीने त्याला खरोखरच वेड लागायची पाळी आली. गेलं वर्षभर तिचा जगन्नाथाशी संबंध होता आणि वर्षभरात जे घडलं नव्हतं ते गेल्या तीन महिन्यात घडलं होतं. खुद्द जगन्नाथाचे पाय धरण्यावाचून गत्यंतर नव्हते. वैजयंताला घेऊन जगन्नाथाची गाठ घेऊन झाली. पण स्वतःच्या वडिलांना दुखवून लग्न करायला जगन्नाथाची तयारी नव्हती.

वैजयंताचा मामा कोल्हापूरला होता. त्याने वैजयंताला कोल्हापूरला नेऊन तिची त्या संकटातून सुटका केली आणि जेमतेम एस. एस. सी. पर्यंत शिकलेला मुलगा पाहून तिला चांगलं घरही मिळवून दिलं. पूर्वीचं सारं काही विसरून नव्या संसारात मी रमू लागली. दोन वर्षाचा काळ लोटला आणि तिच्या नवऱ्याची बदली मुंबईला झाली.

बापाच्या घरी आणि कोल्हापूर येथील मोठ्या जागेत व्हाणाऱ्या वैजयंतीचा जीव चिंचपोकळीच्या लहानशा खोलीत रमेना. वैजयंता सुकत होती. सुखासाठी आसुसलेला तिचा देह त्या चाळीत कोमेजून गेला. दिराचा धंदा लक्षात येताच ती अधिकच विटून गेली. हळुहळू तिचा नवराही त्याच्या धंद्यात गुरफटला गेला आहे हे तिला कळून चुकले. नवऱ्याच्या सहवासाची आसक्ती संपली होती.

सासू नव्हती पण दिराची बायको त्रास देत होती. प्रेमाचा ओघ तिने लहानग्या दिराकडे वळवला होता. त्या दहा वर्षाच्या पोराचा वैनी बायवर फार जीव होता. वैनीला त्रास होऊ नये म्हणून फार जपायचा. तो. मोठ्या भावाची परवानगी काढून तो तिला जवळच्या गणेश टॉकीजला न्यायचा. बस, तेवढंच तिला चाळीच्या बाहेरचं जग दिसायच. एक दिवस ती अशीच मराठी चित्रपटाला गेली आणि तिची दृष्टभेट जगन्नाथशी अकस्मात झाली. नकळत तिची पावल रेंगाळली.

‘वैजू ऽ ऽ !’ जगन्नाथने हाक दिली.

‘आता नको. मध्यंतर झाल्यावर येते.’ भीत भीतच तिने उत्तर दिले.

मध्यंतर पर्यंत तिने कसाबसा वेळ काढला. तब्येत ठीक नाही, घरी जाते असं धाकट्या दिराला सांगून ती बाहेर पडली.

जगन्नाथ बाहेर वाट पहात उभा होता. मागे पुढे बघत ती एका कोपऱ्यावर उभी राहिली. जगन्नाथ तिच्या जवळ आला.

‘वैजू , किती वाळलीस ?’

वैजूच्या तोंडातून हुंदका बाहेर पडला. जवळच्या हॉटेलमध्ये दोघं शिरली. तिथल्या फॅमिली रूममध्ये जगन्नाथने आपली सारी व्यथा तिला सांगितली. जगन्नाथचे लग्न झालेले नाही हे ऐकून तिला आश्चर्य वाटलं.

यानंतर ती दोघं वारंवार चोरून एकमेकांना भेटू लागली.

कोणत्या ना कोणत्या कारणानी ती घराबाहेर पडू लागली. दिराचे-नवऱ्याचे तिच्याशी आता खटके उडू लागले.

एक दिवस ती जी घराबाहेर पडली ती तडक जगन्नाथकडे येऊन राहिली. तिच्या नवऱ्याने, मोठ्या दिराने धमक्या दिल्या. जगन्नाथ आता कर्ता सवरता होता. बापाच्या मृत्युनंतर सारं काही त्याच्या हातात आलं होतं. समाजाची पर्वा न करता ती दोघं राजरोस नवरा—बायको म्हणून एकत्र राहात होती. वैजयंताचा नवरा बेफिकीर होता. पण त्याचा मोठा भाऊ ऐकायच्या मनःस्थितीत नव्हता. मटक्याच्या धंद्यातला तो एक दादा होता. त्याच्या हाताशी दहावीस गुंडमवाली होते. जगन्नाथ आणि वैजयंताचा काटा काढायचा त्याने निश्चय केला. चार गुंडाना त्याने त्याचं घर दाखवलं, जगन्नाथ-वैजयंता दाखवली. हातात भली मोठी रक्कम ठेवली.

त्या दिवशी जगन्नाथ वैजयंताला घेऊन मौंटमेरीकडे चालत निघाला होता. तेथील खडका-खडकाआड अनेक प्रेमी युगलं बसत अशा ठिकाणी ती दोघे आली अन् एका वळचणीत मोकळेपणी बसली होती. सूर्य एव्हाना मावळला होता. दोघे बेसावध होती. आजुबाजुला निरव शांतता होती. दोघांचा गुलाबी प्रणय चालू होता. आणि अचानक चौघं धटींगण तिथे आले. त्यांच्या हातात दंडुके होते. त्या दोघांना उठताही येईना. जगन्नाथच्या अंगावर वाकलेल्या वैजयंताला त्यांनी चार पांच फटके हाणले. तिला दूर ढकलून दिले. अडचणीत असलेला जगन्नाथ प्रतिकार करू शकत नव्हता. हळूहळू त्याची शुद्ध हरपली. तो बहुनेक खलास झाला असं समजून त्यांनी हातातील काठ्या दूरवर फेकून दिल्या. त्यातील एकाचं लक्ष वैजयंताकडे गेलं आणि मग त्याने तिला कवटाळलं. वैजयंता असाहाय्य होती. चौघांच्या मनसोक्त अत्याचारामुळे ती बेहोष झाली. जगन्नाथकडे परत वळूनही न पहाता ते निघून गेले.

१८३९५ २२।६।८१ CMUT

वैजयंता शुद्धीवर आली तेव्हा बरीच रात्र झाली होती. चांदण्यात तिने पहाण्याचा प्रयत्न केला. आपल्या शरिराकडे तिचं लक्ष गेलं. काय झालं हे तिच्या लक्षात आलं. ती धाय मोकलून रडत होती. उठायचा प्रयत्न केला, पण तिला जागचे हलवेना. ओरडायचा प्रयत्न केला तो तोंडातून शब्दही फुटेना. सारा जोर एकवटून शेवटी ती कशीबशी उठली अन् चांदण्यात जगन्नाथला शोधू लागली. तिच्यापासून काही अंतरावरच जगन्नाथ निचेष्ट पडला होता.

'जगन्नाथ ऽ ऽ ! काय झालं रे हे ऽ ऽ !'—

तिने हंबरडा फोडला.

खुरडत खुरडत ती त्याच्याकडे गेली. त्याचा हात उचलायचा प्रयत्न केला. सारं शरीर थंड वाटत होतं. त्याची काहीच हालचाल नव्हती. डोक्यावर फटके बसल्याने अन् डोकं खडकावर आपटल्याने सारं रक्त त्याच्या चेहऱ्यावर पसरलं होतं. जगन्नाथ आपणास कायमचा सोडून गेला या जाणिवेने ती हादरली.

बराच वेळ जगन्नाथकडे पहात त्याचा चेहरा ओंजळीत पकडून ती रडत होती. तिच्या शरीरातून सारख्या कळा येत होत्या. आपले सर्व कपडे रक्ताने माखले आहेत याची तिला जाणीव झाली. हळूहळू तिला ग्लानी आली. ती तिथेच बेहोष झाली.

जेव्हा ती जागी झाली. तेव्हा तिचं जगन्नाथकडे लक्ष गेलं. चांदण्यांत त्याचा चेहरा अधिकच भेसूर दिसत होता. ती किंचाळली. मग सारं बळ एकवटून उठली. तिचा बटवा जवळच पडलेला तिला दिसला. त्यातले पैसे मात्र सुरक्षित होते. वळचणीतून बाहेर पडत.... ठेचाळत ती रस्त्यावर आली. लांब दूरवर पसरलेल्या रस्त्यातून ती भेलकंडत होती. निर्मनुष्य रस्त्यातून ती कशीबशी वस्तीत आली. दिसलेल्या पहिल्याच घराच्या ओट्यावर येऊन ती पडली. शरीरातून येणाऱ्या असह्य कळांमुळे ती पुन्हा तिथे बेहोष होऊन पडली.

वहानांच्या आवाजाने ती जागी झाली. एव्हाना दूधवाले दुधाची कासंडी घेऊन जात होते. मधूनच एखादी लॉरी धावत होती. थोड्याशा विश्रांतीमुळे तिला आता थोडं बरं वाटलं होतं. तशीच चालत-रखडत रखडत ती वांद्रे स्टेशनापर्यंत आली. एकही टॅक्सी दिसत नव्हती. तिकिटाची खिडकी मात्र उघडी होती. तिने दादरचे तिकिट काढले.

एव्हाना गाड्या सुरू झाल्या होत्या. दोन-तीन गाड्या नजरे-समोरून गेल्या. पण तिला उठावसं वाटेना. शेवटी ती तीन नंबरवर आली. आलेल्या गाडीत चढली. तंद्रीतच ती दादरला उतरली.

'कुणासाठी जगायचं ? कलंकित झालेल्या शरीराने जगायचं ? त्या रानदांडग्यांचं पाप पोटात वाढवून जगायचं' त्या भयंकर जाणिवेबरोबर ती दचकली. 'शी ऽ ऽ असलं भयंकर जीणं जगण्यापेक्षा मनानं कौल दिला-मृत्युशिवाय तुला सुटका नाही. तुझा जगन्नाथ तुझी वाट पहात असेल. तो अजुन फार पुढे गेला नसेल. त्याला गाठलं पाहिजे.'

कपडे सारखे करत ती स्टेशनबाहेर पडली. तिचा निश्चय ठरला होता. उघडलेले पहिलेच दुकान तिने हेरले. बाहेरच्या शोकेसमध्ये तिला ते दिसले. वीषऽऽढेकणाचे औषध....बेहोशीच्या आनंदात.. वाण्याने तिला बाटली दिली. ती परत स्टेशनाकडे आली. लेडीज डब्यात बसून तिने ती बाटली डोळे मिटून घशात ओतली. घशात जळजळ झाली. जागी झाली तेव्हा ती हॉस्पिटलात कॉटवर होती. त्या औषधाने तिला फसवलं होतं. तिचा विश्वासघात केला होता. कलंकिनी जगली होती.

वैजयंतीची कहाणी संपली. शोभाताईचे डोळे पाण्याने भरले होते. त्यांना बसवेना. त्या टेबलाजवळ आल्या नि सुन्न होऊन बसल्या.

घरी आल्यावर शुभाताई बेचैन होत्या. वैजयंताचे पुढे काय होणार ! कॉलेज शिक्षण घेतलेल्या वैजयंता सारख्या मुलीचे धिंडवडे

पाहून आपण काहीच करू शकत नाही याचं त्यांना अनिवार दुःख होत होतं. वैजयंतावर अत्याचार करणाऱ्या चार गुंडांना, जगन्नाथचा खून पाडायला लावणाऱ्या वैजूच्या दिराला, नवऱ्याला कायद्याने शिक्षा व्हायलाच हवी. वैजूला न्याय मिळायला हवा. जगन्नाथाचे खुनी मिळायलाच हवेत.

विचार करुन करुन त्यांचं डोकं शिणून गेलं. स्नानाला सुद्धा उठावं असं वाटेना. दरवाज्यावरची बेल ओरडायला लागली तेव्हा त्यांना उठावं लागलं. दारात त्यांचा मोठा भाऊ उभा होता.

' आजारी तर नाहीस ना ?'

' छे रे ! अजून स्नान व्हायचंय ! काल नाईट ड्यूटी होती. फार त्रास झाला. त्यात एका पेशंटमुळे रात्रभर बेचैन होते मी !' आणि मनातला सारा संताप बाहेर पडला. त्यांच्या भावाने वैजयंताची कहाणी ऐकली. त्याचा चेहरा कठोर बनला. उठून त्याने एक नंबर फिरवला. कुणाला तरी निरोप दिला.

' ताई, इतकी हळवी होऊ नकोस. अगं डॉक्टर आहेस तू !'

' आहे रे ! तरी पण शेवटी मी स्त्रीच आहे ना ?'

भावाशी बोलतांना त्यांचा वेळ झटकन् जात होता.

' ए, अशी बसू नकोस. स्नान करून घे चटकन्. एक पाहुणा यायचाय आता !'

शुभाताई आत गेल्या. पंधरा-वीस मिनिटात स्नान आटोपून त्या बाहेरच्या खोलीत आल्या. तोच बाहेरची बेल वाजली. त्यांनी दार उघडलं. बाहेर एक मध्यम वयाचे जाडगेले गृहस्थ उभे होते.

' एक्सक्यूज हं, ! डॉक्टर शोभा इथंच रहातात ना ?'

' हो, मीच शोभा. या नं आत—' शुभाताई म्हणाल्या.

ते गृहस्थ आत आले. सोफ्यावर बसलेला त्यांचा भाऊही चटकन उठला. त्याने आपल्या पाहुण्यांना जवळ बसवलं.

बरं का ताई, हे पोलिस इन्स्पेक्टर देसाई, माझे एक दोस्त, काल बोलता बोलता त्यांनी एक हकीगत सांगितली. तू सांगितलेल्या वांद्र्याच्या घटनेशी मिळती जुळती म्हणून यांना मुद्दाम इथं बोलावलं. मला सांगितलंस ते यांना पुन्हा सांग. आपण मग त्या मुलीलाही भेटू !'

शुभाताईना उत्साह आला. वैजयंतेचे केस पेपर्स त्यांनी संपूर्ण वाचलेले होते. तिला प्रथम अॅडमिट करणाऱ्या डॉक्टरांनी निर्घृण बलात्कार असा शेरा लिहिलेला होता. तिथपासून ते वैजयंताने सांगितलेल्या हकीगती पर्यंत सारं काही त्यांनी सांगितलं.

'ताई, परमेश्वर मोठा अजब आहे. कधी कधी तो असाच्च काही चमत्कार करतो. चार दिवसापूर्वी पहाटे वांद्र्याहून काही स्मगलर माउंट मेरीकडे जात आहेत एवढं आम्हाला कळलं. त्यांच्या मार्गावर आम्ही होतो. पहाटे त्यांची जीप आम्ही अडवली. उड्या मारून ते पळत पळत जिथे जगन्नाथ पडला होता तिथे आले आणि त्यातला एक त्याच्या शरीराला अडकून पडला. पाठोपाठ आम्हीही तिथे आलो. पळणाऱ्यांना पकडलं. प्रथम आम्हाला वाटलं. तो मुडदा असेल पण नीट पहाता थोडी धुगधुगी होती. गेले चार दिवस तो तुमच्याच हॉस्पिटलमध्ये आहे. शर्थीचे प्रयत्न करून त्याला काल शुद्ध आणली डॉक्टरांनी. त्याने सांगितलेली हकीगत या मुलीच्या हकीगती सारखीच आहे. दोघांचं नशीब बलवत्तर असावं. दोघेही जगलेत ! ईश्वराघरी न्याय आहे. खरंच तुमचं कौतुक करावस वाटतं. तुम्ही मायेने बोलला नसता तर खरी हकीगत समजली नसती ताई, माझ्यावर विश्वास ठेवा. संध्याकाळ पर्यंत सर्व गुन्हेगार कस्टडीत आलेच म्हणून समजा. चला त्या पोरीची गाठ घेऊया !' इन्स्पेक्टर देसाई म्हणाले.

सात आठ दिवसात वैजयंताची प्रकृती चांगली सुधारली. जगन्नाथाची बातमी ऐकूनच तिला हुरुप आला होता. एक दिवस शुभाताई तिला जगन्नाथाच्या वॉर्डमध्ये घेऊन गेल्या. त्याच्या चेहऱ्यावर,

अंगावर माराच्या खुणा अजूनही होत्या. जखमा भरत आल्या होत्या. त्याला पाहून वैजयंता त्याला मिठी मारून हमसाहमशी रडत होती. शुभाताईंच्या डोळ्यातही पाणी तरळलं.

'वैजू, जरा हळू! अजून जखमा ओल्या आहेत. टाके निसटतील.'

वैजयंता सावरली. जगन्नाथ तिच्या डोक्यावरून हात फिरवीत होता.

'तुझ्या लायक राहिले नाही रे मी! त्या चार चांडाळानी मला भ्रष्ट केली. कलंकिनी आहे रे मी!'

'असू दे. सारं समजलय मला, आता कुणी तुला माझ्यापासून हिरावणार नाही. कशीही असलीस तरी मला फार फार आवडतेस. वैजू, तू माझी आहेस, तू फक्त माझी आहेस!' जगन्नाथाने बोलता बोलता तिला जवळ ओढली. तिच्या ओठावर हळुच आपले ओठ ठेवले. आजूबाजूला कोणी असेल याचं भानही जणू त्यांना नव्हते.

१०.

# दंवबिंदू

ठाणे-वज्रेश्वरी एस. टी. पळत होती. खिडकीत बसलेली माधवी शून्य नजरेने बाहेर पहात होती. रस्त्यावरची धूळ उघड्या खिडकीतून आंत येत होती. तिच्या गोऱ्यागोमट्या गालावर पुटं चढत होती. उन्हामुळे सारं अंग घामेजलं होतं. त्यांवर ती धूळ अलगद चिकटत होती.

गचकन् एस. टी. थांबली. 'उतरा आता. ठिकाण आलं.' आंबलेली शरीरं घेऊन प्रवासी भराभर उतरत होते. गाडी जवळ जवळ रिकामी झाली होती. विचारात भान हरपलेल्या माधवीला त्याची जाणीव नव्हती.

'चल ऽ उतरायला पाहिजे.' माधवीच्या शेजारी बसलेला वासुदेव तिला हलवित म्हणाला.

माधवी दचकली. तिने गाडीत नजर टाकली. कंडक्टर ती दोघं केव्हा उतरतात याची वाट पहात होता. चेहऱ्यावर ओशाळल्या स्मीताची लकेर उठवित ती गाडीतून बाहेर पडली. टपावरच्या सामानातली एक मोठी बॅग आणि सूटकेस वासुदेवाने एव्हाना खाली

काढली होती. हातातली पर्स संभाळीत तिने त्या दोन्ही डागावर नजर टाकली.

‘हातपाय धुऊन अगोदर देवीच्या दर्शनाला जाऊया!’ तिने वासुदेवाला सांगितलं. ‘अगं, वज्रेश्वरी मागे राहिली. मग संध्याकाळी जाऊया चालत रमत गमत. इथं खोल्या मिळतात. तिथे सामान टाकू अगोदर.!’

पदराने मानेवरचा— चेहऱ्यावरचा घाम निपटत माधवी त्याच्या मागोमाग निघाली. वासुदेवाला इथली सारी माहिती असावी. चालता चालताच तिला तो नदीतल्या गरम कुंडांची माहिती देत होता. नाताळाची सुट्टी होती. त्यामुळे पिकनीकला येणाऱ्यांची गर्दी झाली होती. वासुदेवाने तीन चार ठिकाणी चौकशी केली. बहुतेक ठिकाणच्या खोल्या गेलेल्या होत्या. वासुदेवाच्या भरवशावर इतकी मजल मारलेली माधवी आता कावरीबावरी झाली. स्वतःच काहीतरी धडपडलं पाहिजे असा विचार करुन ती पुढे निघाली.

एक छोटीशी बंगली दिसत होती. पाऊल वाटेने ती लगबग त्या बंगलीकडे निघाली. थोडसं जाताच तिला तो बोर्ड दिसला. भवानराव रहाटगांवकर यांचे लॉजींग बोर्डींग—पाटी थोडीशी पुसट होती. बोर्डींगच्या पुढचा हाऊस शब्द बहुधा पावसाच्या मारामुळे पार पुसला गेला असावा.

पुढच्या आवारात खुर्ची टाकलेले एक गृहस्थ तिला पहाताच उठले. बहुतेक तेच भवानराव असावेत.

‘याऽऽ जागा हवी ना?’

माधवीने मानेनेच होकार दिला. आणि दूरवर तिच्यामागे येत असलेला वासुदेव कुठवर आलाय याचा अंदाज घेतला.

‘दोन रुम्स हव्यात. तीन चार दिवसासाठी मिळाल्या तरी हरकत नाही.’

'तीन-चार का चांगलं आठवडाभर रहा. बरं दुसरं कोण आहे बरोबर—नाही – दोन खोल्या मागितल्या म्हणून विचारलं.—'

आणि मग त्यांचं लक्ष-बॅग आणि एक सुटकेस घेऊन बंगलीकडे येणाऱ्या वासुदेवकडे गेलं. 'या अशा, रजिस्टरला नोंद करून टाकू. दिवसाचं सहा रुपये भाडं-सगळी रक्कम ॲडव्हान्स—सगळ्या सोयी इथं आहेत. लाईट-पाणी-संडास कशाची कमतरता नाही इथं!' भवानराव म्हणाले.

माधवीने मिळालेल्या दोन्ही खोल्या बंगलीच्या टोकाला होत्या. एका खोलीत सामान टाकून वासुदेव तिथल्या खुर्चीत टेकला.

'दोन खोल्या कशाला घेतल्या. एकच पुरे असं मी मालकाला सांगून येतो,' वासुदेव म्हणाला.

पैसे माझे जाणार आहेत. तुझ्या भरवशयावर मी घरदार सोडलं असलं तरी तुला पाहिजे तसं वागणार नाही. कबूल केल्याप्रमाणे चांगला भटजी शोधून आण. वज्रेश्वरीसमोर सर्व विधी होऊ दे—मी तुला अगोदरच बजावलं आहे. उगाच मला भांडायला लावू नकोस.'

माधवीचा रुद्रावतार बघून वासुदेव गुपचूप आटपायच्या तयारीला लागला. एकवाजेपर्यंत जेवण तयार होईल असं भवानरावांनी तिला सांगितलं होतं.

एका खोलीत वासुदेवाची बॅग ठेऊन तिने दुसऱ्या खोलीत आपलं सुटकेस नेऊन ठेवली. स्नान आटोपून पलंगावर पडल्या पडल्याच कालपासून घडलेल्या घटनांचा विचार करीत होती. आपण घरात नाही असं पाहून आबांचं काय झालं असेल? लग्नघर झालेल्या आपल्या घरात काका, मामा, मावश्या यांनी किती गोंधळ घातला असेल! चार दिवसापूर्वी तिने सुटकेस भरून वासुदेवाला दिलेली होती. काकांनी ठरवलेलं लग्न मोडण्याचा तिचा प्रयत्न फसला होता. कुणीच ऐकत नव्हतं. पत्रिका छापल्या गेल्या. निमंत्रणं घरोघर गेली. नातेवाईक

मंडळी लग्नघरी येऊन ठेपली. वासुदेवाच्या भरवश्यावर पहाटेच तिने घर सोडून वज्रेश्वरी एस. टी. गाठली होती. एम् अँड टी. कंपनीच्या मुख्य कार्यालयात ती गेली आठ वर्षं काम करीत होती दिसायला सुंदर असल्यामुळे कंपनीची रिसेप्शनिस्ट व टेलिफोन ऑपरेटर म्हणून तिची नेमणूक झाली होती. कार्यालयात पुष्कळ तरुण मुलं होती. पण का कोण जाणे या साऱ्यांना दूर ठेवून ती गेली आठ वर्षं खालच्या मानेने काम करायची.

ब्रँच ऑफिसमधून वासुदेव बदली होऊन आला. साधा शिपाई असून त्याच्या स्वभावामुळे तो सगळ्यांचा प्रिय झाला होता. वयाची सव्वीस वर्षं उलटून गेलेली माधवी कशी कोण जाणे पण वासुदेवावर फिदा झाली. आणि ठरलेलं लग्न मोडून टाकून ती वासुदेवाबरोबर निघून आली होती.

सकाळी एस.टी.त बसल्यापासून वासुदेवाने अनेक वेळा तिच्याशी लगटपणा करायचा प्रयत्न केला पण तिने त्याला दटावून दूर ठेवलं होतं. वज्रेश्वरी पासून त्याचं गांव जवळ होतं. तिथेच तो तिला घेवून चालला होता. देवीच्या समोर, देवा–ब्राह्मणासमोर विधीपूर्वक त्याची पत्नी होण्यासाठी तिला वज्रेश्वरीला यायचं होतं. आणि त्याशिवाय आपल्या अंगाला हात लावू देणार नाही असं वारंवार तिने त्याला बजावलं होतं.

एक वाजून गेला. भवानरावांनी जेवायला हाक मारली. सकाळी सामान टाकून गेल्यावर बाहेर पडलेला वासुदेव अजून आलेला नव्हता. थोडा वेळ त्याची वाट पहात बसावं आणि मग जेवायला वाढायला सांगावं असं तिनं मनाशी ठरवलं. वासुदेव बहुधा त्याच्या मित्रमंडळींना भेटायला गेला असावा असं तिनं मनाचं समाधान करुन घेतलं.

माधवीला जागा दिल्यापासून भवानराव बेचैन झाले होते. ती दोघं नवरा बायको नाहीत हे त्यांना समजून चुकलं होतं. माधवीच्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या आणि गळ्यातला हार पाहून ही बाई थोरामोठ्याकडची असावी या समजानेच त्यांनी ताबडतोब तिला दोन खोल्या देऊ केल्या. त्यांच्या त्या बंगलीत त्यांनी सहा खोल्यातून ट्रीपला-किंवा उपचारांच्या विश्रांतीला येणाऱ्यांची व्यवस्था ठेवली होती. बाकीच्या चार खोल्या त्यांनी स्वतःसाठी ठेवल्या होत्या. एका खोलीत त्यांनी टेबल-खुर्च्यांवर जेवणाची व्यवस्था केली होती—एक सामानसुमान - गिऱ्हाईकाना लागणाऱ्या वस्तूसाठी आणि त्यांची स्वतःची बेडरूम. आचारी व नोकरवर्ग जवळच असलेल्या चाळवजा जागेत रहात होता.

नंबर एक दोन मधल्या बाई बोलावतात म्हटल्यावर भवानराव लगबगीने तिकडे गेले. गेले पंधरा दिवस ती माणसं त्या खोल्यांतून रहात होती. गरम कुंडातल्या पाण्याच्या स्नानाने त्यांच्या अधू पायावर उपचार करण्यासाठी त्या बाई आपल्या एका सुनेला आणि मुलीला घेऊन आल्या होत्या. काही सरकारी कामासाठी त्यांच्या मुलाचाही मुक्काम सध्या तिथे होता.

'पंत, त्या शेवटच्या खोलीत आलेल्या मुलीची काहीतरी भानगड आहे असं मला वाटतं.' बाईंनी भवानराव आल्यावर सुरुवात केली.

'माईसाहेब, मलाही तसंच वाटायला लागलंय. ती मुलगी चांगल्या घरातली दिसतेय. आली तेव्हा अंगाखांद्यावर दागिने होते म्हणून मी काल चटकन् जागा दिली. काल सकाळी बाहेर गेलेला तिच्या बरोबरचा तो माणूस रात्री दारु पिऊन आला. नको तसल्या शिव्या त्या मुलीला देत होता.'

'थोडसं कानावर आलं माझ्या, बहुधा ती पळून आलेली

असावी - तरी मला त्या मुलीची काळजी वाटते. मघाशी एकटीच ती बाहेर पडलेली पाहिली. लक्ष ठेवा तिच्यावर एवढंच मला तुम्हाला सांगायचंय—'

'देवीच्या देवळाकडे जायचा रस्ता विचारून ती गेलीय— आली की तुमची गाठ घालून देतो. तिला विश्वासात घेऊन पहा. खरं काय ते कळेल !' भवानरावांनी सांगितलं आणि ते बंगलीच्या बाहेर येऊन उभे राहिले.

पायवाटेने येणाऱ्या तरुणाकडे त्यांचं लक्ष गेलं. चालण्याच्या ढबीवरुन हा माणूस पोलिस खात्यातला असावा असं वाटत होतं.

'गुड मॉर्निंग पंतऽऽ धंदा जोरात चाललाय ना ? नाताळामुळे तुमच्या साऱ्या खोल्या भरल्या असतील, होय ना ?'

'होय ना, काल राहिलेल्या दोन्ही खोल्या गेल्या. आज कुणी आलं तर दिवसभर या पलिकडल्या आंबराईत सोय करावी लागेल आकाशाच्या छताखाली.'

'अच्छा ऽ ऽ !' हातातली स्टीक मांडीवर आपटीत त्यांनी पायऱ्या चढता चढता विचारलं, — 'काय म्हणताहेत आमच्या माइसाहेब, मी दोन दिवस नव्हतो — ठीक आहे ना त्यांचं ?'

'अगदी उत्तम, आपलं काम आटोपलं तर दोन चार दिवसात मुक्काम हलवावा म्हणतात त्या !'

'माझं काम नाऽ ऽ ! अहो, आज निकालात काढून आलोय. आता म्हणाली तर आज सुद्धा निघायची तयारी आहे माझी ! ठीक आहे, विचारुन पहातो माईला.'

भवानराव आपल्या खोलीकडे निघून जाताच त्यांनीही आपल्या रूमकडे मोर्चा वळविला.

'काय ग माई, कसल्या विचारात पडलीस एवढी ?'

'अरे, भाई ऽ ऽ केव्हा आलास तू ?'

'खरंच माई, कसला विचार करत होतीस तू - अगं - आणि या दोघी कुठं गेल्या तुला एकटीला टाकून ?'

'कसलं काय घेऊन बसलास...विचार करीत होते... पलिकडल्या खोलीतल्या मुलीचा ! काय भानगड आहे समजत नाही. तुझीच वाट पहात होते. काही तरी करायला हवंय एवढंच वाटतंय.' माईसाहेब सचिंत होऊन म्हणाल्या.

'कशाला दुनियेचं ओझं घेऊन बसतेस - तुझं दुखणं थोडं का आहे ? जाऊदे. तिचं ती बघून घेईल.'

'अरे असं कसं म्हणतोस तू—तुझ्यासारख्या पोलिस अधिकाऱ्यांनी लक्ष घालावी अशीच भानगड वाटतेय मला. काल रात्रभर डोळा लागला नाही. सारखं तिचं रडणं कानावर येऊन मीच बेचैन झाले बघ. आपले भवानराव सांगतील तुला सारं. तू - सध्या स्नान वगैरे आटप. त्या दोघी आल्या की जेवायला बोलावतील भवानराव !' माई म्हणाल्या.

'ठीक आहे, करतो चौकशी. तू निश्चींत रहा.' माईसाहेबांना आश्वासन देऊन — भाई आपल्या स्नानाच्या तयारीला लागला.

वज्रेश्वरीचं दर्शन घेऊन माधवी देवळाच्या पायऱ्या उतरू लागली. नुकतीच आलेली एस. टी. तिने पाहिली. पहाटेलाच नाहीसा झालेला वासुदेव निदान गणेशपुरीत दिसेल म्हणून ती त्याच बसने गणेशपुरीत आली. नित्यानंद स्वामींच्या समाधीला ती वंदन करुन आजुबाजूच्या देवळात जाऊन आली. रात्रीपासून बेचैन झालेल्या तिच्या वृत्ती या साऱ्यामुळे बहरून आल्या. मनाचा निर्णय पक्का झाला. वज्रेश्वरी मातेचा कौल तिने परत जावं असा पडला. काहीही झालं तरी तू ठाण्याला घरी परतायला हवंस असं तिचं मन वारंवार बजावू लागलं होतं. आणि देवीचा कौलही तसा पडला. पुजाऱ्याच्या हातावर पाच रुपयाची दक्षणा ठेऊन—देवीची तिने मनोमन क्षमा मागितली होती. अकलोलीला ती परतली ती नव्या उल्हासानं.

खोलीचं दार उघडून ती आत आली आणि चकित झाली. दोन खोल्याच्या मधलं दार उघडं होतं. दारूच्या दुर्गंधीनं खोलीत पाऊल ठेवणं कठीण झालं होतं. तिच्या पलंगावर वासुदेव ऐसपैस पसरला होता. एकदम तिचं लक्ष आपल्या सूटकेसकडे गेलं. आतलं सामान सुमान–पातळं, ब्लाऊज सारं काही कसं तरी कोंबून ठेवल्यासारखं वाटत होतं ! छाती धडधडायला लागली. तिने सुटकेस उघडली. तिच्या दागिन्यांचा डबा आत नव्हता.

कालच्या प्रकारामुळे तिने घेतलेला निर्णय वासुदेवाला पटला नव्हता आणि त्यानेच डबा नाहीसा केला असावा याची खात्री पटून तिने वासुदेवाला गदागदा हालवून जागं केलं.

'माझा दागिन्याचा डबा कुठाय ? आणि तुला बंदी केली असताना तू माझ्या खोलीत का घुसलास ? दारूड्या उठ ऽ ऽ माझे दागिने काढ' तिचं किंचाळणं ऐकून वासुदेव तारवटलेल्या नजरेने तिच्याकडे पाहून हसायला लागला.

'तू माझी, तुझे दागिने माझे, सगळंच माझं. ये लाडके–अशी रागाऊ नकोस' तिला अंगावर खेचत तो म्हणाला.

'नीच, दूर हो ! तुझ्या गोड बोलण्याला मी भाळले. चूक झाली माझी--चल माझे दागिने काढ मुकाट्यानं' त्याला पूर्वीपेक्षाही जोरात ती बोलू लागली.

'च्यायला ऽ रांड माजावर आलीय-' त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडताच माधवीचा हात हलला. त्याच्या गालावर सणसणीत चपराक बसली.

त्या फटक्याबरोबर वासुदेवाची दारू उतरली. त्याचे डोळे निराळया तऱ्हेने चमकले आणि एकदम तिच्या अंगावर त्याने झडप घातली. तिचा ब्लाऊज टरकन् फाटला गेला आणि पदराचा शेव त्याच्या हाती आला. एक जोराचा फटका मारून त्याने तिला खाली

पाडलं. माधवीने जोरात किंकाळी फोडली. वासुदेव तिच्या अंगाशी भिडला होता.

भवानरावांनी तो आवाज ऐकला आणि ते धावत त्या खोलीकडे आले. दार उघडच होतं. एका लाथेसरशी त्यांनी वासुदेवाला दूर उडवलं. तिचा पदर अजून त्याच्या हातात होता. उघडी पडलेली छाती झाकायचा केविलवाणा प्रयत्न माधवी करू लागली. त्याचवेळी भाई, माई आणि त्यांच्या सुनेने माधवीकडे धाव घेतली. कुठलं बळ माईच्या अंगात शिरलं कोणास ठाऊक. एका हिसक्यात त्यांनी तिची अब्रू सावरला. आईला बिलगावं तशी माधवी माईंच्या कुशीत शिरली. तिच्या थरथरणाऱ्या देहाला माई कुरवाळीत होत्या.

संतापलेल्या भाईच्या अंगातला पोलिस जागा झाला. मिळेल त्या जागी त्यांनी वासुदेवाला लाथा घातल्या. रक्तबंबाळ झालेला वासुदेव खोलीच्या मध्ये पडला होता. खोलीला कुलूप लावून सर्वजण बाहेर पडले.

बारा वाजून गेले होते. पोटात भूक असूनही कुणालाही जेवावसं वाटत नव्हतं. माधवीने फाटलेले कपडे बदलून चेहरा स्वच्छ केला होता. एका अरिष्टातून ती वाचली होती. भवानरावांनी आग्रह करून सर्वांना जेवायला भाग पाडलं. स्वतःचं जेवण आटोपून तेही मग माईच्या खोलीत आले. माधवी आता बोलण्याच्या मनःस्थितीत आली होती. काहीही लपवून न ठेवता तिने आपली हकीगत त्या कुटुंबाला सांगितली.

वज्रेश्वरीत येईपर्यंत वासुदेव हा लग्न झालेला, आणि एका मुलाचा बाप आहे हे तिला माहिती नव्हतं. स्वतःची जात सुद्धा त्याने लपवली होती. माधवीला त्याच्या जातीशी कर्तव्य नव्हतं. वासुदेव एक शिपाई असला तरी चांगला तरूण आहे. दोन तीन वर्षांत त्याला क्लार्क करण्यात येईल याची तिला खात्री होती. वयाच्या अठ्ठावीशी

पर्यंत कुमारी असलेल्या तिच्या अधिर मनाला वासुदेवासारखा शिपाईसुद्धा आवडू लागला आणि घरात लग्न घाई सुरू असताना तिने वासुदेवाबरोबर पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचं दारूच्या धुंदीत पाकिट पडलं नसतं तर तिला त्याचं लग्न झालं आहे हे कळलही नसतं. लग्ना अगोदरच त्याने केलेली विचित्र मागणी, त्याचं दारू पिणं आणि आता तर तो लग्न केलेला इसम आहे हे कळलं म्हणून तिने त्याला नकार दिला आणि घरी परत जायचा निर्णय घेतला. दागिन्याची चोरी आणि आपली लग्ना करता फसवणूक याकरिता त्याला कडक शिक्षा व्हायला हवी. यासाठी हवे ते पोलिस सोपस्कार करून घ्यायला तिने तयारी दाखवली.

तांबट चाळीतल्या आबा देशपांड्याच्या घरांत काहीतरी गडबड आहे हे आपल्या ब्लॉकमधून रघुनाथ दिघे पहात होता. आबांच्या मुलीचं माधवीचं लग्न चार दिवसावर आलेलं आहे, घरात पाहुणे मंडळीची वर्दळ आहे पण ही गडबड काही वेगळीच असावी.

आबांच्या मुलीला माधवीला त्यानेच आपल्या एम्. ॲण्ड टी. कंपनींत चिकटवलं होतं. माधवी त्याच्यापेक्षा सहासात वर्षांनी लहान होती. अगदी परकऱ्या पोरीच्या अवस्थेपासून तो तिला पहात होता. तेव्हापासून माधवीबद्दल त्याला प्रेम वाटत होतं. आबांनी ग्रॅज्युएट झालेल्या माधवीला लाव म्हणताच त्याने वशिला लावून तिला चिकटवून दिली होती. लहानपणापासून निकट येऊन सुद्धा केवळ एस्. एस्. सी. म्हणून तिने त्याचं प्रेम धुडकावलं होतं.

'अरे आर. टी. घरात आहेस का?' रघुनाथ चमकला. दरवाजात त्याचा मित्र बाबो देवधर उभा होता. आर. टी. रघुनाथच्या रघुनाथ त्रिंबक दिघेचं शॉर्ट फॉम होतं. 'ये, बैस. फार दिवसानी आलास' 'बसायला वेळ नाही. एका भानगडीत मी सापडलोय. तुझी मदत पाहिजे गुंता सोडवायला. खाली गाडीत माई, ताई आणि

तुझी वेनी बसलेय. तुला न्यायला आलोय. फक्त एक काम करायचं. समोरच्या तांबट चाळीतल्या आबा देशपांड्यांना घेऊन लगोलग माझ्या घरी यायचं. चर्चा नाही. नुसतं आबांना घेऊन यायचं एवढं काम कर ! मी निघालो.' रघुनाथच्या उत्तराची वाट न बघता बाबी देवधर निघून गेला. रघुनाथने समोरच्या चाळीतील आबांच्या खोलीकडे नजर टाकली. आबा घरातच होते.

आबांच्या दारात रघुनाथ उभा राहिला. आबा चमकले. रघुनाथने अंदाज घेतला. घरातलं वातावरण एकदम तंग होतं.

' आबा, माझ्या बरोबर तुम्हाला एका जरूरीच्या कामासाठी यायचं आहे. काम मलाही माहिती नाही. तिथे गेल्यावर समजेल. असाल तसे चला—निघायचं—ही ऑर्डर आहे—' रघुनाथने म्हटलं. ' आर. टी. अरे तुमचं समन्स यायचं बाकी होतं. दोन दिवस झालेत हैराण झालोय मी आणि हे कसलं काम काढलंस.'

' आबा, चला म्हटलं का चलायचं. तुम्ही मिडू कर्मा असला की मला नाही का ब्रीजसाठी पकडून नेत तसंच हे समजा. वेळ घालवू नका. '

' अरे आर. टी. माझ्यावर कसला प्रसंग आलाय आणि तू मला ब्रीजसाठी बोलावतोस ! मी नाही येत, माझा मूड नाही.'

' आबा ब्रीजसाठी नाही दुसरं कसलं तरी काम आहे. माझा बाबी देवधर मित्र आहेना त्याने तावडतोब तुम्हाला घेऊन बोलावलय.'

' ठीक आहे बाबा, निघतो ' आबानी शर्ट-कोट चढवला आणि ते बाहेर पडले.

बाबी देवधरचं घर चंदणीत होतं. दहा मिनिटात रघुनाथ त्यांच्या घरी पोचला. बाबा देवधर दारातच उभा होता. आबाना घेऊन रघुनाथ बाबीच्या दिवाणखान्यात आला. बाबीची आई, ताई त्याची बायको यांच्या बरोबर माधवीला तिथे बसलेली पाहून चकित झाला.

आबाना पहाताच माधवीला रहावेना. ती आवेगाने त्यांना बिलगली. 'आबा ही माझी आई--माई म्हणतात तिला. ही बहीण आणि ही पत्नी' डोक्यात काही शिरलं नाही अशा तऱ्हेने ते बाबीकडे पहात राहिले ! आणि मग माईनी आबाना समजेल अशा भाषेत सारं काही सांगितले.

'आबा, दागिने गेल्याचं दुःख करु नका. ह्या साऱ्या जंजाळात हा दागिना तावून सुलाखून शंभर नंबरी राहिला हेच समाधान बाळगा. तो माणूस आता कस्टडीत आहे. दोन चार दिवसात दागिने परत मिळतील. तुम्ही म्हणा - तेथे ही लग्नाला उभी राहील. हे सारं घरातच ठेवा. बाहेर फुटलं नाही तर लग्न व्यवस्थित पार पडेल. माधवीला घेऊन चला, आणि हे पहा तिला कुणी बोलणार नाही याची दक्षता घ्या.' पोलीसी भाषा बोलणाऱ्या बाबीला इतक्या चांगल्या तऱ्हेने बोलताना पाहून रघुनाथ पण चकित झाला होता.

माओचा निरोप घेऊन आबा माधवीसह निघाले. माधवीची सूटकेस रघुनाथच्या हातात होती. ती दोघं पुढे जाताच बाबीनी रघुनाथला मागे खेचला. 'आर. टी हा खरच गाढव आहे अरे तुझ्या सारखं स्थळ समोर असताना त्यांनी गांव धुंडाळावं — जाऊदे, इल लक आहे ते तुझं ! पोरगी खरच चांगली आहे. ती सुस्थळी पडायला हवी.'

'बाबी तुला म्हणून सांगतो अरे या पोरीला मी चक्क मागणी घातली होती. मला धुडकावून त्या फडतूस शिपायात काय पाहिलं कोण जाणे ! नशिब तिचं आणि माझं. मला ना खंत ना खेद !' रघुनाथ भाराऊन म्हणाला व आबाला गाठायला जिना उतरू लागला.

माधवीला घेऊन आबा चाळीपुढे आले आणि आता धरणीमाता आपल्याला पोटात घेईल तर बरं होईल असं वाटून आपल्या गॅलरीकडे पहात राहिले. माधवीच्या सासरकडची मंडळी गॅलरीतच उभी होती.

लटपटत्या पायाने आबा जिना चढून वर आले. माधवी तर शरमेने मेलीच होती. कुणाकडे न पहाता ती घरात शिरली. सूटकेस घेतलेला रघुनाथ आबाना सावरीत होता.

'मंडळी आत तरी चला. बाहेर तमाशा नको.' कुणीतरी म्हटले. नाइलाजानं ती मंडळी आत शिरली.

'हे पहा आबा साहेब हे लग्न मोडलंय हे सांगायला आम्ही इथे आलोय. प्रत्यक्ष या नवरदेवाला विचारा. तोच तयार नाही तर लग्न कुणासाठी करायचंय ?'

'तुमची मुलगी अशी असेल असं आम्हाला वाटलं नव्हतं.'
'अहो पण तुम्हाला वाटतंय तसं काय झालं नाही. रागाने मुलगी घरातून गेली होती. तिची समजूत घातली, आणली परत तिला.' माधवीचा एक काका म्हणाला. त्यानीच हे लग्न ठरवलं होतं.

'तुम्ही काय सांगता, सगळं आम्हाला हे कळलेलं आहे. ती कुणाचा तरी हात धरून पळाली होती. हे पक्क कळलं आहे.'

'तात्यासाहेब, मी पदर पसरतो. भीक मागतो, चूक झाली तिची, पण मुलगी शरीराने पवित्र आहे. पाहिजे तर डॉक्टरी तपासणी करून घ्या.'

'हे पहा तपासण्या बिपासण्या आम्हाला नकोत. म्हणे मुलगी शुद्ध आहे. शरिराने पवित्र आहे. प्रेम करणारी ही पोरगी, मिठ्या, चुंबन, काहीतरी झालं असेल कीनाही ? निघाले आम्हाला शिकवायला !'

'हे लग्न मोडलं. आमच्या मुलाला सुटाला दिलेले हे पाचशे रुपये मोजून घ्या. मोकळे करा आम्हाला.' नोटा फडकवित त्या मुलाच्या पित्याने बजावलं.'

'अहो तात्यासाहेब मुलीचा पंचनामा कशाला करीत असलाय ? तुम्हाला हे लग्न मंजूर नाही. ठीक आहे. मोडलं, आता जा निघून !'

आतापर्यंत गप्प बसलेला रघुनाथ म्हणाला.

'आपण कोण टिकोजीराव ? लग्न झालंय तुमचं ? नसलं तर तुम्ही मुंडावळ्या बांधा आणि उरकून घ्या. मुलगी शारीरिक दृष्ट्या पऽवित्र आहे. हे घ्या पाचशे रुपये. सुटाला होतील तुमच्या. चला हो !' मुलाचा बाप रघुनाथच्या हात त नोटा कोंबत म्हणाला.

बडबड करीत सारेजण चाळीच्या पायऱ्या उतरून गेले. शरमलेला रघुनाथ बघतच राहिला. आबांच्या कोटात नोटा कोंबून मान खाली घालून तो चालू लागला.

घरातली सारी माणसं आई, दादा, वहिनी त्यांची मुलं बाहेरगावी गेली होती. आबांच्याकडे झालेल्या प्रकारामुळे रघुनाथ पार खिन्न झाला होता. घरात चैन पडेना. निदान तळ्यावरची थंड हवा घ्यावी म्हणून तो तळ्यावर आला. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ धक्क्यावर आडवं पडून तो तळ्यातल्या चंद्रबिंबाकडे पहात होता. रात्रीचे अकरा वाजून गेले होते. सगळीकडे सारं कसं शांत होतं. रघुनाथ विचारात गुंतला होता. माधवी बद्दलची अपार प्रीती असून आपण गप्प का बसलो ? 'लग्न झालं नसलं तर मुंडावळ्या बांधा.' खरंच आपण ताडकन् होय म्हणायला हवं होतं. बाबी म्हणाला तेच खरं 'इल लकऽइल लक', दुसरं काय ?

पाण्यात झालेल्या आवाजाने तो भानावर आला. कुणीतरी पाण्यात उडी घेतली होती. माणसाची पुसट आकृती दिसली. पायातल्या चपला फेकून रघुनाथने पाण्यावर सूर मारला. पुतळ्याजवळ दोन अडीच पुरुष पाणी असावं. डुबकी घेतलेल्या व्यक्तीचं डोकं हातात आलं. लांब सडक केस दिसले. ते केस धरून त्याने त्या व्यक्तीला पाण्यावर काढले. आणि तसेच खेचत काठाकडे पोहायला सुरुवात केली. धक्क्यापर्यंत आल्यावर त्या व्यक्तीकडे त्याचं लक्ष गेलं.

'कोण माधवी ऽ ? काय चालवलंयस हे ? जीव देणार होतीस तू ?' रघुनाथ ओरडला.

'मरु द्या हो मला. बोलून बोलून नकोसं केलंय. मला आता मरणाशिवाय मार्गच नाही. माझ्यामुळे...माझ्या चुकीचं प्रायश्चित् घेऊ द्या !'

'माधवी, आता शांत रहा. योगायोगाने मी इथे आलो ते तुला वाचविण्यासाठीच. तुझा मृत्यु देवाला मान्य नसावा. आमच्या घरी चल.'

रस्त्यात फार वर्दळ नव्हती. माधवीची चाळ झोपली होती. त्याच्या ब्लॉकचं कुलूप पाहून ती थबकली.

'घाबरू नकोस त्याच्याइतका वाईट नाही मी. कपडे देतो ते बदल आणि मग आपण बोलू' वहिनीचं पातळ काढून अंगावर फेकीत रघुनाथ म्हणाला.

'माधवी, तू जशी आहेस तशी मी स्विकारायला तयार आहे. चार वर्षापूर्वी मी तुझं प्रेम मागितलं होतं. तू मला दूर लोटलंस पण अजूनही मी तुला तोच प्रश्न विचारतो.'

'नाथ, तुम्ही थोर आहात. मला क्षमा करा. तुम्हाला ओळखलं नाही. या पायाशी उभं रहायची खरंच माझी लायकी नाही !' माधवी त्याचे पाय पकडीत म्हणाली.

'ए वेडाबाई, ऊठ !' तिला उठवत रघुनाथ म्हणाला. आणि इतका वेळचा संयम सुटला. तिला जवळ ओढून तिच्या ओठाशी आपले ओठ त्याने भिडवले.

....'बाबी, मित्रा लकी आहे रे मी !'

'खरंच लकी आहे...' तिला आपल्या छातीशी धरीत तो पुटपुटत होता. आणि का कोण जाणे त्याचे डोळे भरुन आले. दोन अश्रू खाली ओघळले.

'तुमच्या डोळयात अश्रू !'

'अगं, आनंदाश्रू आहेत ते !'

'अं हूं ऽ दंवबिंदू आहेत ते !

'दंवबिंदू ऽ !'

'होय दंवबिंदूऽऽ' त्याच्या छातीत आपले मुख लपवित ती पुटपुटली.

## ११.

# शून्य....!

लहानपणी मी गणित शिकत होते तेव्हाची गोष्ट. आमचे मास्तर म्हणाले, जर दोन हजार मधून दोन हजार उणे केले तर उत्तर झीरो किंवा शून्य येईल आणि दोन मधून दोन उणे केले तरीही उत्तर शून्य येईल !

माझ्या बालमनाला मोठे कोडे पडले. खरंच, दोन हजारमधून दोन हजार वजा केले तर येणारं शून्य हे दोनामधून दोन वजा करून आलेल्या शून्यापेक्षा खचित मोठं असणार ! माझ्या बालमनाचं समाधान मी करु शकले नाही. आमच्या गुरुजींचा स्वभाव कसा होता याची कल्पना मला होती. मी चूपच बसले. स्वतःशी मात्र मी त्या त्या गणिताचं उत्तर नक्की करुन टाकलं. दोन हजार मधून दोन हजार वजा केले तर उत्तर मोठं शून्य आणि दोनामधून दोन वजा केले तर उत्तर लहान शून्य !

माझ्या डोळ्यासमोर एक मोठं आणि एक छोटं शून्य हसत नाचत फिरताना दिसु लागलं. त्यावेळेपासून त्याच मोठ्या संख्येतून तीच मोठी संख्या वजा करताना माझ्या मनात मी मोठे शून्य लिही

आणि लहान संख्येच्या वेळी लहान शून्य लिहीत असे.

माझ्या मनात घर करुन राहिलेल्या त्या शून्याचं कोडं कधी काळी सुटेल याची मला कल्पना नव्हती. जीवनात अशा किती तरी गोष्टी येतात आणि तशाच मनात घर करुन बसतात. आयुष्यात प्रश्नचिन्ह करुन सारख्या नाचत असलेल्या गोष्टींचा उलगडा पुढे कधी तरी अचानक होतो.

माझ्या त्या मोठे शून्य व लहान शून्याच्या कोड्याच्या उत्तरात मला एक दिवस बदल करावा लागला अशी एक घटना घडली. आणि बाळपणात ज्या शून्यामुळे मी गोंधळून जात असे, त्या प्रश्नाचं उत्तर मला अचानक मिळालं.

नुकत्याच घडलेल्या रेल्वेच्या अपघातात दगावलेल्या माणसांची यादी मी दैनिकात बघत होते. किसन चौधरीचं नांव दृष्टीस पडलं आणि पोटात गोळा उठला. किसन चौधरी–शैलाचा पति ! मला काही पुढचं दिसेना. क्षणभर मी डोळे मिटले, आणि मृतांच्या नांवापुढे दिलेले पत्ते वाचू लागले. हातातलं दैनिक गळून पडलं. किसन चौधरी खरोखरच हे जग सोडून गेला होता तर ! नुकतीच त्याची माझी गाठ पडली होती. परवा हसत खेळत दृष्टीसमोर वावरणारी व्यक्ति आज अचानक काळाने गिळंकृत केली होती. बिचारी शैला ! किती निष्ठूर आहे हा काळ ! घरच्या साऱ्या माणसांना मी ती दुःखद बातमी सांगितली. सर्वांनाच त्याचा मृत्यु फार फार जाणवला. बिचारी शैला ! नुकतंच तिचं लग्न झालेलं. वय ते किती बिचारीचं ! भावी आयुष्य समोर आ वासून उभं. ऐन तारुण्यात हा वैधव्याचा फटका - कसं होणार तिचं ! तिच्या विचारात मी रंगले आणि एक एक प्रसंग आठवू लागले.

शैला माझी वर्गमैत्रीण. कॉलेजपर्यंतचं सारं शिक्षण दोघींचं बरोबर झालेलं. कॉलेज शिक्षण पुरं झाल्यावर दोघींचे मार्ग वेगळे झाले.

बरोबर तीन वर्षांनंतर तिची माझी बाजारात गाठ पडली. ती काहीतरी खरेदी करण्यासाठी बाजारात आली होती. तिच्या पतीची काही महिन्यापूर्वी बदली होऊन ती पुन्हा आमच्या गांवी आली होती. आमची विशेष मैत्री नव्हती तरी पण फार दिवसांनी भेटल्यामुळे आम्ही बऱ्याच अघळपघळ गप्पा मारल्या. त्यानंतर तिने मला आपल्या घरी येण्याचं आमंत्रण दिलं होतं. मी तिच्या घरी गेले. मोठ्या आस्थेने तिने मला आपलं घर दाखवलं होतं. आणि आपल्या पतीचीही माझ्याशी ओळख करुन दिली. माझं आगतस्वागतही तिने चांगल्या प्रकारे केलेलं होतं. परंतु त्यानंतर दोन तीन भेटीतच मला कळून चुकलं की, शैला पहिल्या पेक्षा जास्त घमेंडखोर बनली आहे. पूर्वी तिला बड्या बापाची मुलगी म्हणून गर्व होता. परंतु आता तर एका बड्या ऑफिसरची पत्नी बनल्यामुळे ती जास्तच गर्विष्ठ बनून गेली होती. पुष्कळ वेळा मला त्याचं प्रत्यंतर आलं. ती मला आपल्या पेक्षा कमी दर्जाची समजत असे. मी पण मग तिच्याकडचे जाणे-येणे जवळ जवळ बंदच करुन टाकले.

एक दिवस तिने मला नुकताच लागलेला नवा चित्रपट पहाण्यासाठी बोलावलं. तिच्या नवऱ्याला पुष्कळदा दौऱ्यावर जावं लागे. स्वतःचा वेळ घालण्याकरिता मग ती मला वेठीला धरी. बहुधा अशा वेळी ती मोटारगाडी घेऊनच मला घेण्याकरिता येई. माझ्या इच्छे-विरुद्ध मी कित्येक वेळा तिच्या बरोबर जात असे.

एकदा असंच सिनेमा पाहून आम्ही थिएटरबाहेर पडलो. आमची एक मैत्रीण सुषमा आपल्या पतीबरोबर सिनेमाला आली होती. आम्हा दोघींना बघून ती मोहक हसली.

'बऱ्या भेटलात ! हे माझे मिस्टर. यांची नि तुमची ओळख करुन देते हं ! ' असं म्हणून तिने शाम खळेची नि आमची ओळख करुन दिली. शैलाने अगदी एखाद्या मडमेचा आव आणून ओठ

मुरडले. ' ओऽऽऽ हेच का तुझे पतिराज ?' आणि एवढं म्हणून तिने शामला डोक्यापासून पायापर्यंत एका दृष्टिक्षेपात न्याहाळून घेतला.

तिला जणू म्हणायचं होतं की, ' बघ मला आणि माझ्या नवऱ्याला ईश्वराने खास स्वतःच्या हातानी बनवलं असावं आणि तुला आणि तुझ्या नवऱ्याला मात्र एखाद्या भाडोत्री कारागिराकडून घडवलं असावं.' सुषमाचा नवरा बिचारा साधा शाळा मास्तर होता. त्याचे कपडे अगदी साधे होते आणि सुषमा पण एक साधारणशी साडी नेसली होती. त्याच्या बुटालाही दोन-तीन दिवसापूर्वी पॉलिश केल्यासारखं वाटत होतं.

सुषमाला शैलाच्या त्या दृष्टिक्षेपाचा अर्थ कळला असावा. चेहऱ्यावर कसलाही विकार न आणता तिने संभाषण चालूच ठेवलं होतं. कौतुकाने तिने शैलाची चौकशी केली.

' तिचं लग्न केव्हा झालं ? ती इकडे कशी काय आली ? तिचा पति कसा काय आहे ? ' इत्यादि-इत्यादि. शैलाला तेच हवं होतं. तिला आपला नवरा रेल्वेचा मोठा ऑफिसर आहे, आपला सुंदर बंगला आहे, मोटारगाडी आहे, ह्या गोष्टी सांगण्याची घाई झाली होती. आपल्या ऐश्वर्याची सारी रेकॉर्ड तिने मग सुषमाला ऐकवली·

सुषमा माझ्याकडे वळून म्हणाली, ' काय ग तू केव्हा देणार आम्हाला लाडू ? कोणी सापळ्यात सापडला की नाही ? '

मी उत्तर देण्यापूर्वीच शैला मध्येच म्हणाली, ' अगं, ती कुठं लाडवाला नाही म्हणते ! तिला पाहिजे तसं माणूस भेटायला हवं ना !'

पुन्हा एकदा तिने शामकडे तिरस्काराने पाहिलं आणि मग सुषमाच्या कानाजवळ हळूच ती म्हणाली, ' सगळ्या तुझ्यासारख्या थोड्याच असतात, मिळेल त्याचा हात धरणाऱ्या !' हे ऐकल्यावर सुषमाचा चेहरा एकदम कोमेजून गेला. मलाही कसंसच झालं. विषय बदलावा म्हणून मीच सुषमाशी बोलायला सुरुवात केली. ती कुणीकडे

उतरलीय, किती दिवस राहणार, केव्हा आली आणि तिने मला सांगितलं की, ती तिच्या एका नातेवाईकाकडे लग्नासाठं आलेली होती आणि आठ दिवसात परतही जाणार आहे म्हणून !

मी तिला माझा पत्ता दिला. आता नाइलाजाने शैलालाही स्वत:चा पत्ता देणं भाग पडलं. सुषमाने आम्हाला लग्नाला येण्यासाठी आग्रहाचं आमंत्रण केलं. शैला सुषमासारख्या लोकांच्यात मिसळणं कमीपणाचं मानत होती. अर्थात ती लग्नाला जाणं शक्यच नव्हतं. मी मात्र जमल्यास जरूर येईन असं आश्वासन दिलं.

सुषमा आणि तिचा पति शाम आमचा निरोप घेऊन पुढे गेले. मी किंचित् रोषाने शैलाला म्हटलं, 'त्यांना जरा गाडीतून लिफ्ट दिली असतीस तर काय बिघडलं असतं ?'

'माझी गाडी म्हणजे भाड्याची टॅक्सी नाही बाईसाहेब !' शैला उद्गारली.'

'अगं, पण मी कुठे टॅक्सी आहे असं म्हणते. ! शिष्टाचाराच्या दृष्टीने बरं नाही दिसलं तुझं वागणं. '

शैलानं ओठ चावला. 'बराच पुळका आलेला दिसतोय सुषमाचा. ठीक आहे. ज्या वेळेला तुझ्याकडे गाडी असेल त्यावेळी मी पण बघीन तुझा शिष्टाचार. मोटारीला पेट्रोल लागतं; पाणी नाही लागत बाईसाहेब !'

मलाहि राग आला. मी म्हटलं, 'ठीक आहे. मग मलाहि पुढल्या स्टॉपवर उतरवून टाक ! उगाच पेट्रोल जळायला नको तुझं !'

'ओहो, तुला तर मी काहीच म्हटलं नव्हतं, एवढंसं बोललं तर केवढं ओढवून घेतेस स्वत:वर ! हे बघ, सुषमाचा नवरा काही झालं तर साधा मास्तर ! असल्या लोकांशी वागताना कसला आला आहे शिष्टाचार !'

'मास्तर म्हणजे माणूस नाही वाटतं ? त्यांनाही भावना, मन आहे की !'

'मी सर्व मास्तरांबद्दल नव्हते म्हणत. सुषमाचा नवरा - धड त्याला व्यक्तित्व नाही, तेज नाही. अगदी बुद्दूच वाटतो बघ !'

'या गोष्टी पैशानी खरीदल्या जातात !'

'छे, छे तसं नाही मला म्हणायचं, गरिबी-श्रीमंतीचा प्रश्न नाही, स्मार्टनेस ही एक औरच चीज आहे. गरीब पण स्मार्ट असू शकेल !'

'पैसा, अधिकाराची जागा या गोष्टी म्हणजे स्मार्टनेस असा तुझा समज आहे. तुझा चष्माच खराब आहे !' मनात म्हटलं तसं तसं पाहिलं तर हिच्या नवऱ्यापेक्षा सुषमाचा पति किती तरी चांगला आहे, देखणा आहे, बोलताना आढ्यता दाखवत नाही की, डिग्री मिळवलीय म्हणून शेखी दाखवत नाही. बिचारा मास्तर बनला एवढंच चुकलं. शिक्षण तर तुझ्या चौधरी पेक्षा निश्चित जास्त आहे. पण नशीब नसल्याने स्वारी मास्तर म्हणून खितपत पडली आहे. संधि मिळेल तर—पण सारं मनातच ठेवलं. उगाच वादविवादातून कटुता नको.

पण शैला जरा जास्तच घमेंडखोर. पुन्हा टर उडविण्याकरिता म्हणते, 'जर असा मूर्ख माझ्या वाटणीला येता तर मी खासच जीव दिला असता. काय बघितलं त्याच्यात सुषमाने कोण जाणे !'

सुषमाचे वडील साधारण माणूस पडले, बिचारे कोठून आणणार मोठा अधिकारी जावई ? शैलाचे वडील मोठे माणूस पडले. अधिकारी विकत घेणं त्यांना सहज शक्य होतं. पैसा, अधिकार, प्रतिष्ठा यांच्या जोरावर त्यांना बडे बडे जावई मिळू शकतील. शैला–बद्दल माझं मन तिरस्काराने भरलं आणि सुषमाबद्दल व तिच्या श्याम–बद्दल एक तऱ्हेचं वेगळं प्रेम वाटलं. शैलाला तोंडावर हे न सांगता मी

चूप बसले आणि नंतर तिला फारसं भेटायचं मी टाळू लागले होते.

शैलाच्या नवऱ्याच्या मृत्युचा समाचार वाचला आणि ती तिरस्काराची भावना बदलली. खरंच, बिचारी चौधरीच्या जीवावर किती सुखात होती, केवढा गर्व होता तिला त्याचा—आणि....आणि आता,...बिचारी शैला !

मी शैलाच्या समाचाराला गेले. शैला खरोखरच दुःखाने वेडीपिशी बनली होती. तिला आवरताना नाकीनऊ आले साऱ्यांच्या !

दुःखी उदास होऊन मी घरी आले. जीवनातल्या सुखाच्या क्षणभंगुरतेचा मी विचार करीत होते. कालची शैला....आजची विधवा !

माझ्या भावाची हाक ऐकून मी दचकले.

'अग बघितलंस का, या मृतांच्या यादीत कुणीतरी शाम खळे दिसतो आहे. तुझ्या त्या सुषमाच्या नवऱ्याचं नांव शामच आहे ना ?'

'शाम खळे ऽऽ ?' मी किंचाळले. धावत जाऊन पेपर हिसकावला आणि नांवापुढे नजर फिरवली....बापरे ! मला मिळालेला हा दुसरा आघात होता. भयंकर ऽऽ फारच भयंकर ! सुषमा....आणि शैला . दोघींच्याही नवऱ्याना एकाच दिवशी, एकाच गाडीत असताना मरण यावं ! यमराज तरी काय भयंकर आहे. मोठा-छोटा माणूस याचं त्याला काहीही वाटत नाही. त्याच्या दरबारात सारे सारखे ! शैलाचा पति पहिल्या वर्गातून आरामात प्रवास करीत असणार आणि सुषमाचा नवरा थर्ड क्लासात ! जादा पैसे खर्च करुन आरामात जाणारा पण यमाच्या तडाख्यातून सुटला नाही.

सुषमाबद्दल मला अंतःकरणापासून खरी-खुरी दया वाटली. मी तिला पत्र लिहिलं. पाकिटात पत्र टाकताना ओक्साबोक्सी रडणारी सुषमा डोळ्यासमोर नाचत होती.

आणि त्याचवेळी मला माझं ते शून्याचं कोडं आठवलं. खरंच चौधरी आणि खळे म्हणजेच २००० आणि २ संख्या नव्हे का ?

कागदावर मग मी लिहिलं २०००–२०००=० व २-२=० या वेळेला शून्य लिहिताना पुन्हा एक बागडत जाणारं मोठं शून्य आलं ! आणि दुसरं अगदी बारकं शून्य ! पण मला आता उत्तर सापडलं होतं. इतक्या वर्षांचं, शून्याचं कोडं सुटलं होतं—

संख्या मोठी असो, नाही तर लहान असो, एकमेकातून तीच ती संख्या वजा केली तर येणाऱ्या शून्याची किंमतही तितकीच आहे. शाम जो साधा मास्तर म्हणजे २ संख्या होता तो आता शून्य आहे. आणि चौधरी जो ऑफिसर होता तो २००० संख्या असला तरी आता शून्यच आहे. फक्त शून्य ! ! !

म. ग्रं. … ठाणे
दा. क्र. ९६३८५ दि. २५.६.९८
वि. कथा

# अरविंद प्रकाशन

दोन कादंबरिका

**हरवले ते**

**स्मृति**

**किंमत ८ रुपये**

कथासंग्रह

**गंमत**

**किंमत ८ रुपये**

एकांकिका

**सांवळा गोंधळ**

**किंमत १ रुपया**

आगामी

**१२ अनुवादित कथा**

**भांडण**

कथासंग्रह

IRBK-0117395